GOVERNMENT OF INDIA
NATIONAL LIBRARY, CALCUTTA

Class No. Mar 891.461
Book No. V375K V.3
N. L. 38.
MGIPC—S1—19 LNL/62—27-3-63—100,000.

## NATIONAL LIBRARY.

This book was taken from the Library on the date last stamped. A late fee of 1 anna will be charged for each day the book is kept beyond a month.

N. L. 44.
MGIPC—S4—39 LNL/56—15-4-57—20,000.

KÂVYASANGRAHA. 33.

# THE POEMS

OF

# VÂMANA PANDITA.

( THE GREAT MARÂTHÎ POET OF THE MAHÂRÂSHTRA. )

## Vol. III.

*EDITED WITH*

CRITICAL AND EXPLANATORY NOTES.

PRINTED AND PUBLISHED

BY

TUKÂRÂMA JÂVAJÎ,

PROPRIETOR OF JÂVAJÎ DÂDÂJÎ'S "NIRNAYA-SÂGARA" PRESS,

Bombay.

1901.

*Price 1½ Rupee.*

*(Registered under Act XXV of 1867.)*

[ All rights reserved by the Publisher. ]

Mar
891.461
W375K
v.3

(Registered under Act XXV of 1867.)

[ All rights reserved by the Publisher. ]

काव्यसंग्रह, ३२

महाराष्ट्रकविवर्यवामनपंडितकृत

# कवितासंग्रह.

भाग तिसरा.

हा

अर्थनिर्णायक व अवांतर माहितीच्या टीपा देऊन शुद्ध केला,

तो

मुंबईत जावजी दादाजी यांच्या 'निर्णयसागर' छापखान्याचे मालक
तुकाराम जावजी यांनीं छापून प्रसिद्ध केला.

१९०१.

किंमत १॥ रुपया.

NOT TO BE LENT OUT
SHELF LISTED
Mar
891.461
V375K
Vol 3

महाराष्ट्र भाषेचें आणि कवितेचें

आस्थापूर्वक अध्ययन

करूं पाहणाऱ्या सज्जनांस

हा ग्रंथ

सप्रेम अर्पण करतों.

'काव्यसंग्रह'कार.

NATIONAL LIBRARY
NO. 2292
DATE 18-4-57
CALCUTTA

# अनुक्रमणिका.


| अनुक्रमांक. | काव्यनाम. | ग्रंथसंख्या. | पृष्ठांक. |
|---|---|---|---|
| | **१. स्फुट प्रकरणें.** | | |
| १ | दत्तात्रेयस्तव .... .... .... .... | ५ | १– |
| २ | [illegible] .... .... .... .... | २५ | १–५ |
| ३ | तुकारामस्तुति .... .... .... .... | ८ | ५– |
| ४ | रसनास्तुति .... .... .... .... | २ | ५–६ |
| ५ | करुणाष्टक .... .... .... .... | ११ | ६–७ |
| ६ | उपदेशमाला ( प्रकरण १ ) .... .... | ६४ | ७–९ |
| ७ | „ ( प्रकरण २ ) .... .... | २५ | ९–१० |
| ८ | मनास बोध .... .... .... .... | ११८ | १०–२१ |
| ९ | नाममहिमा .... .... .... .... | १० | २१–२२ |
| १० | वामनबोध .... .... .... .... | २३ | २२–२५ |
| ११ | सिद्धांत .... .... .... .... .... | १४ | २५–३२ |
| १२ | भक्तिमाहात्म्य .... .... .... .... | २९ | ३३–३७ |
| १३ | भगवद्दास्य .... .... .... .... | ९ | ३७–३८ |
| १४. | भगवत्स्तुति .... .... .... .... | ६ | ३८–३९ |
| १५ | स्फुट श्लोक .... .... .... .... | ४२ | ३९–४६ |
| १६ | स्फुट सवाया .... .... .... .... | २२ | ४७–५७ |
| १७ | पदसंग्रह .... .... .... .... .... | २४ | ५७–६९ |
| १८ | आरती .... .... .... .... .... | १ | ६९–७० |
| | **२. भाषांतरें.** | | |
| १ | चतुःश्लोकी भागवत .... .... .... | ४ | ७०–७१ |
| २ | अपरोक्षानुभूति .... .... .... .... | १४५ | ७१–८३ |
| ३ | भर्तृहरिकृत शतकें ( नीतिशतक ) .... .... | ९४ | ८३–९६ |
| | „ ( शृंगारशतक ) .... .... | ८७ | ९७–१०६ |
| | „ ( वैराग्यशतक ) .... .... | ९७ | १०६–११८ |
| ४ | गंगालहरी .... .... .... .... | ५२ | ११८–१२९ |

| अनुक्रमांक. | काव्यनाम. | | ग्रंथसंख्या. | पृष्ठांक. |
|---|---|---|---|---|
| ५ | भगवद्गीता | (अध्याय १) .... .... | ६४ | १३०–१३५ |
| | | (अध्याय २) .... .... | ७५ | १३५–१४१ |
| | | (अध्याय ३) .... .... | ४६ | १४१–१४४ |
| | | (अध्याय ४) .... .... | ४५ | १४४–१४८ |
| | | (अध्याय ५) .... .... | ४० | १४८–१५१ |
| | | (अध्याय ६) .... .... | ६३ | १५१–१५६ |
| | | (अध्याय ७) .... .... | ३४ | १५६–१५९ |
| | | (अध्याय ८) .... .... | ६६ | १५९–१६३ |
| | | (अध्याय ९) .... .... | १०६ | १६४–१७१ |
| | | (अध्याय १०) .... .... | ४६ | १७१–१७५ |
| | | (अध्याय ११) .... .... | ७८ | १७५–१८० |
| | | (अध्याय १२) .... .... | १२३ | १८०–१८९ |
| | | (अध्याय १३) .... .... | १७८ | १८९–२०२ |
| | | (अध्याय १४) .... .... | ३० | २०२–२०४ |
| | | (अध्याय १५) .... .... | ३२ | २०५–२०७ |
| | | (अध्याय १६) .... .... | २८ | २०७–२०९ |
| | | (अध्याय १७) .... .... | ३१ | २०९–२११ |
| | | (अध्याय १८) .... .... | २४३ | २१२–२२९ |
| | | भगवंताची आरती .... .... | १ | २२९–२३० |
| ६ | निगमसार | (अध्याय १) .... .... | १४० | २३०–२३६ |
| | | (अध्याय २) .... .... | १३३ | २३७–२४३ |
| | | (अध्याय ३) .... .... | ११९ | २४३–२४८ |
| | | (अध्याय ४) .... .... | ८७ | २४९–२५३ |
| | | (अध्याय ५) .... .... | १२७ | २५३–२५९ |
| | | (अध्याय ६) .... .... | ८६ | २५९–२६३ |
| | | (अध्याय ७) .... .... | २१२ | २६४–२७४ |
| | | (अध्याय ८) .... .... | १०८ | २७४–२७९ |
| | | (अध्याय ९) .... .... | १६४ | २७९–२८६ |

| अनुक्रमांक. | काव्यनाम. | ग्रंथसंख्या. | पृष्ठांक. |
|---|---|---|---|
| | **३. संस्कृत ग्रंथ.** | | |
| १ | सिद्धांतविजय .... .... .... .... | ९६ | २८७–२९४ |
| २ | अनुभूतिलेश .... .... .... .... | ३२९ | २९४–३१९ |

एकंदर ग्रंथसंख्या. २८०४

# वामनपंडितकृत स्फुट काव्यें.

## भाग तिसरा.

---

## १. स्फुट प्रकरणें.

### १. दत्तात्रेयस्तव.

(श्लोक.)

आपणासि करि आपण दत्त श्रीपति, म्हणति यास्तव दत्त, ।
हें उदारपण या अवतारीं कोण त्याविण भवार्णव तारी ? ॥ १
ज्या मनींतुनि गळेल असूया बुद्धि तेंचि म्हणवी [१]अनुसूया, ।
आत्मते करुनि तीसहि दत्त आपणासि करि आपण दत्त. ॥ २
भवाब्धीस मिथ्या करूनी तराया स्मरा अत्रिच्या नंदना दत्तराया, ।
भजे त्यास देईन मी आपणातें स्वनामें अशा दाखवी तो पेणातें. ॥ ३
प्रीतिनें स्मरत अत्रिज गा ! तो धन्य पावन करी त्रिजगा तो ।
गेय जो श्रुति[३]कदंबरवासी श्रीचिदंबर दिगंबरवासी ॥ ४
भजा दत्तात्रेया त्वरितचि तराया भवजळा
निजश्रेया ध्यावा धरुनि हृदयीं दीप उजळा ।
तया सर्वात्मत्वें स्मरत जपतो वामन मनीं
सदा मागे प्रेम प्रभुसि जगदात्मत्व नमुनी. ॥ ५

---

### २. व्याधाख्यान.

(श्लोक.)

एके दिनीं कौळिक पारधीतें, गेला वना घेउनि शस्त्रअस्त्रें, ।
फिरे वनीं, लक्षितसे मृगातें, उष्णी न दीसे मृग लोचनातें. ॥ १
भ्रमत भ्रमत तेव्हां पातला पर्वतातें,
कठिण बहु गुहा ते देखिली लोचनातें, ।

---

१. अनुसूया ही अत्रिऋषीची पत्नी. इच्याच पोटीं श्रीभगवान् 'दत्त' या नामानें अवतीर्ण झाले. अनुसूयेची कथा 'श्रीगुरुचरित्रां'त पहावी. २. नीड. ३. समुदाय. ४. पारधी. ५. डोंगरातें.

मृगवत तनु ज्याची ते तनू भासलीसे,
अतिशय मग व्याधू[१] बाण योजीहि हौसें. ॥ २

गुहेमाजि तो तापसी कोणि एक, बहूकाळ ध्यानस्थ त्यागी खलोक, ।
निराहारि[२] तो निर्जळी[३] एकचित्ती, स्मरे अंतरीं तो रमाकांतमूर्ती. ॥ ३

व्याधें लक्षुनि बाण लावुनि गुणीं[४] संधान[५] जों योजिलें,
तों तेथें मनुजाकृती[६] स्वनयनीं तात्काळ त्या देखिलें, ।
तेजःपुंज बहू तपोधन महा ध्यानस्थ तो देखिला,
शस्त्रें टाकुनि सत्वरें अतिशयें साष्टांग तो वंदिला. ॥ ४

अनूतापें तेव्हां 'हर! हर!' वदे, 'जी पशुपती!
कसी झाली होती अनुचित कथा[७] आजि नसती[८], ।
महा ब्रह्महत्येचें दुरित[९] घडतें हो! अकचिंता[१०],
पुढें जन्मोजन्मीं सतत नरकीं कोण बुडता?' ॥ ५

त्या नंतरें व्याध पुसे मुनीतें, 'कां सेविलें कानन? सांग मातें. ।
संसारदुःखें अनुताप[११] जाला, वैराग्यभावें भजतां अजाला. ॥ ६

कीं[१२] राज्य गेलें धन हारवीलें, कीं शत्रुचें तें भय फार जालें, ।
कीं तस्करीं[१३] सर्व हिरोनि[१४] नेलें, कीं सोयरे सर्व उदास केले[१५]. ॥ ७

पत्नी नसे देईन[१६] आपुली जी, अभीष्ट[१७] तें मानस कोण[१८] कीं जी! ।
जें इच्छिलें पूर्ण करीन आतें[१९], वेगें वदावें' म्हणे सुव्रतातें. ॥ ८

उपरि बोलतसे मुनिराव[२०] तो, 'परियसी बरवा अभिप्राय तो, ।
पातलोंचि मिहि या वनिं पारधी, लक्षितों, परि नव्हे मृगपारधी.' ॥ ९

---

१. व्याध. २. आहार न घेणारा. ३. जल सुद्धां न प्राशन करणारा. ४. दोरीस. (धनुष्याचे.) ५. नेम. ६. मनुष्याची आकृति. ७. गोष्ट. ८. विनाकारण, व्यर्थ. ९. पातक. १०. एकाएकीं. ११. पश्चात्ताप. १२. किंवा. इंग्लिश भाषेतील Either याच्या व 'कीं'चा उपयोग सारखाच आहे. १३. चोरांनीं. १४. हिरावून. १५. 'सोयरीं सर्व उदास केलें' असाही पाठ आहे. १६. अतिथीचें अभीष्ट साध्य करण्यासाठीं आपली पत्नीही अर्पण करणारा व्याधही महा उदारच असला पाहिजे. पॉलिनिशिआ, ओशिआना येथील अत्यंत रानटी लोक अतिथीचा सत्कार कसा करितात हें 'स्पेन्सर' साहेबांच्या ग्रंथांतून पाहण्यासारखें आहे. व्याध, कोळी वगैरे लोक प्राचीनकाळीं याच वर्गांतील होते; तेव्हां व्याधाची दानशौंडता शुचक होय. १७. इच्छा. १८. काय. १९. आदरानें. २०. 'मुनिराय' असा अन्य पाठ आहे.

वदत व्याध, 'कथा मृगलक्षण, आणिन मी, मजला न्लगे क्षण.' ।
मुनि म्हणे, 'पेरिसें अरे भाविका! हेंचि लक्षण मृगात्तिनें भाति कां. ॥ १०

चहूंही हातांतें मृगमद तनू शामळ असे,
गळां माळा कांसे कसुनि पिवळें वस्त्र विलसे, ।
चहूं हातीं चाऱ्ही जडित मकराकार असती,
जया पायीं लेणीं रुण झुण बहू नाद करिती.' ॥ ११

हे ऐकुनीयां मुनिची सुवाणी, बोले तयातें मग व्याध वाणी, ।
'करीन आज्ञा अजि! सत्वरेंसी, सांगा तयाचें स्थळ आदरेंसीं. ॥ १२
झाडावरी कीं विवरांत राहे, खातो फळें कीं तृण भक्षिताहे, ।
सांगा असा नेमें कटाव त्याचा, धरोनि आणीन यथार्थ वाचा.' ॥ १३

मुनी बोले, 'सर्पावरि निजतसे एक दिवशीं,
कधीं पक्षीपाठीं बसुनि उडताहे गगनिशीं, ।
बहु स्थानें त्याचीं मजहि न कळे, लोक जपती,
त्वरें आतां जाई, उशिर न लवीं गा! मजप्रती.' ॥ १४

घेऊनी आज्ञा मुनिची त्वरेसीं, शोधी वनें जाउनि उत्तरेसी, ।
केला मृगाचा बहु यत्न लाहो, तों अस्तमाना रवि चालला हो! ॥ १५
असाध्य देखोनि पडे विचारीं, मनीं म्हणे, 'काय करूं मुरारी! ।
आलों द्विजा देउनि भाकदान, न साधितां होइल अस्तमान. ॥ १६

शब्दा गुंतुनि तापसा भरंवसा म्यां दीधला आसतां,
जावें काय घरा फिरोनि मजला मी त्यागितों जीवितीं, ।
सांगों काय तया तपस्वि मुनिला जावोनियां ते स्थळीं?'
ऐसें बोलुनि शस्त्र काढुनि करें कंठासि जों आकळी, ॥ १७

तदा देवा त्याचें अति निकट निर्वाण कळलें,
पुढें त्याच्या कैसें प्रगट करुनी रूप धरिलें! ।
चहूं हातीं चाऱ्ही अयुध असती पिच्छ मुकुटीं
असें त्या व्याधानें प्रगट हरिला देखत दिठीं. ॥ १८

---

१. सांगा. २. ऐकें. ३. सगज. ४. कस्तुरी. ५. सांवळी. ६. कमरेस. ७. जडावाचे दा-गिने. ८. आज्ञेप्रमाणें काम करीन. ९. 'नेमक ठाव' असाही पाठ आहे व हाच चांगला. १०. गरुडावर. ११. मुरनामक असुराचा अरि. (कृष्ण.) १२. वचन. १३. प्राणांस. १४. दृष्टीनें.

मृगवत तनु ज्याची ते तनू भासलीसे,
अतिशय मग व्याधू बाण योजीहि हौसें. ॥ २

गुहेमाजि तो तापसी कोणि एक, बहूकाळ ध्यानस्थ त्यागी स्वलोक, ।
निराहारि तो निर्जळी[3] एकचित्ती, स्मरे अंतरीं तो रमाकांतमूर्ती. ॥ ३

व्याधें लक्षुनि बाण लावुनि गुणीं संधान जों योजिलें,
तों तेथें मनुजाकृती स्वनयनीं तात्काळ त्या देखिलें, ।
तेजःपुंज बहू तपोधन महा ध्यानस्थ तो देखिला,
शस्त्रें टाकुनि सत्वरें अतिशयें साष्टांग तो वंदिला. ॥ ४

अनूतापें तेव्हां 'हर! हर!' वदे, 'जी पशुपती!
कसी झाली होती अनुचित कथा आजि नसती, ।
महा ब्रह्महत्येचें दुरित घडतें हो! अविचिता,
पुढें जन्मोजन्मीं सतत नरकीं कोण बुडता?' ॥ ५

त्या नंतरें व्याध पुसे मुनीतें, 'कां सेविलें कानन? सांग मातें. ।
संसारदुःखें अनुताप[11] जाला, वैराग्यभावें भजतां अजाला. ॥ ६

कीं[12] राज्य गेलें धन हारवीलें, कीं शत्रुचें तें भय फार जालें, ।
कीं तस्करीं[13] सर्व हिरोनि[14] नेलें, कीं सोयरे[15] सर्व उदास केले. ॥ ७

पत्नी नसे देईन[16] आपुली जी, अभीष्ट[17] तें मानस कोण कीं[18] जी! ।
जें इच्छिलें पूर्ण करीन ओतें[19], वेगें वदावें' म्हणे सुव्रतातें. ॥ ८

उपरि बोलतसे मुनिराव[20] तो, 'परियसी बरवा अभिप्राय तो, ।
पातलोंचि मिहि या वनिं पारधी, लक्षितों, परि नव्हे मृगपारधी.' ॥ ९

---

१. व्याध. २. आहार न घेणारा. ३. जल सुद्धां न प्राशन करणारा. ४. दोरीस. (धनुष्याचे.) ५. नेत्र. ६. मनुष्याची आकृति. ७. शोध. ८. विनाकारण, व्यर्थ. ९. पातक. १०. एकाएकीं. ११. पश्चात्ताप. १२. किंवा. इंग्लिश भाषेंतील Either याचा व 'कीं'चा उपयोग सारखाच आहे. १३. चोरांनीं. १४. हिरावून. १५. 'सोयरीं सर्व उदास केलें' असाही पाठ आहे. १६. अतिथीचें अभीष्ट साध्य करण्यासाठीं आपली पत्नीही अर्पण करणारा व्याधही महा उदारच असला पाहिजे. पॉलिनिशिआ, ओशिआना येथील अत्यंत रानटी लोक अतिथीचा सत्कार कसा करितात हें 'स्पेन्सर' साहेबांच्या ग्रंथांतून पाहण्यासारखें आहे. व्याध, कोळी वगैरे लोक प्राचीनकाळीं याच वर्गांतील होते; तेव्हां व्याधाची दानशीलता शुक्य होय. १७. इच्छा. १८. काय. १९. आवडीनें. २०. 'मुनिराय' असा अन्य पाठ आहे.

वदत व्याध, 'कथा मृगलक्षण, अणिन मी, मजला नलगे क्षण.' ।
मुनि म्हणे, 'पेरिसें अरे भाविका! हेंचि लक्षण मृगाप्तिनें भाविं कां. ॥ १०

चहूंही हातातें मृगमद तनू शामळ असे,
गळां माळा कांसे कसुनि पिवळें वस्त्र विलसे, ।
चहूं हातीं चाऱ्ही जडित मकराकार असती,
जया पायीं लेणीं रुण झुण बहू नाद करिती.' ॥ ११

हे ऐकुनीयां मुनिची सुवाणी, बोले तयातें मग व्याध वाणी, ।
'करीन आज्ञा अजि! सत्वरेंसी, सांगा तयाचें स्थळ आदरेंसीं. ॥ १२
झाडावरी कीं विवरांत राहे, खातो फळें कीं तृण भक्षिताहे, ।
सांगा असा नेमें कटाव त्याचा, धरोनि आणीन यथार्थ वाचा.' ॥ १३

मुनी बोले, 'सर्पावरि निजतसे एक दिवशीं,
कधीं पक्षीपाठीं बसुनि उडताहे गगनिशीं, ।
बहु स्थानें त्याचीं मजहि न कळे, लोक जपती,
त्वरें आतां जाईं, उशिर न लवीं गा! मजप्रती.' ॥ १४

घेऊनी आज्ञा मुनिची त्वरेसीं, शोधी वनें जाउनि उत्तरेसी, ।
केला मृगाचा बहु यत्न लाहो, तों अस्तमाना रवि चालला हो! ॥ १५
असाध्य देखोनि पडे विचारीं, मनीं म्हणे, 'काय करूं मुरारी[11]! ।
आलों द्विजा देउनि भाकदान[12], न साधितां होइल अस्तमान. ॥ १६

शब्दा गुंतुनि तापसा भरंवसा म्यां दीधला आसतां,
जावें काय घरा फिरोनि मजला मी त्यागितों जीवितीं[13], ।
सांगों काय तया तपस्वि मुनिला जावोनियां ते स्थळीं?'
ऐसें बोलुनि शस्त्र काढुनि करें कंठासि जों आकळी, ॥ १७

तदा देवा त्याचें अति निकट निर्वाण कळलें,
पुढें त्याच्या कैसें प्रगट करुनी रूप धरिलें? ।
चहूं हातीं चाऱ्ही अयुध असती पिच्छ मुकुटीं
असें त्या व्याधानें प्रगट हरिला देखत दिठी[14]. ॥ १८

१. सांगा. २. ऐकें. ३. समज. ४. कस्तुरी. ५. सांवळी. ६. कमरेस. ७. जडावाचे दागिने. ८. आशेप्रमाणें काम करीन. ९. 'नेमक ठाव' असाही पाठ आहे व हाच चांगला. १०. गरुडावर. ११. मुरनामक असुराचा अरि. (कृष्ण.) १२. वचन. १३. प्राणास. १४. दृष्टीनें.

व्यार्धे पाहुनियां हरि खननयनीं, संधान जों योजिलें
माजाचें कटिबंधन झडकरी कंठास तें घातलें, ।
घेवोनी अतिसत्वरें तपसिया संनीध जों पातला
बोले दीर्घस्वरें, 'अरे तपसिया! घे सावजा आपुल्या. ॥ १९
मुनी पाहे तेंव्हां सगुण हरिचें रूप नयनीं,
म्हणे, 'हें आश्चर्य त्रिभुवनपती शेषशयनी[1], ।
श्रुती नेती[2] नेती विधिहर[3] जयातें हुडकिती
असा त्या व्याधानें प्रगट करवीला निजमती. ॥ २०
नमो विश्वोद्धारा अघमतिहरा कंजनयना
क्षिराब्धीयात्रासीं श्रुतिविर्चित कर्कोटशयना ।
स्तुती गाती योगी नमुनि हरितें नम्रवदनी
कृपासिंधू! देवा! स्थिर ये उभयां मूळ सदनीं. ॥ २१
बहू योगी ध्याती हृदयकमळीं ह्याचि चरणा
न लाभे हें तेंची मम दृढ कसें बंधहरणा.' ।
उभा केला व्याधें त्वरित मग भावें गवसिला
न लाभे वेदां हा अजित तपयज्ञीं न शिणला. ॥ २२
नमो विश्वानंदा निजप्रणवकंदा अगणिता
नमो जी स्वच्छंदा सकळ भवबंधा उफणिता, ।
मला तुझा वंदा अणिक मतिमंदा न रुचि हो!
नमो जी गोविंदा! तव पदिं, मुकुंदा! जवळि हो. ॥ २३
कृपा आली देवा त्वरित करुनी दिव्य स्वरुपा
स्वलोकीं नेऊनी दिधलि उभयां मुक्ति सरुपा[11] ।
ऋषी ब्रह्मादीक सुरवर मुनी स्तुति करिती
बहू साधूवृंदें हरिपदयुगीं प्रेम धरिती. ॥ २४

---

१. शेषावर निद्रा करणारा. २. न इति. 'तो नव्हे' 'तो नव्हे' असें श्रुति म्हणतात. ३. ब्रह्मा व शिव. ४. विश्वाचा उद्धार करणारा. ५. पापबुद्धि नष्ट करणारास. ६. कमलनयनास. ७. क्षीरसागरवासी. ८. श्रुतींनी गाईलेला. ९. शेषशायी. १०. ओंकाराचा कंद. ११. सरुपता मुक्ति. चतुर्विधमुक्ति येणेंप्रमाणें:—१ सायुज्यता, २ सरूपता, ३ सलोकता, ४ समीपता.

ऐसे परी हरिहि भाविक या जिवाला, दावी क्षणा न लगतां पंदराजिवाला।
हा प्रत्ययो दृढतरें बरवा मनाला, आला म्हणोनि हरिछंदहि वामनाला. ॥ २९

---

## ३. तुकारामस्तुति.

(श्लोक.)

जयाची वदे पूर्ण वेदान्त वाणी, म्हणावें कसें हो! तयालागिं वाणी ? ।
परब्रह्मरूपी असा जो तुकाया, तयाचे तुकीं कोण ऐसा तुकावा ? ॥ १.
जया दर्शनें स्पर्शनें मुक्त होती, तुका नाम वाचेसि जे आणितातीं, ।
पुनर्जन्म त्या प्राणियांलागिं कैचा, तुकाराम वाणी जया नाम वाचा. ॥ २
परंधाम टाकूनि कैसा उडाला ? जिवन्मुक्त होऊनि ब्रह्मीं बुडाला, ।
जयाची तनू ब्रह्मरूपीं बुडाली, भवभ्रांति हे जाण कैसी गळाली ? ॥ ३
तुकायासि कोठे तुकाया दिसेना, जनीं हिंडतांना तुकावा दिसेना, ।
तुकावा कसा तो चतुर्भूज जाला, निराकार ब्रह्मीं स्वरूपीं निराळा. ॥ ४
तुका ब्रह्मरूपीं स्वरूपीं रहातो, जया दीपन्यायें जयासी पहातो, ।
तुका बैसला ज्ञानवैराग्यधामीं, वसे चित्कळापूर्णब्रह्मीं विरामीं. ॥ ५
जयाचे मुखीं भारती वेदमाता, तया प्राप्तिची कायसी जाण चिंता ? ।
निजानंद आनंद तो मग्न जाला, निराकार ब्रह्मस्वरूपीं मिळाला. ॥ ६
कृपासागरें नाव निर्माण केली, असंख्यात बुद्धी तरोनीच गेली, ।
पुढेंही तरायासि ऊपाय केला, म्हणोनी तुका मृत्युलोकासि आला. ॥ ७
कसें भँर्जिलें बीज तें ऊगवेना, तसें सर्व संपादिलें तें कळेना, ।
पहा बोध त्या जाहला वामनाला, सुखाचा गमे पूर्ण ठेवा मनाला. ॥ ८

---

## ४. रसनास्तुति.

(सवायावृत्त.)

हे रसने! तुज वीनवितों कर जोडुनि एक विनंति करीं
सर्व असान्य जगत्रयदुर्गुण काढुनि होउं नको अखरी ।

---

१. पदकमलातें. २. वणिज्. ३. मानवणें; महत्त्वास येणें. ४. बरोबरीस. ५. गृहीं. ६. विश्रांति. ७. भाजलेलें. ८. जीभ. ९. मिथ्या. खरें न बोलणारी.

मौन्यत्वें क्रमुं काळ कसा म्हणसी तरि निश्चळ ध्यान धरीं ।
श्रीशिव शंभु दयार्णव केशव माधव कृष्ण मुकुंद हरी. ॥ १
हे रसने ! तुज सांगितलें हित काज हरिस्मरणासि शिकावें
श्रोत्रयुगीं श्रवणादि करूनि कथामृतसार मनांत धरावें, ।
हस्तकिं पूजन मस्तकिं वंदन नेत्रिं विलोकुन रूप भरावें
ईश्वर हे समबुद्धि[1] निरक्षुनि मानुं नको मग आपपरावें[2]. ॥ २

---

## ८. करुणाष्टक.

(श्लोक.)

लोपोनि[3] भास्कर, जयद्रथ मारियेला, लज्जानळांतुनि धनंजय वांचवीला, ।
लाक्षागृहीं विवरिं पांडव रक्षियेले, माझे विशींच मन निष्ठुर केंवि केलें? ॥ १
दुग्धाब्धिपें द्विजसुतें स्तविला मुरारी, दुग्धार्णवीं[4] अचल ठेविसि पूतनारी[5] ! ।
कुब्जेच्हि भक्ति तरि देखुनि क्षेम[6] दीलें, माझे विशींच मन निष्ठुर केंवि केलें ?॥ २
आणोनि राजतनया[7] अधमें सभेला, दुष्टोत्तरें करवि नग्न जरी सतीला, ।
तीकारणें स्वकरिं अंबर[8] नेसवीलें, माझे विशींच मन निष्ठुर केंवि केलें ? ॥ ३
उत्तानपाद[9] नृप केवळ पुण्यराशी, तत्सूत तो ध्रुव तपोधन योगराशी, ।
त्याकारणें अचळ धाम[10] करोनि दीलें, माझे विशींच मन निष्ठुर केंवि केलें ?॥ ४
नक्रें जळांत चरणीं धरिलें गजेंद्रा, दीनोत्तरें[11] करुनियां स्तवि देवइंद्रा, ।
तैं दीनबंधु ब्रिद सत्वर रक्षियेलें, माझे विशींच मन निष्ठुर केंवि केलें? ॥ ५
वृत्रारि[12] कोपुनि शिळाघन वर्षवीला, तेव्हां भयप्रळयकंप[13] गमे जनाला, ।
घेवोनियां गिरि करीं व्रज रक्षियेलें, माझे विशींच मन निष्ठुर केंवि केलें? ॥ ६
सिंधूजळांत कनकापुर[14] दूर गांवें[15], तेथोनि शीघ्रगति मोक्षपुरीस[16] यावें, ।
काष्ठाग्नि[17] घे भरत, दर्शन त्यास दीलें, माझे विशींच मन निष्ठुर केंवि केलें? ॥ ७
जे शापदग्ध पडली बहुतां दिसांची, लावूनि पाय हरिली जडता तियेची[18]. ।
त्या भक्तवत्सलपणाप्रति[19] काय झालें, माझे विशींच मन निष्ठुर केंवि केलें? ॥ ८

---

१. निःपक्षपातबुद्धीनें. २. आपपर असें. सर्व विश्वच आपण झाल्यावर आपपरभाव राहत नाहीं. ३. येथें 'लोपवोनि' असें वास्तविकपणें पाहिजे, पण वृत्तसुखार्थ 'लोपोनि' असाच प्रयोग पंडितांस धरावा लागला. ४. क्षीरसागरीं. ५. पूतनेचा शत्रु. ६. आलिंगन. ७. राजकन्या (द्रौपदी). ८. वस्त्र. ९. ध्रुवाचा बाप. १०. स्थान. ११. दीनवाणीनें. १२. इंद्र. १३. भीति देणारा प्रळयकाळचा कंप. १४. लंका. १५. योजनें. १६. अयोध्येला. १७. अग्निकाष्ठें. १८. अहिल्येची. १९. भक्तवात्सल्य.

दुर्योधनें ऋषिस धाडियलें वनातें, धर्मा छळूनि मुनि मागति भोजनातें, ।
त्याकारणें परम अन्न निशीं ते दीलें, माझे विशींच मन निष्ठुर कैंवि केलें! ॥ ९
दारिद्रतेकरुनि पीडित तो सुदामा, मुष्टी भरूनि पृथु आणित कृष्णधामा, ।
देऊनि कांचनपुरी द्विजराज केलें, माझे विशींच मन निष्ठुर कैंवि केलें? ॥ १०
त्रिकाळीं करा घोष या अष्टकाचा, मनींचा पुरे अर्थ तेव्हांच साचा, ।
विनंती असे भक्त हो! वामनाची, उपेक्षा न कीजे ययैा अष्टकाची. ॥११

---

## ६. उपदेशमाला.

### (प्रकरण पहिलें.)

(अभंग.)

वंदोनियां आत्माराम रमापती । उपदेशरीती वदों कांहीं ॥ १
गुरू पद्मनाभा अरे! शिष्यराया! । भवाब्धि तराया शरण रीघें. ॥ २
पद्मनाभ नाभीपद्मीं निर्मी ब्रह्मा । त्यासि स्वमहिमा उपदेशिला ॥ ३
पूर्वकल्पीं ज्ञानी सर्व मुक्त झाले । आतां जन्मा आले सर्व अज्ञ ॥ ४
सर्व माया स्वप्न दुःखातें भोगिती । कोणासि जागृती कोणें द्यावी? ॥ ५
नित्य जागा एक सर्वेश्वर हरी । आधी जागें करी ब्रह्मयासी ॥ ६
त्यानें जागे केले पुत्र सनकादी । विद्या हे अनादी प्रकटली ॥ ७
तेंचि आलें जगीं संताच्चिया मुखा । संत निजसुखा दाखविती ॥ ८
नित्यजागृताची हरीची हे विद्या । संहरी अविद्या संतमुखें ॥ ९
नित्यजागृताची प्रतिमा श्रीगुरू । सुख कल्पतरू तोचि जाण ॥ १०
म्हणोनि ब्रह्मया विद्या दिली ज्यानें । श्रीगुरू सुजाण जाणें तोचि ॥ ११
'तोचि कीं हा ऐसा भावें ये शरण । वंदुनी चरण मोक्ष मागें ॥ १२
शिष्य आइकतां ऐसा संप्रदाय । म्हणे, 'जय जय गुरूनाथा! ॥ १३
ब्रह्मयाचा बाप गुरू विद्याप्रद । तोचि तूं सांप्रत भेटलासी ॥ १४
स्मरोनी संसारदुःख कोटी कोटी । शरण ये, पोटीं एक भावें.' ॥ १५
स्वयें विश्वरूप ऐसा अनुभवें । गुरू स्वैवैभवें पाहे शिष्या ॥ १६
ठेवी त्याच्या माथां सव्य पद्मकर । कृपेचा सागर बोध करी ॥ १७

---

१. दुर्वासादि. २. रात्रौ. ३. पोहे. ४. धा. ५. ब्रह्मदेवानें. ६. ज्ञान. ७. अज्ञान. ८. तोचि परमेश्वर आपला सद्गुरु आहे असें समजून सद्गुरूला शरण जातो. ९. असंख्य. १०. स्वतःच ब्रह्मरूपी आपण आहों, असा अनुभव घेऊन जें वैभव प्राप्त झालें आहे त्यानें.

ज्ञाता जो मी तोचि ज्ञेय ऐशी खूण । श्रीगुरू निपुण सांगे तया ॥ १८
स्पष्ट अविद्येचें रूप त्याच्या मुखें । करऊनि सुखें सांगे विद्या ॥ १९
म्हणे, 'शिष्या! आधीं कोण तूं हें सांग। तों तो दावी आंग सांगे नांव.'॥२०
म्हणे गुरू, 'स्वप्नीं देह तूं ऐसाची । देखतोसी साची कोण तनू ॥ २१
स्वप्नीं तोचि खरा एथें हाचि साच । देहत्व आहाच झालें ऐसें ॥ २२
आतां देह देहा बापा! जरी जाणे । तरी कां रे! नेणे आपणासी ॥ २३
एवं नव्हे देह ऐसा झाला शोध । परी गेला बोध प्राणावरी ॥ २४
कीं प्राण न असे मृत कलेवरीं । देहईंष्टा तरी प्राण होय ॥ २५
प्राण आत्मा नव्हे स्वप्न अनुभवें । मनाच्या वैभवें स्वप्न झालें ॥ २६
स्वप्न देह तेथ आत्मत्व प्रत्यय । तो तों मनोमय कल्पनेचा ॥ २७
आता मन आत्मा म्हणतांचि ऊडे । सुषुप्तींत बुडे तमीं जेव्हां ॥ २८
नव्हे मन परी वळखावा मनें । बोलावा जिव्हेनें जिव्हातीत ॥ २९
वळखावा मनें त्याचि मना आंत । आत्मत्व अत्यंत जेथें वाटे. ॥ ३०
चित्त बुद्धि मन आणि अहंकार । हे चारी प्रकार मनाचेची. ॥ ३१
आत्मत्वप्रत्यय चहूंमाजी जेथें । वाटे तुज तेथें दावूं आत्मा. ॥ ३२
आत्मत्वप्रत्यय जे ठायीं अचल । तो सर्प चंचल रज्जु आत्मा. ॥ ३३
होऊनियां द्रष्टा त्याचा त्यास पाहे । तों तो सर्प आहे हाचि रज्जु. ॥ ३४
आतां सत्य, ज्ञान, अनंत ही तीची । सत्य प्रपंचाची मिथ्या गोष्टी. ॥ ३५
वारुळींचा सर्प प्रकाशे आपणा । मिथ्या सर्पखूणा दावी रज्जु. ॥ ३६
स्वयें दिसे सोनें सोन्याच्या आधारें । मिथ्या अलंकारें मिरवावें. ॥ ३७
कालत्रयीं हेम एके काळीं नग । तैसें ब्रह्मीं जग मिथ्या पाहे. ॥ ३८
मिथ्या चराचर या दोंचि लक्षणीं । त्यांच्या विलक्षणीं ब्रह्म सत्य. ॥ ३९
स्वप्रकाश हेम कालत्रयीं असे । नग त्यानें दिसे एके काळीं. ॥ ४०
सत्य, ज्ञान आणि अनंत त्रिपद । ब्रह्म मुक्तिप्रद ओळखावें. ॥ ४१

---

१. शिष्य. २. मग तुझी ओळख तुला कां पटत नाहीं? ३. देह हा आत्मा नव्हे. ४. कारण. ५. शरीरीं. ६. पाहाणारा. ७. सामर्थ्यानें. ८. खाशी. ९. उडून जातो, नाहींसा होतो, ठरत नाहीं. १०. झोपेंत. ११. मन आत्मा नव्हे. पण तो मनानें ओळखतां येण्यासारखा आहे. १२. दोरी. १३. आत्मा. १४. खरोखर. १५. सोनें सर्वकाळ असतें, पण अलंकार वेळेपुरते केलेले असतात, तसें ब्रह्म हें सार्वकालिक आहे, विश्व मात्र नियत-कालिक म्हणून असत् आहे. १६. दागिना.

सद्यत्वाच्या त्यांत ऐशा दोनी रीती । त्याच्या विपरीतीं मिथ्यत्व ही. ॥ ४२
आत्मा ब्रह्म ऐसा सत्य जड जग । तया हेमीं नग मिथ्या जाण. ॥ ४३
सत्यपदें ऐसा आत्मा ओळखावा । मग समजावा ज्ञानपदें. ॥ ४४
जड जग त्याच्या विपरीतें ज्ञान । करावें हें ध्यान ज्ञानपदें. ॥ ४५
आतां अनंतत्व पाहें बापा ! याचें । ज्ञाता तो तूं साचें तत्व कीं रे ! ॥ ४६
तें तों जैसें देहीं तैसेंचि बाहेरी । ब्रह्मांड उदरीं तुझ्या मातें. ॥ ४७
अंतवंत जग अनंत तो तूंचि । हे तों गोष्टि साची पाहें बरी. ॥ ४८
तया अनंतत्वीं अंतवंत जग । सुवर्ण तूं, नग विश्व कीं हें. ॥ ४९
तेव्हां तूंचि जग म्हूण हे अंतरीं । धरूनियां बरी ध्यान करीं. ॥ ५०
पाहें आत्मासोनें विश्वअलंकारीं । ध्यान या प्रकारीं सविशेष. ॥ ५१
म्हणिजे तो कोश हा विज्ञानमय । सर्वही अद्वय ब्रह्म जेथ. ॥ ५२
आनंदमय तो कोश निजतत्व । लक्षी शुद्ध सत्व उन्मनी तें. ॥ ५३
चित्त धारे तेव्हां उन्मनी समाधी । न धारतां साधीं अभ्यासानें. ॥ ५४
येऊं देऊं नये तेथें निद्रालेश । लय तो प्रवेश तमीं चित्ता. ॥ ५५
युक्ताहारनिद्रा करूनी जो ध्याय । त्यासी निद्रालय बाधीना हा. ॥ ५६
लयपरिहार याचा हा संक्षेप । दुसरा विक्षेप विघ्नरूप ॥ ५७
विक्षेप म्हणिजे उठे जी कल्पना । तेथें धावी मना तत्त्व स्मृती. ॥ ५८
अलंकार सोन्याविणें तो न दिसे । तेव्हां तत्व असे कल्पना ही. ॥ ५९
कल्पनेचा माग ये रीती मोडावा । यत्न न सोडावा अभ्यासाचा. ॥ ६०
आनंदमय हा कोश सिद्ध तेव्हां । कल्पनेचा जेव्हां माग मोडे. ॥ ६१
'उपदेशमाला' सुता देवराया । नृसिंहें विजाया करविली. ॥ ६२
तेचि सर्व शिष्यां उपयोगा आली । कंधरीं घातली ज्यानें त्यानें. ॥ ६३
बामनें अर्पिली श्रीगुरुचरणीं । सकळ करणी तयाचीच. ॥ ६४

---

## ७. उपदेशमाला.

### (प्रकरण दुसरें.)

(अभंग.)

ब्रह्म जाणायाची इच्छा तूज आहे । तरी तूंची पाहें आपणातें ॥ १

---

१. मावतें. २. बेताचा आहार. ३. पंडितांच्या वडिलांचें नांव. ४. गळ्यांत.

आपणातें बरें ओळखीशी जेव्हां । सर्वगत तेव्हां तेंची ब्रह्म ॥ २
ब्रह्म जाणों ऐशी इच्छा कवणासी । तूंची अविनाशी ब्रह्म जाण ॥ ३
जाणोनी जो आत्मा ब्रह्म तें आपण । पाहे हेंही खूण तूंही तूंची ॥ ४
तूंची सांगे तूझें नीजरूप कोण । आपणा आपण विचारोनी ॥ ५
विचारोनी देह मी जरी म्हणसी । स्वप्नींही देखसी देह जैसा ॥ ६
जैसा स्वप्नदेह नव्हेशी सर्वथा । हाही देह मिथ्या तैसा जाण ॥ ७
जाणोनी निजरूप या देहावेगळें । जड हा केवळ आत्म्यावीणें ॥ ८
आत्म्यावीणें देह शव दिसताहे । प्राण तोही नव्हे निजआत्मा ॥ ९
आत्मा प्राण तरी विषयाचें ध्यान । मी तो ऐसें ज्ञान प्राणा नसे ॥ १०
नसे ज्ञान प्राणा विषयचिंतन । तेंहि तूझें मन आत्मा नव्हे ॥ ११
आत्मा नव्हे मन विषयाचें ध्यान । मुरे तेंहि मन सुषुप्तींत ॥ १२
सुषुप्तींत नाहीं कांहींच प्रतीती । त्याही शून्याप्रती जाणसी तूं ॥ १३
जाणशी तूं तेंहि कांहीं न कळणें । जागृतींत जेणें तोची आत्मा ॥ १४
आत्मा तो ओळखें मनोमय कोशीं । आतां उपदेशीं देईं चित्त ॥ १५
चित्त बुद्धि मन आणि अहंकार । यांमाजीं निर्धार स्वरूपाचा ॥ १६
स्वरूपाचा थारा चहूंमाजी जेथें । वाटे तूज तेथें निज पाहे ॥ १७
पाहें तें पाहणें जें सर्व जाणणें । पाहोनी राहणें उगें तेथें ॥ १८
तेथें आपणातें आपणची पाहे । तेंची ब्रह्म आहे सर्व देहीं ॥ १९
देहीं जें जें आहे तें तें हेंची पाहे । पाहता तो आहे वेगळाची ॥ २०
वेगळेंची आधीं हें तत्व जाणावें । मग तें पाहावें सर्वा ठायीं ॥ २१
सर्वा ठायीं सर्व देह इंद्रियातें । तेंची वर्ते चित्त ऐसें पाहें ॥ २२
पाहे तेंची सत्य सर्वत्र जाणीव । असत्य हें सर्व मृगजळ ॥ २३
मृगजळ जैसें सूर्याचे किरणीं । विश्व तैसें जाण सर्व ब्रह्म ॥ २४
सर्व ब्रह्म पाहें वामनस्वरूपीं । त्रिविक्रमरूपीं विश्वरूप ॥ २५

---

## ८. मनास बोध.

(श्लोक.)

मना! आइचा बोध मानी अनंदें, कसें त्यागिलें राज्य त्या गोपिचंदें, ।
धनैश्वर्यकांतादि सर्वत्र त्यागी, म्हणे वामना तो जितां मुक्ति भोगी. ॥

---

१. मैनावतीचा. हीनें जालंदरनाथापासून उपदेश घेतला होता.

मना! बोध रे! भर्तरी[1]लागिं जाला, निवाला स्वयें वैभवा वीट आला, ।
चिरंजीव अद्यापि तो पूर्ण भोगी, म्हणे वामना तो जितां[2] मुक्ति भोगी. ॥ २
मना! वैभवा भूलला व्यर्थ प्राणी, सखे सोयरे दीसतां सौख्य मानी, ।
जिवाचा सखा[3] तूं विचारूनि पाहें, म्हणे वामना मुक्ति संनीध आहे. ॥ ३
नको आस रे! कामिनीकांचना[4]ची, तयाच्या मुळें हांव ते मीपणाची, ।
मनीं मीपणें मानवी देह जातो, म्हणे वामना व्यर्थ चिंता वहातो. ॥ ४
मना! जन्मजन्मांतरीं पुण्यठेवा, नसे संचिल्या, मागसी कां तुं देवा!? ।
कदां दीधल्यावीण तें पाविजेना, म्हणे वामना मूर्ख तें ऊमजेना. ॥ ५
मना! व्यर्थ संसार येथेंचि पाहीं, पुढें मागुती मानवी देह नाहीं, ।
करीं हीत तूं चूकवीं जन्मखेपा, म्हणे वामना जाणिजे पुण्यपापा. ॥ ६
मना! वासना कल्पना टाकिं वेगीं, निजेच्छासुखें अक्षयी मुक्ति भोगीं, ।
किती शीकवूं तूजला पापरूपा, म्हणे वामना जाणिजे पुण्यपापा. ॥ ७
मना! सज्जनासारिखा काय होसी, विचारी मना पाहिं तूं आदरेंसी, ।
मला दीसतो हाचि ऊपाय सोपा, म्हणे वासना जाणिजे पुण्यपापा. ॥ ८
मना! वासना शुद्ध तूला असावी, दया सर्वभूतांदिकीं ही वसावी, ।
असावें तुवां सात्विकें, सांडिं कोपा, म्हणे वामना जाणिजे पुण्यपापा. ॥ ९
मना! कर्मठा ऐक रे! ऐक माझें, नको घोर संसार हा व्यर्थ ओझें, ।
बुडाला वृथा मानवी देह तापें, म्हणे वामना जाणिजे पुण्यपापें. ॥ १०
मना! रे! तुला सत्य संसार भासे, नव्हे सत्य संसार हा व्यर्थ नासे[5], ।
असें जाणुनी बूडसी अंधकूपा, म्हणे वामना जाणिजे पुण्यपापा. ॥ ११
मना! बोलण्याचें नको दुःख मानूं, जनीं निंद्य तें व्यर्थ वाचेस आणूं, ।
दिसंदीस तूं मूर्ख होशील बापा, म्हणे वामना जाणिजे पुण्यपापा. ॥ १२
मना! वासना सत्य जीवीं धरावी[6], पैराशा[7] तुला स्वल्प तेही नसावी, ।
विवेकें सदा लेश तो आंवरावा, म्हणे वामना पुण्यठेवा करावा. ॥ १३
मना! मानसीं सांगतों हीत तूझें, तुटे सर्व अज्ञान हें भ्रांतिओझें, ।
तुझा हेत तो रामरूपीं भरावा, म्हणे वामना पुण्यठेवा करावा. ॥ १४
मना! वीषयीं गुंतसी कोण काजें, तुला ज्ञान वैराग्य हें सर्व साजे, ।
बहूतां परी बोध जीवीं धरावा, म्हणे वामना पुण्यठेवा करावा. ॥ १५

---

१. भर्तृहरी. २. जिवंत असतां. ३. शिव. ४. सोनें. ५. नासून टाकितो. ६. 'असावी' असाही पाठ आहे. ७. दुसऱ्याची आशा.

मना ! बोध जीवीं धरी हीतकारी, नव्हे व्यर्थ हा पाहिं तूं कां विचारीं, ।
तुझे अंतरी संशयो तो तुरावा, म्हणे वामना पुण्यठेवा करावा. ॥ १६
मना ! रे ! तुला सांगतों गर्वराशी, धरीं भाव तूझा असे तूजपाशीं, ।
किती शीकवूं तूजला ज्ञानमूढा, म्हणे वामना सांडि तूं भाव कूडा. ॥ १७
मना ! लौकिकीं जें दिसें गोड गावें, तुवां तेंचि कीजे महाशुद्धभावें, ।
परी अंतरीं बुद्धि तैसी करावी, म्हणे वामना वासना ही मरावी. ॥ १८
मना ! वासनेचे मुळें जीव जाती, मना वासनेचे मुळें जन्म घेती, ।
अशी वासना टाकि तूं पापरूपी, म्हणे वामना तूजला मुक्ति सोपी. ॥ १९
मना ! वासनेचे मुळें क्रोध झाला, मना वासनेचे मुळें सर्व घाला, ।
मना ! वासना तूजला काळ मोठा, म्हणे वामना वासनासंग खोटा. ॥ २०
मना ! वासनेचे मुळें कष्ट होती, मना वासनेचे मुळें नर्कप्राप्ती, ।
मना ! वासनेचे मुळें दुःख भोगी, म्हणे वामना वासना टाकि वेगीं. ॥ २१
मना ! वासना स्पष्ट रे ! संग ज्यासी, सदा सर्वदा तो जिता नर्कवासी, ।
तयाला नसे धर्मकामार्थमोक्ष, म्हणे वामना तो अघोरी प्रत्यक्ष. ॥ २२
मना ! वासनेचे मुळें निंदिताती, जगीं वासनेचे मुळें हीन होती, ।
अशी वासना तोडिं तूं सर्व पापा, म्हणे वामना एक रे ! ज्ञानरूपा. ॥ २३
मना ! वासना तृप्त होतां दिसेना, तैया भ्रांतिचें चित्त कोठें वसेना, ।
तयाचे मुळें क्रोध संपूर्ण आंगीं, म्हणे वामना चित्त दे साधुसंगीं. ॥ २४
मना ! वासना टाकि रे ! टाकि आतां, मना ! सज्जना ! सांडि संसारचिंता, ।
मना ! चिंत रे ! ज्यासि नैं। रूपरेखा, म्हणे वामना तेंचि कैवल्य देखा. ॥ २५
मना ! ज्यासि आकार तें पाहिं नासे, कळेना तुला मोहमायाविकासें, ।
जसें स्वप्न जागृत झाल्या दिसेना, म्हणे वामना तेंवि संसार जाणा. ॥ २६
मना ! टाक रे ! भोगिल्या दुःखकोटी, मना कल्पना वीषयीं फार मोठी, ।
परी भोगिल्यावीण ते कोण सोडी, म्हणे वामना साधुचा संग जोडीं. ॥ २७
मना ! पाहिं तूं व्यर्थ हा जन्म गेला, नसे साधिला मुक्तिचा यत्नकिला, ।
तुला लागली वीषयीं फार गोडी, म्हणे वामना साधुचा संग जोडीं. ॥ २८
मना ! त्वां दया सर्वभूतीं धरावी, जितां मुक्ति सायुज्यता आंवरावी, ।

---

१. कपटाचा. २. धर्म, अर्थ, काम आणि मोक्ष हे चार पुरुषार्थ आहेत. ३. वासनेनें भ्रम घातकेलें चित्त. ४. नसे. ५. मोक्ष. ६. न असे. ७. मोहरूपी मायेचा पूर्ण विकास झाल्यामुळें. ८. यत्नानें साध्य होणारा. हा समास चिंतनीय आहे. ९. चतुर्विध मुक्तिः— सरूपता, सलोकता, सायुज्यता आणि समीपता.

जगीं निंद्य तें कर्म तूं सर्व सोडीं, म्हणे वामना साधुचा संग जोडीं. ॥ २९
मना! कासया व्यर्थ चिंता वहासी? दिसे तें नसे काय अज्ञान होसी?।
नको रे! मना! या जिवा कर्मबेडी, म्हणे वामना साधुचा संग जोडीं. ॥ ३०
मना! चंद्रसूर्यादि आकाशवारा। भुमी अग्नि पाषाण हे सर्व तारा।
महाकल्पकाळींहि सर्वांसि जोडी, म्हणे वामना साधुचा संग जोडीं. ॥ ३१
मना! साधुसंगें महादुःख भंगे, बहू सार हें साधि तूं प्रेमसंगें,।
हरी वा! उधा सर्व अज्ञान तोडीं, म्हणे वामना साधुचा संग जोडीं. ॥ ३२
मना! कीर्ति ज्याची सदां वाणिजेती, बहूतांपरी आणिकां सूख देती।
जगीं वर्तती नेणती काम क्रोधू, म्हणे वामना जाणिजे तेचि साधू. ॥ ३३
मना! बुद्धि ज्याची सदा स्थीर राहे, चळेना कदा नित्य आनित्य पाहे।
जयाचे मुखें बोलणें ब्रह्मबोधू, म्हणे वामना जाण रे! तोचि साधू. ॥ ३४
मना! सर्वदा चित्त ज्याचें चळेना, महासंकटीं नित्य कर्में वदेना।
विचारीं सदा लौकरी आत्मबोधू, म्हणे वामना जाण रे! तोचि साधू. ॥ ३५
मना! जाणसी सर्वदा काळ ग्रासी, असें जाणुनी काय पां भूलवासी?।
पतंगा दिपा देखिल्या सूख वाटे, म्हणे वामना हेंचि आश्चर्य मोठें. ॥ ३६
मना! सूख रे! दुःख तें फार होतें, घडे कर्म तें पूर्वसंचीत होतें।
तयाचा नको खेद तूं मानुं वायां, तरी वामना लागतो येम पायां. ॥ ३७
मना! पाहिं रे! काय सांगूं जनाला? वळेना कदा भूलला मीपणाला।
मना! मीपणें व्यर्थ आयुष्य गेलें, म्हणे वामना हीत त्वां काय केलें? ॥ ३८
मना! मीपणें व्यर्थ दुर्योधनासी, मदे मातला आवरेना मनासी।
तयाचे मुळें गोत्रसंहार झाला, म्हणे वामना टाकि तूं मीपणाला. ॥ ३९
मना! मीपणें व्यर्थ तो मूर्ख जाणा, मना मीपणें त्यासि रे! नर्क नाना।
मना! मीपणें पाहिं पर्मार्थ गेला, म्हणे वामना थोर अन्याय केला. ॥ ४०
मना! मीपणें यासि रे! गर्व मोठा, मना! नीच तूं अंतरीं भाव खोटा।
पडे जें मना! मीपणें या भ्रमाला, म्हणे वामना थोर अन्याय केला. ॥ ४१
मना! मीपणें शीवें तो जीव होय, मना! मीपणें लोपली ज्ञानसोय।
मना! मीपणें सर्वथा हा बुडाला, म्हणे वामना थोर अन्याय केला. ॥ ४२

१. धा. २. 'मोडी' असें तर मूलपद नसेल ना? ३. पाप. ४. अनेक प्रकारांनीं. ५. परमात्मा.

मना! सज्जना! टाकिती मीपणासी, स्वभावें जगामाजि तूं धन्य होसी।
तपोनी धन्या मीपणाशा ज्याला, म्हणे वामना थोर अन्याय केला. ॥ ४३
मना! मीपणें यासि रे! गर्व झाला, तयामाजि तो कामक्रोधू निघाला,।
घृतें शिंपिला व्रातला अग्नि जैसा, म्हणे वामना मीपणें होइ तैसा. ॥ ४४
मना! सर्वथा शोक चित्ता नसावा, सदोदीत तो हेत ब्रह्मीं असावा।
उदासी मनीं द्रव्यकांता न मानीं, म्हणे वामना मीपणें होय हानी. ॥ ४५
मना! तूं करीं हीत सर्वां भुतांचें, जनीं जाण तें मुक्तिचें गेह साचें।
न बोलें कदा अल्प तूं दुष्ट वाणी, म्हणे वामना मीपणें होय हानी. ॥ ४६
मना! घोर वाहे सदा सर्वकाळीं, मिळाला स्वयें कल्पनेचेनि मेळीं,।
बळें गुंतला मोहपाशीं अभागी, म्हणे वामना तो जिता नर्क भोगी. ॥ ४७
मना! निंद्य कर्मी सदा चित्त ज्याचें, न बोले कदा सत्य तें नित्य वाचे।
कुसंगीं अति प्रीत ज्यातें कुसंगी, म्हणे वामना तो जिता नर्क भोगी. ॥ ४८
मना! हीत ज्याचेमुळें जाण होय, करीं तेंचि तूं बा! धरीं ज्ञानसोय,।
कळेना तरी सर्व शोधोनि पाहें, म्हणे वामना काळ संनीध आहे. ॥ ४९
मना! जाणुनी कर्म त्वां आचरावें, जनाला रुचे तेंचि बापा! करावें।
परी अंतरीं शुद्ध होऊनि पाहें, म्हणे वामना काळ संनीध आहे. ॥ ५०
मना! देहयाचा[१] नको गर्व मानूं, सुखें आपल्या वैभवालागिं वानूं,।
अकस्मात जाईल कांहीं उरेना, म्हणे वामना हेत तूझा पुरेना. ॥ ५१
मना! द्रव्यदारादि[२] सर्वत्र पाहीं, तुला वाटतें यापरी कांहिं नाहीं।
गुरुअंजनावीण[३] माया विरेना, म्हणे वामना हेत तूझा पुरेना. ॥ ५२
मना! ज्ञान वैराग्य रे! तेंचि जाणें, असावी दया सर्वभूतीं समानें।
अनाथा दिनालागिं तूं पाळिं बापा! म्हणे वामना चूकवीं जन्मखेपा. ॥ ५३
मना! वादसंवाद बापा! नसावा, सदोदीत सद्भाव चित्तीं वसावा।
करीं कर्म ना, पाहिं तूं आत्मरूपा, म्हणे वामना चूकवीं जन्मखेपा. ॥ ५४
मना! पाहिं रे! सोस तो फोल होतो, असे संचितीं तेंचि तो देव देतो।
मतीहीन तो कां सदा घोर वाहे, म्हणे वामना हेंचि आश्चर्य आहे. ॥ ५५
मना! होय जन्मांतरीं पुण्यठेवा, नसे संचिल्या मागसी काय देवा?।
नसे दीधल्यावीण तें प्राप्त कांहीं, म्हणे वामना तूं विचारूनि[४] पाहीं. ॥ ५६

---

१. देहाचा. २. स्त्री. ३. डोळे स्वच्छ करणारें जालीम काजळ. ४. विचार करून.

मना! हिंडसी स्वर्ग मृत्यू विलोकूं, वृथा श्रामसी, कोण तूझा विवेकू ।
असंख्यात ब्रह्मांड शोधूनि पाहीं, म्हणे वामना दीधल्यावीण नाहीं. ॥ १७
मना! पाहिं रे! कोण कोठोनि आला, कसा भूलला वीषयीं लुब्ध झाला, ।
प्रपंचीं जया लागली फार गोडी, म्हणे वामना बंधनें कोण तोडी. ॥ १८
मना! देखतां देखतां मूर्ख होसी, अहंता जयाला गिळी काळराशी ।
तयाचे मुळें क्रोध निर्माण देहीं, म्हणे वामना नाठवे त्यासि कांहीं. ॥ १९
मना! शुद्ध जें ब्रह्म तें व्यक्त झालें, अहंतेमुळें त्यासि अज्ञान आलें ।
स्पृहा लागली द्रव्यकांतादिकीं ही, म्हणे वामना यामुळें मुक्ति नाहीं. ॥ २०
मना! बाल्य तारुण्य वृद्धत्व गेलें, विचारींच ना हीत म्यां काय केलें, ।
अहंता तुला काळ आवर्त मोठें, म्हणे वामना बांधि तूं ज्ञानपेटे. ॥ २१
मना! रे! तुला ज्ञान होईल जेव्हां, अहंता तुझी पालटे सर्व तेव्हां, ।
गुरूअंजनावीण कांहीं न भासे, म्हणे वामना पाहिं तूं सावकाशें. ॥ २२
मना! धर्म सोडूं नेको पाप जोडूं, यदर्थीं असे काय पां तुज कोडूं? ।
जलाचे परी लिप्त आलिप्त व्हावें, म्हणे वामना ब्रह्म होसी स्वभावें. ॥ २३
मना! रचना सर्व कोठूनि झाली, विचारींच ना तूज कां भूल आली, ।
चराचर ह्या निर्मिल्या चारि खाणी, म्हणे वामना देव तो साच मानीं. ॥ २४
मना! बोलती सृष्टिकर्ता विधाता, प्रतीपाळिता विष्णु तो अन्नदाता, ।
महारुद्र संहारिता सर्व कांहीं, म्हणे वामना सत्य आत्मत्व पाहीं. ॥ २५
मना! कर्मकर्ता असेची निराळा, तयापासुनी जाण हे सृष्टिलीला, ।
जशा बाहुल्या नाचवी खांबसूत्री, म्हणे वामना पाहिं तूं ज्ञाननेत्रीं. ॥ २६
मना! पिंड ब्रह्मांड आनंत कोटी, कसा चालवी लाघवी शक्ति मोठी, ।
न दीसे कदा कोंदली सर्व सृष्टी, म्हणे वामना पाहिं तूं ज्ञानदृष्टी. ॥ २७
मना! कर्म सोडोनियां एक देती, स्वयें ब्रह्म ऐसें मुखें बोलताती, ।
परी संपत्ती नासतां खेद पावे, म्हणे वामना ब्रह्म कैसें म्हणावें? ॥ २८
मना! तृप्ति नाहीं जया अंतरामीं, करी कर्म तें हेत संकल्प कामीं, ।
नसे बुद्धि निष्काम देहांतकाळीं, म्हणे वामना गुंतला मोहजाळीं. ॥ २९
मना! मी असें पाहिं तें कोण काय, कुठें जन्मलें, कोण तें बापमाय, ।

---

१. विचारीस नाहीं. २. पाण्यांतला भोंवरा. (आवर्तोऽम्भसां भ्रमः) ३. पोहते वेळीं कमरेस भोंपळा इत्यादि बांधतात ते. ४. दिसे. ५. धर्म व पाप या दोहींकडे 'नको' म्हणावें. ६. न असतां. ७. सकाम कर्मे करितो.

विचारूनियां मीपणा ठेवि ठायीं, म्हणे वामना यापुढें ज्ञान नाहीं. ॥ ७०
मना! वेदशास्त्रार्थ धुंडीं पुराणी, नसे देखिला थोरला देव कोणी, ।
तिन्ही देव निर्माण केले जयानें, म्हणे वामना पाहिं तूं आत्मज्ञानें. ॥ ७१
मना! आपल्यातें विचारूनि पाहें, न गुंतें कदा देह अनित्य आहे, ।
शिवाला जिवा लोभ तो या प्रसंगीं, म्हणे वामना लाविलें कर्म अंगीं. ॥ ७२
मना! जें घडे कर्म प्रारब्धयोगें, नको लिप्त होऊं अणूमात्र भोगें, ।
अहंता तुझी तूजला बद्ध झाली, म्हणे वामना पाहिं पर्मार्थ बोली. ॥ ७३
मना! देह तूझा नव्हे सत्य मानीं, वृथा भूलसी कोण वाटे शिराणी, ।
अनित्यासि आत्मा कसा युक्त होय, म्हणे वामना तूं धरीं ज्ञानसोय. ॥ ७४
मना! जाण रे! देह तो नाशवंत, निराकार आत्मा नसे आदिअंत, ।
घटीं सूर्यबिंबा जसा लेप नाहीं, म्हणे वामना तूं विचारूनि पाहीं. ॥ ७५
मना! जाण आत्मा असे ब्रह्मरूप, अविद्या देहे तोचि हा अंधकूप, ।
जया ज्ञान हें तोचि सज्ञान मानीं, म्हणे वामना तोचि कैवल्यदानीं. ॥ ७६
मना! ब्रह्मकर्मासि कोण्या प्रकारीं, देहेसंभ्रमें जेंवि कां पंथ चोरी, ।
देहातीत तो कर्म कां सत्य मानी, म्हणे वामना थोर वाटे शिराणी. ॥ ७७
मना! पद्म जें जन्मलें वारियोगें, परी लिप्त नाहीं अणूमात्र भोगें, ।
असें जाणुनी भूलती आत्मज्ञानी, म्हणे वामना थोर वाटे शिराणी. ॥ ७८
मना! ज्ञानचर्चा करीं दीनरातीं, जया शीकवी जाणतो बोध पाती, ।
मना! निश्चयें चीपयीं लुब्ध प्राणी, म्हणे वामना थोर वाटे शिराणी. ॥ ७९
मना! रे! जगीं या अलिप्तत्व पाहें, देहातीत आत्मा निराकार आहे, ।
देहे नास्तितां मानिती मूर्ख ज्ञानी, म्हणे वामना थोर वाटे शिराणी. ॥ ८०
मना! आपला भाव तो देव जाणें, नसे भाव ते भक्ति लाजीरवाणे, ।
धरी भावना एक सर्वत्र पाहीं, म्हणे वामना वेगळा देव नाहीं. ॥ ८१
मना! ज्ञान रे! तेंचि तूं ध्यान मानीं, मना! भाव रे! देव हा सत्य वानीं, ।
मना! देव संदेह तूं जाण बापा! म्हणे वामना यामुळें जन्मखेपा. ॥ ८२
मना! देव आकारिला भक्तराजें, तया लाविलें ध्यानभावार्थ ओझें, ।
कसा देतसे चिंतिलें सर्व कांहीं? म्हणे वामना भाव तो देव पाहीं. ॥ ८३
मना! भाव देहीं असे शुद्ध ज्याचा, जनीं जाण रे! तो असे भक्त साचा, ।
तयाकारणें देव आकारिलासे, म्हणे वामना चर्मचक्षू न भासे. ॥ ८४

---

१. अशाश्वत. २. पूर्वकर्मानुरूप. ३. आवड. ४. कमळ. ५. पाणी. ६. एकदम?

मना! मानवी देह पीं! थोर आहे, बहू संचितें जोडला तूज पाहें, ।
करीं ज्ञानचर्चा सदा सर्व कर्मी, म्हणे वामना वर्त तूं कां स्वधर्मी. ॥ ८५
मना! सज्जना! ज्ञानचर्चा करावी, तरी अंतरीं शुद्ध श्रीया धरावी, ।
विवेकें बहू अंतरा आंवरावें, म्हणे वामना हेंचि जीवीं धरावें. ॥ ८६
मना! मान्य जे त्यांसि तो मान व्हावा, सदा अंतरीं सद्गुरू तो भजावा, ।
जयानें तुला लाविली ब्रह्मगोडी, म्हणे वामना पाय त्याचे न सोडीं. ॥ ८७
मना! सद्गुरू तोचि देवाधिदेव, तयापासुनी ब्रह्मविद्या उपाव, ।
भवीं सागरीं तूज तारील साचा, म्हणे वामना तोडिं संदेह याचा. ॥ ८८
मना! रे! गुरूवीण तें काय जीणें? गुरूवीण तो दीन आत्मार्थ नेणें, ।
जगीं मोक्षदाता गुरू सत्य मानीं, म्हणे वामना पाहिं वेदीं पुराणीं. ॥ ८९
मना! जाण तो सद्गुरू मोक्षदानी, दया अंतरीं त्याचि आम्हां शिराणी, ।
नको चाट वाचाट गर्विष्ट कोपी, म्हणे वामना तो गुरू पापरूपी. ॥ ९०
मना! ज्या गुरूलागिं कामार्थ गोडी स्वयें, तो दुज्याची कशी भ्रांति फेडी? ।
कटीं बांधिल्या जेंवि पाषाण थोर, कसा वामना होय तो पैल पार? ॥ ९१
मना! रे! गुरू शिष्य कोट्यानुकोटी, नसे साध्यसाधन त्या हेत पोटीं, ।
गुरुद्वयें काजा करी शिष्य मोठा, म्हणे वामना तो गुरूची करंटा. ॥ ९२
मना! रे! गुरू जोण मोहप्रपंची, अतीआदरें पूर्ण भावार्थ संची, ।
देया सांग तो तो पिता आणि माय, म्हणे वामना त्या गुरू शर्ण जाय. ॥ ९३
मना! रे! गुरू तो अती जो निगर्वी, करी तो तुझें चिंतिले अर्थ पुर्वी, ।

---

१. वा! २. 'गा, अगा' या अर्थी. ३. परी(?). ४. भवसागरीं. ५. आत्मतत्व, आत्मस्वरूपाचें ज्ञान. ६. कंबरेला. या पद्यांत **निदर्शना** अलंकार आहे. ७. साध्य म्हणजे आत्मा व ब्रह्म यांचें ऐक्य करून घेणें, मोक्ष मिळविणें, आणि त्याला साधन म्हणजे स्वस्वरूपाची ओळख करून देणारें ज्ञान होय. हें साध्य आणि साधन शिष्यास समजून यावें हा हेतु गुरुस नसतो, किंवा समजून घ्यावें असा हेतु शिष्यासही नसतो. असले गुरुशिष्य कोट्यानुकोटी म्हणजे अनंत आहेत. पण त्यांस घेऊन काय करावयाचें आहे? ८. 'गुरु स्वीय काजा[साठीं] करी शिष्य मोठा' असा पाठ असता तर ही पंक्ति समजण्यासारखी आहे. मोठा म्हणजे श्रीमंत मनुष्यास शिष्यत्व देऊन आपलें स्वहित साधणारे गुरु केवळ नीच आहेत. असें पंडितांस सांगावयाचें आहे. वर जो पाठ दिला आहे त्यानें गणभंग होऊन अर्थही निष्पन्न होत नाहीं. ९. कामासाठीं. १०. नीच. ११. ज्ञाता. १२. मोहापासून उत्पन्न होणारा प्रपंच म्ह० संसार त्यांचा ज्ञाता गुरु आहे. १३. मूर्तिमंत दया आहे. १४. पुरवितो. तुला जें इष्ट आहे तें देतो व जो तुला गर्वरहित करितो, तो गुरु खरा होय. तो स्वतः ज्ञानाची मूर्ति असून मोक्षप्राप्तीचा उपाय म्हणजे साधन आहे. पंडित म्हणतात 'हें मी तुला सांगतों.'

तुला सांगतों ज्ञानमूलीं उपाय, म्हणे वामना त्या गुरू शर्ण जाय. ॥ ९४
मना! जो गुरू [1]रंकराजा समान, करी कर्म निष्कामबुद्धी [2]विधान, ।
जयाचे कळीकाळ वंदीति पाय, म्हणे वामना त्या गुरू शर्ण जाय. ॥ ९५
मना! [3]तीर्थ पाणी हि पाषाण देव, बरा धुंडुनी पाहिं सर्वत्र ठाव, ।
असे तोच पाषाण सर्वत्र पाहीं, गुरूवांचुनी वामना [4]मुक्ति नाहीं. ॥ ९६
मना! देव पाषाण रे! तीर्थ पाणी, तिथें गेलिया काय फीटे शिराणी? ।
गुरू बोलता चालता देव तीर्थी, म्हणे वामना चिंतिलें दे [5]समर्थी. ॥ ९७
मना! तीर्थ वाराणशी मोक्षराज, तिथें गेलिया चिंतिलें होय काज, ।
परी तोय पाषाण [7]तीजें दिसेना, म्हणे वामना मूर्ख तें उमजेना. ॥ ९८
मना! तूज विश्वास कोठेंच नाहीं, तयालागि उपासना सर्व पाहीं, ।
दिसे एक, आनेक कोठें दिसेना, म्हणे वामना मूर्ख तें उमजेना. ॥ ९९
मना! देशी दीवाकर देश द्रष्टा, तुझी मावळे [8]त्रीपुटी, सर्व चेष्टा, ।
तेंव्हां अंतरीं होतसे ऐक्य भावें, म्हणे वामना चिंतिली मुक्ति पावे. ॥ १००
मना! मुक्ति चौंवारि होतील दासी, तुझ्या दग्ध होतील रे! पापराशी, ।
अखंडीत स्वायंभु महावैभवीं, म्हणे वामना कल्पना पालटावी. ॥ १०१

---

१. रंक आणि राजास सारखाच. २. विधीनें? विधिपूर्वक? ३. तीर्थ म्हणजे नुसतें पाणी व देव म्हणजे दगडाच! ४. गुरूवांचून मुक्ति मिळणें नाहीं. पुष्कळ तीर्थयात्रा केल्या, पुष्कळ देवतांचें अर्चन केलें, पण गुरु केला नाहीं, तर तीर्थें आणि देव यांची पूजा केलेली निष्फल आहे. सारांश, गुरुमुखाशिवाय, गुरूपदेश झाल्याविना, तीर्थास तीर्थत्व म्हणजे पावनत्व नाहीं व देवास देवत्व म्हणजे मोक्षदातृत्व नाहीं. गुरुशिवाय तीर्थ हें नुसतें पाणी आणि देव म्हणजे नुसते दगड होत. ५. तीर्थाचें सामर्थ्य ज्यास आहे असा. ६. योग्य. ७. तिसरें. ८. त्रिपुटी म्हणजे दृश्य, द्रष्टा आणि दर्शन यांची त्रयी. पहावयाची वस्तु, पाहणार, आणि पाहण्याची क्रिया, अर्थात् कर्ता, कर्म आणि क्रिया हें त्रय व यांच्या चेष्टा मावळून जाऊन सर्व एकस्वरूप होतें. मान मात्र पाहिजे. देश आणि दिवाकर म्हणजे जेथें आपण वस्तु बघतों तें स्थान अथवा आकाश (Space) आणि दिवाकर म्हणजे ज्याकाली आपण ती वस्तु बघतों ती वेळ (Time). तात्पर्य, बघण्याची क्रिया अगर दर्शन होतें. ९. दृश्य? १०. ज्ञान, ज्ञेय, ज्ञाता. ११. तई? १२. चार. १३. अखंडित म्हणजे नित्य, नेहमी असणारें, ज्यास कधींही खंड नाहीं असें; स्वायंभु म्हणजे स्वतःसिद्ध अथवा शुद्ध. असें जें ब्रह्मानंद, जें ब्रह्माचें ऐश्वर्य, त्यांत लीन झालें असतां कल्पनेनें वासनेनें उलट झालीच पाहिजे, वासना नष्टच झाली पाहिजे. येथें गणभंग झाला आहे. १४. फिरावी, नाहींशी व्हावी.

मना! पाहिं रे! देव कोट्यानुकोटी, जयामाजि रे! कोणती भक्ति मोठी? ।
विचारूनियां सांडि तूं मूर्खचाळा, म्हणे वामना देव आहे निराळा. ॥ १०२
मना! देव अव्यक्त, तो व्यक्त नाहीं, दिसे व्यक्त तो जीवप्रपंच पाहीं, ।
निराभास निर्वैर जें ध्यान ज्याचें, म्हणे वामना तेंच कैवल्य साचें. ॥ १०३
मना! बोलतां खुंटल्या चार वाणी, असा देव तो कोण? ध्यानास आणी. ।
न दीसे तया ठाव ना कूळ नांव, म्हणे वामना सांपडे एक भाव. ॥ १०४
मना! एक जाणूनि ऊगाच राहें, तरी देव कां तूज सन्नीध आहे, ।
कदा ना पडे ठाउका द्वैतभावा, म्हणे वामना अंतरीं ओळखावा. ॥ १०५
मना! अंतरीं राहि अव्यक्त देव, तयावीण तो कोणता रिक्त ठाव? ।
जयाकारणें तीर्थयात्रेसि जासी, म्हणे वामना देव तो तूजपाशीं. ॥ १०६
मना! तीर्थयात्रेसि जाऊनि काय? कदाही तुझी भ्रांति कोठें न जाय, ।
अहा अक्षरा जाळुनी टाकि वेगीं, म्हणे वामना मुक्ति तूं शीघ्र भोगीं. ॥ १०७
मना! जें निराकार कैसेंनि ध्यासी? अरूपासि कां रूप तूं लावितोसी? ।
असे देव तो पंचतत्वांनिराळा, म्हणे वामना सांडि तूं मूर्खचाळा. ॥ १०८

---

१. विचार, शोध, करून. २. निराळे झालेलें, स्पष्ट झालेलें, व्यक्तिस्वरूप ज्याला आलें (Individualized) असें हे सर्व दृश्य (Phenomenon) जीवाचा प्रपंच आहे, म्हणजे अज्ञान मोहानें व्याप्त झालेल्या जीवानें हा प्रपंच म्हणजे पसारा उत्पन्न केला आहे; अर्थात् हें सर्व असत्स्वरूप होय, असें पाहावयास लाग; आणि जेथें कसलाही आभास नाहीं, जें शुद्धस्वरूपी आहे व जेथें वैर नाहीं, भेदबुद्धि नाहीं, असें जें ब्रह्म त्याचें ध्यान कर. तें ब्रह्मध्यान म्हणजे मोक्षच होय. ३. अव्यक्त, आभासरहित व निर्वैर कैवल्य म्हणजे परब्रह्मस्वरूप. ४. परा, पश्यंती, मध्य किंवा वैखरी. चार वेद. ५. एक भावना मात्र. ६. 'गा' या अर्थी. ७. द्वैतभाव म्हणजे जीव आणि परमात्मा हे भिन्नस्वरूपी आहेत अशी समजूत, तिला देव सांपडणार नाहीं. ८. रिकामा. ९. अक्षर या शब्दाला अर्थ 'भगवतो मायाशक्तिः क्षराख्यस्य पुरुषस्योत्पत्तिबीजम्, अनेकसंसारिजन्तुकामकर्मादिसंस्काराश्रयः अक्षरः' असा श्रीमच्छंकराचार्यांनीं भगवद्गीतांतर्गत पंचादश अध्यायांतील १६ व्या श्लोकावर भाष्य लिहितांना दिला आहे. पंडितांच्या मनांतही अक्षर म्हणजे परमेश्वराची माया असाच अर्थ असावा. अक्षरा वेगीं जाळून टाक म्हणजे मायेचा नाश कर. मग तुला लवकर मुक्ति मिळेल. १०. पृथ्वी, आप, तेज, वायु, आकाश. अर्वाचीन रसायनशास्त्रज्ञांच्या मतें या पांचांतून एकासही तत्व म्हणतां येत नाहीं. कारण पृथ्वी सुवर्णादिअनेकतत्वघटित आहे. आप हें प्राणवायु व जलोद्भव या वायूंनीं बनलें आहे. वायु (हवा) हा प्राणवायु, नाक्ष्योद्भव=(नैत्रोजन) व अंगारास्ल वायु (कार्बोनिक आसिड ग्यास) व इतर कांहीं पदार्थांचें मिश्रण आहे. तेजाचें स्वरूप अद्यापि बरोबर समजलें नाहीं. Heat is a mode of motion असें म्हणतात. आकाश म्हणजे केवळ पोकळी.

Mal 891.461 | V375K vol.3.



मना! देव डोळां दिसेना कदाही, जई तूजला अंतरीं ज्ञान नाहीं, ।
नये दावितां भेटवितां रूप ज्याचें, म्हणे वामना तेंचि कैवल्य साचें. ॥ १०९

मना! शीणले देव तीन्ही कळेना, पहा वेदशास्त्रीं कदा आढळेना, ।
तुझा दग्ध तो होय प्रपंचमेळा, दिसे वामना देव प्रत्यक्ष डोळां. ॥ ११०

मना! जाण माया अकारे प्रपंच, तयामाजि रे! एकसे उंच नीच, ।
तिन्ही देव इंद्रादि सर्वांस जाणा, नव्हे वामना मुख्य तो देवराणा. ॥ १११

मना! रे! तिन्ही देव, ते आदिमाया, तयांला असे लागली जीवकाया, ।
जरा मृत्यु इत्यादिकें त्यास पाहें, म्हणे वामना देव कैसेनि होये? ॥ ११२

मना! रे! तिन्ही देव निर्माण होती, महाकल्पकाळीं क्षया पावताती, ।
तसे थोरला देव तो, जन्मनासे, म्हणे वामना दृश्य मांया विकासे. ॥ ११३

मना! दृश्य ते जीव प्रपंचमेळा, तया बोलिजे जाण हे सृष्टिलीला, ।
क्षणी मानिसी त्यांसि देवत्वभावें, म्हणे वामना अंतरीं ऊमजावें. ॥ ११४

मना! रे! जळीं होय जैसा तरंग, दिसे पां तयामाजि नाना सुरंग, ।
तया जाण आकार ब्रह्म(हीं?) जयासीं, म्हणे वामना पाहिं; कां भूललासी?॥ ११५

मना! रे! तुवां देहभाव त्यजावा, देहातीत आत्मा मनीं ऊमजावा, ।
देहाभास हा जैंनि वारीं तरंग, तसा वामना देह आत्म्यास संग. ॥ ११६

मना! देहार्पणीं पाहसी आत्मरूपा, तसें ज्ञानयोगें दिसे ब्रह्म बापा! ।
देहातीत होऊनियां शुद्ध भावें, म्हणे वामना ब्रह्म तें ऊमजावें. ॥ ११७

---

अर्वाचीन मताप्रमाणें आजपर्यंत ६७ तत्वें सांपडली आहेत. पैकी सुमारें १३ अधातु व बाकीचीं धातुरूप आहेत.

१. स्वस्वरूपाचें ज्ञान. २. कल्पना करितां. ३. मोक्ष. ४. जो? ५. अकारें, स्वरूप येतें. ६. प्रपंचामध्यें लहान मोठें असा भेद आहे. ७. समजा. ८. जीव आणि काया. ९. 'कल्पो ब्राह्मयहः प्रोक्तं शर्वरी तस्य तावती.' कल्प म्हणजे ब्रह्मदेवाचा एक (अहोरात्र) दिवस होतो. या अहोरात्रांत १४ मनु होतात. 'युगानां सप्ततिः सैका मन्वंतरमिहोच्यते.' चार युगें मिळून एक, असे सत्तर पर्याय झाले म्हणजे एक मन्वंतर होतें. (आन योंत कृतयुगाचीं वर्षें मिळविलीं पाहिजेत. याला संधी म्हणतात.) एका कल्पांत १५ संधी होतात. एका कल्पांत मनुष्यांचीं वर्षें किती या संबंधानें मतभेद दिसतो. असले ३० कल्प आहेत. हल्लीं श्वेत वाराहकल्प चालला आहे. १०. त्याला जन्म नाहीं. ११. माया दृश्य विकासते जें दृश्य तें मायेनें निर्मित आहे. १२. लाटा. १३. चांगले रंग. १४. देहापलीकडील. १५. जसा. १६. जल आणि तरंग यांचा जो संबंध, तोच आत्मा व देह यांमध्यें आहे.

2292 dt 18.4.57

मना! मानवी दानवी देवयोनी, असंख्यात ज्या वर्णिल्या कां पुराणीं, ।
तयाविगळा, तोचि सर्वांसि मूळ, म्हणे वामना त्यासि ना नांव कूळ. ॥ ११८

---

## ९. नाममहिमा.

(श्लोक.)

येणेंचि अंत्यजहि सर्ववरिष्ठ होतो, जिव्हेंत जो हरि! तुझें धरि नाम हो! तो ।
केलें तिहींच तप टाध्ययनादि सारें, नामें तुझीं वदति जे निगमार्थसारें. ॥ १
नेटूनि दुःख तरुतें गळतीच पानें भक्षूनि, कीं पवनही जलमात्रपानें ।
केलें तिहींच तप टाकुनि काम्य सारें, नामें तुझीं वदति जे निगमार्थसारें. ॥ २
टाकूनि मान अभिमान महातपातें, सोसूनि वर्षे हिमें आणिक आतपातें ।
वाकायचित्ति तप आचरिलेंचि सारें, नामें तुझीं वदति जे निगमार्थसारें. ॥ ३
वेदासि थोरपण[17] हें श्रुति हेंचि वर्णी कीं, विष्णुनामचि असे प्रतिवेदवर्णी ।
एवं तदध्ययन त्यांस घडेचि सारें, नामें तुझीं वदति जे निगमार्थसारें. ॥ ४
वेदांमधील अनुलक्षुनि अर्थ साचा, जो कां अबाधित हरि श्रम मानसाचा ।
तो बोलतांचि घडलें अजि! त्यांस सारें, नामें तुझीं वदति जे निगमार्थसारें. ॥ ५

---

१. राक्षसी. २. परमेश्वर. ३. हरिनामसंकीर्तनाचा प्रभाव किती जबरदस्त आहे हें सांगण्यासाठीं पंडितांनीं हें काव्य रचिलें आहे. यज्ञयागादिक करून, सर्वस्व दान करून, वेदशास्त्रांचें अध्ययन करून, योगाभ्यास करून, तीर्थाटणें करून जो जो पुण्यसंचय होतो, तो हरिनामसंकीर्तन केल्यानें साध्य होतो, इतकेंच नव्हे, तर नामस्मरणानें अतिनीचमानवयोनींतील पुरुषासही श्रेष्ठत्व प्राप्त होतें, हा विषय पंडितांनीं या काव्यखंडांत ग्रथित केला आहे. पहिल्या आठ श्लोकांतील शेवटचा चरण 'नामें तुझीं वदति जे निगमार्थसारें' हाच आहे, म्हणून आपण यास 'नामाष्टक' असें म्हणूं या. ४. या भाषांतररूप श्लोकाचा मूळ संस्कृत श्लोक असा आहे:—'अहो बत श्वपचोऽतो गरीयान् यज्जिह्वाग्रे वर्तते नाम तुभ्यम् । तेपुस्तपस्ते जुहुवुः सस्नुरार्या ब्रह्मानूचुर्नाम गृणन्ति ये ते ॥'. ५. अतिशूद्र. ६. वेदाच्या अर्थांचें सारच अशीं नामें. ७. न देऊन. ८. गळालेलीं. ९. वृक्षापासून आपल्या मतें गळलेलीं पानें व वायु भक्षून आणि फक्त पाणी पिऊन. १०. प्राशनानें. ११. काम्य म्हणजे आपल्यास सुख प्राप्त व्हावें या इच्छेनें केलेलें जें कर्म तें. १२. मोठ्या तपातें. १३. पर्जन्य. १४. शीत. १५. ऊन. १६. कायावाचामनेंकरून. १७. वेदांस जें महत्त्व प्राप्त झालें आहे तें हरिनामामुळेंच होय. १८. वेदाच्या प्रति अक्षराचे ठिकाणीं. १९. वेदाध्ययन. २०. कांहीं दोष न ठेवितां पूर्णत्वानें हरण करितो. २०. वेदाचा अर्थ सांगितला असतां जें पुण्य मिळतें, तें सर्व. २१. वेदाचा अर्थ सांगितला असतां जें पुण्य मिळतें, तें सर्व.

यज्ञादिका सकळ आचरले क्रिया ते, ते राजसूय यजिती हयमेधयाजे ।
पृथ्व्यादि दानहि तयां घडलेंचि सारें, नामें तुझीं वदति जे निगमार्थसारें. ॥ ६
आजन्म जाउनि सितासितसंगमासी, केलें तिहीं सविधि मंजन माघमासीं ।
तीर्थाटणीं वय तिहीं क्रमिलेंचि सारें, नामें तुझीं वदति जे निगमार्थसारें. ॥ ७
जे थोर या त्रिभुवनांत अजी गणावे, जे थोर त्यांपरिस थोरहि ते म्हणावे, ।
श्रेष्ठत्व तें त्रिभुवनांतिल त्यांसि सारें, नामें तुझीं वदति जे निगमार्थसारें. ॥ ८
नामें स्फुरे तनु समग्र मनांत जेव्हां, मंदाकिनी पदनखांत दिसेल तेव्हां ।
व्यापूनि नाम असणार समस्त अंगा, त्याची कशी सरि करी चरणांबुगंगा? ॥९

प्रतिश्लोकीं नामें अजितयशपीयूषभरितें,
असें जें वाचेचें विभव, हरि तें विश्वदुरितें ।
नसे ज्याहीमध्यें बहु बरि जरी काव्यरचना,
भले गाती ध्याती श्रवण धरिती त्याच वचना. ॥ १०

---

## १०. वामनबोध.

(श्लोक.)

मुकुंदप्रतापा न जो गोड वाणी, तया निंदिजे नेणत्या गाढवांनीं, ।
यमाच्या भटांची बसे लात त्याला, शिरीं पापरूपीच भेलें तयाला. ॥ १
न गर्जती जे हरि गोड वाचे, ते पापरूपें नर गाढवाचे, ।
न ओतळावें अजि! त्या शवातें, चिंतीच ना जो नर केशवातें. ॥ २
कीर्तनीं अजि पुढें बसवा हो! न्यायके तरि दुजा बसवा हो! ।

---

१. यज्ञयागादिक क्रिया. २. अश्वमेधरूपी यज्ञ. ३. गंगायमुनेच्या संगमास. सित म्हणजे पांढरी, शुभ्र; असित म्हणजे काळी. गंगा शुभ्र व यमुना काळी. यांच्या संगमास, प्रयागास. ४. विधियुक्त स्नान. ५. नामस्मरणानें मनुष्य थोरापेक्षांही थोर होतो. ६. विष्णूची तनु. ७. भागीरथी. ८. चरणापासून निघालेली गंगा शरीराच्या एकदेशी म्ह० पायांत असणारी, पण नाम सर्वशरीरी पसरणारें म्हणून गंगा नामाची बरोबरी करूं शकत नाहीं. ९. याचा मूळ श्लोक असा आहे:—'तद्वाग्विसर्गो जनताघविप्लवो यस्मिन्प्रतिश्लोकमबद्धवत्यपि । नामान्यनन्तस्य यशोंकितानि वै शृण्वंति गायंति गृणंति साधवः ॥'. १०. अजित जो ईश त्याच्या यशरूप अमृतानें भरलेलीं. ११. वाग्विलास, काव्य. १२. महत्पापें. १३. रस व अलंकार यांची शोभा ज्यांत बरी नाहीं अशीं भगवद्यशाचीं काव्यें भले गातात वगैरे. १४. एकाग्र चित्तानें. १५. वर्णी, वर्णन करी. १६. शिपायांची, दूतांची. १७. ओझें. १८. नररूपी रासभच. १९. स्पर्शावें. २०. बैल, नंदीच!

तो बरा पशुहि अनुभवाचा, हा नराधम कैसा विभवाचा. ॥ ३
ईश्वरें तुज दिली नरकाया, साधनें करिशि कां नरका या? ।
ऐशियास यम केंवि न जाची, मूर्ति इष्ट न जयासि अजाची. ॥ ४
लत्ताप्रहार वदनीं अतिगाढ वांचा, हा यत्न गाढविनिमित्तचि गाढवाचा ।
हीले निमेष, इतुक्यांतहि भोग झाला, ऐशा सुखें कुनर हो! न भजा अजाला. ५
ज्याच्या कदापि न रिघे उरुगाय कानीं, गातां मुकुंदचरितामृत गायकानीं ।
तो तों श्वशूकरखरोष्ट्रसमान होतो, वाहे वृथा नरपणें अभिमान हो! तो. ॥ ६
हाडिहाडि म्हणतांहि न राहे, श्वानबुद्धि विषयांत नरा हे, ।
ग्रामशूकर असा वळखा तो, कीं अमंगळचि केवळ खातो. ॥ ७
केल्या मऊ न गिळवेच कठोर कांहीं, तो उष्ट्र खाय वदनीं वनकंटकांही[12] ।
सोपा फुका न रुचतो मधुकैठभारी[13], घे इष्ट भोग सुख मानुनि कोरभारीं. ॥ ८
सुमनसेज, सदुद्भव, अंगना, बहुत मान्य जना अणि दे धना ।
सुत विनीत, रमा, सकळा कळा, मजसमान दुजा नच सोहळा. ॥ ९
निगमेचिद्रस साधुमुखें मिळो, नवविधा भजनें ममता गळो, ।
मरणजन्मसमूळ मृषा[21] टळो, स्वपद चिन्मय केवळ ओतळो[22]. ॥ १०
अन्नाविणें विकळ देह, म्हणाल, होतो, भिक्षाटणें भंजन[23] हेतचि तोचि होतो, ।
तें तों मिळेल म्हणतो शुक या वरी कां, ज्ञाते भले भजति दुष्ट धनांध लोकां? ॥ ११
कोठें मिळे न जरि भिक्षेहि त्या प्रकारीं, बोला तरू नसति कां फळ क्षिप्रकारी? ।

---

१. अनुभवानें शहाणा होणारा. 'यान भवाचा' असा पाठ दुसरीकडे आहे. २. मोक्षाचा नाश करणारा विषय, त्याला गुरफटून राहणारा. ३. परमेश्वराची. ४. वाणी; मोठ्यानें ओरडणें. ५. संपलें. ६. सुखामध्यें गुंग झालांत म्हणून सुखासाठीं. ७. ज्याची स्तुति अतिविस्तृत, मोठी. ८. हड, हड. ९. गेल्याशिवाय राहत नाहीं. १०. ओळखा. ११. कठिण, मऊ केलें तरी. १२. रानकांटे. १३. मधुकैठभ नामक असुरांचा शत्रु व हननकर्ता विष्णु. यत्न केल्याशिवाय केवळ चिंतनानें प्राप्त होणाऱ्या भगवंताचा तिरस्कार करून दुःखमय विषयांस सुख मानणारा मनुष्य उंटाप्रमाणेंच होय. हा दृष्टांत समर्पक आहे. १४. शुद्धकुळांमध्यें. १५. पुष्पशय्या. १६. कुलीन. १७. स्त्री. १८. नवव्या श्लोकांत ऐहिक ऐश्वर्य वर्णिलें आहे. 'यदि रामा यदि च रमा यदि तनयः सुविनयगुणोपेतः । तनये तनयोत्पत्तिः सुरवरनगरे किमाधिक्यम् ॥' याचें ही हेंच तात्पर्य आहे. १९. वेदांतामृत. २०. भक्ति नऊ प्रकारची आहे. 'श्रवणं कीर्तनं विष्णोः स्मरणं पादसेवनम् । अर्चनं वंदनं दास्यं सख्यं आत्मनिवेदनम् ॥ इति पुंसार्पिता विष्णौ भक्तिश्चेन्नवलक्षणा. (भागवत–सप्तमस्कंध अ० ५.) असल्या नवविध भक्तीनें ममत्व नष्ट होवो. २१. खोटें. २२. प्राप्त होवो. २३. भोजन. २४. भिक्षा. २५ लवकर देणारे.

ऐसें असोनि, वदतो शुक या वुरी कां ज्ञाते भले भजति दुष्ट धनांध लोकां ? ॥ १२
पाणी अगत्य, परि पात्र नसे, अपेक्षा याची भले न धरिती, करिती उपेक्षा ।
कोणीं नद्या शुक म्हणे न निरोधिल्या, कां ज्ञाते भले भजति दुष्ट धनांध लोकां? ॥ १३
सहावया मठ गृहादिक ते असावे, याकारणें जरि धनाढ्यगृहास जावें ।
कोणीं गुहा शुक म्हणे न निरोधिल्या, कां ज्ञाते भले भजति दुष्ट धनांध लोकां? ॥ १४

वृथा हिंपुटी कासयालागिं होतां ? गृहीं आयता मोक्ष लाभे स्वहस्ता, ।
वदा एक सांगों तशा साधनाला, मुखीं रामचंद्र स्मरा वेळवेळां. ॥ १५
स्नुषा पांडुची द्रौपदी राजकन्या, मुखें कृष्णनामें स्मरे लोकमान्या, ।
सभेमाजि वस्त्रप्रदाता तियेला, मुखीं रामचंद्र स्मरा वेळवेळां. ॥ १६
बुडो हे धरा कीं लया विश्व जावो, पडो काळहस्तें शिरीं वज्रघावो, ।
विसंबेंचि ना सर्वथा नाममाळा, मुखीं रामचंद्र स्मरा वेळवेळां. ॥ १७
नका योग मांडूं; नका प्राण कोंडूं; नका द्रव्य, दारा, घरें, भोग सोडूं; ।
नका कष्टुनी पर्वताग्रीं तपाला, मुखीं रामचंद्र स्मरा वेळवेळां. ॥ १८
वधू गौतमाची पतीशापडोहीं, बुडाली अथांवीं शिळारूप होई, ।
पदीं उद्धरी जो विरिंच्यात्मजेला, मुखीं रामचंद्र स्मरा वेळवेळां. ॥ १९
रघूनाथकाजीं झिजे देह ज्याचा, न त्या प्राप्त बोलों शके वेदवाचा, ।
जटायू विमानीं सुखी बैसवीला, मुखीं रामचंद्र स्मरा वेळवेळां. ॥ २०
फळें भिल्लिणी वेंचितां गात ओवी, झिंभे गोड तें राघवालागिं ठेवी, ।
तिच्या आवडीलागिं भक्षी भुकेला, मुखीं रामचंद्र स्मरा वेळवेळां. ॥ २१
प्रतापें जळीं नाम तारी शिळेतें, रणीं भीडतां येश गोळांगुळातें; ।
नसे ताप ज्याला रुचे नाममाळा, मुखीं रामचंद्र स्मरा वेळवेळां. ॥ २२

---

१. भांड्यावी जरूरी. २. आडवून ठेविल्या. ३. कष्टी. ४. मोक्ष मिळेल लढा. ५. वस्त्रहरणाचे वेळीं वस्त्रें पुरविणारा. ६. काळहातें. ७. विसंबूं नको. ८. यज्ञ. ९. योगाभ्यास करून प्राण कोंडूं नका. १०. करूं नका. ११. अहल्या, गौतमऋषीची पत्नी. १२. ज्यास तळ नाहीं अशा डोहांत. अगाध डोहींत. १३. ब्रह्मदेवाची कन्या अहल्या इला. १४. जटायूचा. १५. यथार्थ बोलणाऱ्या वेदांस त्याची स्तुति बरोबर करितां येईना. १६. शबरी. १७. तें बोर. १८. सिर्फ समाधान न करण्यासाठीं. १९. सेतू बांधितेवेळी दगड तरले, कारण त्यांवर रामनाम कोरलें होतें. २०. यश. २१. वानरांतें.

अशा निश्चयें वामनें या मनाला, सुखप्राप्तिलागीं असा बोध केला ।
म्हणूनी तुम्हां प्रार्थितों भाविकांला, सुखीं रामचंद्र स्मरा वेळवेळां. ॥ २३

---

## ११. सिद्धांत.

(सवाई वृत्त.)

प्राप्तिलियाविण दुःख तसें सुख, निश्चय हाचि जयासि कळे,
एक तदीय मुकुंदपदीं स्थिर होउनि चित्त कधीं न ढळे; ।
श्रीहरिभक्तिच दुर्लभ, आणिक होणार तें न कदापि टळे,
यत्न तयासि वृथा करितां, वय चाळणिचें जळ जेंवि गळे. ॥ १
दुःखचि तें सुख मानुनि, इच्छिति तें, सुख आपण हें न कळे,
तोंवरि तें न कळे सुख जों मन श्रीगुरुचे चरणीं न मिळे; ।
बाह्यसुखा धरितांहि न सांपडे दूर जसें मृगनीर पळे,
याकरितां वय, हें म्हणे वामन ओंजळिचें पय जेंवि गळे. ॥ २

---

१. या प्रकरणांत प्रथमतः नामस्मरण न करणारांचा निषेध करून नंतर नामस्मरणानें कोण कोण तरले त्यांचा नामनिर्देश केला आहे. प्रसंगानुसार विषयसुखाचा निषेधही केला आहे. धनांध लोकांचें भजन कित्येक उदरपूरक लोक करितात, त्यांस भिक्षा मागून अगर वनांत राहून पोट भरावें असा उपदेश केला आहे. ऐहिकसुखांचा पंडितांनीं किती संकोच केला होता हें ११ ते १४ श्लोकांवरून दिसतें. नामस्मरणाविषयीं त्यांचा केवढा आग्रह होता हें १७ व्या श्लोकांत स्पष्ट दिसत आहे. आपल्यास सुख झालें तसेंच इतरांस नामस्मरणापासून सुख व्हावें अशी पंडितांची स्पृहणीय कळकळ अनुकरणास पात्र आहे असें कोण म्हणणार नाहीं? २. त्याचें. ३. चाळणीचें जळ जेंवी, तेंवी वय गळे (नाहींसें होतें). या उपमेनें भवितव्यतेशीं झगडणें किती दुष्कर आहे हें दर्शविलें आहे. सुखदुःखें आगंतुक आहेत, यदृच्छेनें येतात; तीं आपल्या स्वाधीन नाहींत व भवितव्यता कधींही टळावयाची नाहीं हा पहिला सिद्धांत होय. म्हणून मनुष्यानें हरिभजन करावें; कारण तें आपल्या स्वाधीन आहे. मनुष्य मायापाशानें मोहित होतो म्हणून मात्र भक्ति दुर्लभ आहे. ४. मृगजळ. ५. बाह्यसुखें मृगजळाप्रमाणें फसविणारीं असून नेहमी दूर पळणारीं आहेत. त्यांच्या प्राप्त्यर्थ कालक्षेप करणें हें ओंजळींत पाणी धरून ठेवण्यासारखें व्यर्थ होय. प्राकृत मनुष्य मूलतः दुःखरूपी असणाऱ्या विषयांस सुखदायी असें मानून त्यांपासून खरी सुखोत्पत्ति व्हावी अशी आशा धरितो! त्या बिचाऱ्याला ठाऊक नाहीं की आत्मस्वरूपज्ञानांतच सुख आहे! हें माहित होण्याला सद्गुरूची कृपा झाली पाहिजे. बाह्यसुखें दुःखमूलक व दुःखपर्यवसायी आहेत हा दुसरा सिद्धांत.

विश्व जगांत अहंममते करि, मा खल सर्व जनास असे,
श्रीहरि! तूं धन ज्यांस तयांस हे आतळतील मनेंहि कसे? ।
मागितल्याविण, भीड न मानुनि, देतिल सत्वगुणासरिसे,
तें तरि दान तुझें, जगदात्मक तूं, तुजवांचुनि कोण असे? ॥ १
एक शरीर अहंममतास्पद, तें विकिलें तुजलागिं हरी!
आत्मसुवर्ण चराचरमुद्रित घेतलें वित्त दिगंतभरी; ।

---

१. बाह्यसुखाचें साधन द्रव्य व आत्मसुखाचें साधन ईशभक्ति हीं अनुक्रमें लोकांस व भक्तांस कवडीचुंबक व दानशूर कशी करितात ह्याचें आविष्करण पंडित करितात. 'जगांत विश्व अहंममते करि, सर्व जनास मा खल असे; श्रीहरि! ज्यांस तूं धन तयांस हे (जन) मनेंही कसे आतळतील? ते (तूं ज्यांचें धन ते) तुझें दान मागितल्याविण (व) भीड न मानुनि सत्वगुणासरिसे देतील. तूं जगदात्मक (आहेस), तुजवांचूनि कोण असे?'–हा अन्वय. मनुष्य बाह्यसुखाला लोभावला म्हणजे तो द्रव्यार्जनाची खटपट करितो. कारण द्रव्याशिवाय विषयसुख मिळत नाहीं. विषयसुखें मिळूं लागण्याचें मुख्य साधन जें द्रव्य तें मिळूं लागलें म्हणजे अहंममता उत्पन्न होते. 'हें माझें, तें माझें' असा अभिमान उत्पन्न होतो. जगांत जे खल (दुष्ट) लोक होतात त्याचें कारण मा म्हणजे लक्ष्मी (वित्त) होय. 'हें माझें, हें मी तुला देणार नाहीं' अशा प्रकारचा दुष्टपणा जगांत दिसतो त्याचें कारण द्रव्य होय. आतां भगवंता! तूंच ज्यांचें धन म्हणजे तूंच ज्यांचें सुखाचें ठिकाण, अशा तुझ्या भक्तांला हे दुष्टजन मनानें तरी स्पर्श करूं शकतील काय? गांठचा एक पैसा हरवला तर ज्यांचा प्राण कासाविस होतो अशा दुष्ट लोकांना भगवद्भक्तांचें स्वरूप मनानें तरी आकळितां येईल काय? जे भगवद्भक्त ईश्वराचें दान (ईश्वरविषयक ज्ञान) कोणीं मागितलें नाहीं तरी मुबलक देतात व ज्यांस हें दान करितांना कांहीं एक संकोच वाटत नाहीं, असे तुझे भगवद्भक्त तुझेंच दान करितात असें नाहीं, तर तुझ्याबरोबर सत्वगुणाचें सात्विक गुणांचें दान करितात! म्हणजे लोकांस ईश्वरभजनीं लावून ते भक्त पुनः त्यांस सात्विकही करितात. असल्या दानशूर पुरुषांचें आचरण, त्या वेड्या कवडीचुंबकांस काय समजणार? देवा! तूं विश्वंभर आहेस व अद्वितीय आहेस; तेव्हां तुला ज्यांनीं आपलें धन सर्वस्व केलें ते महाभगवद्भक्त दानशूर झाले यांत काय आश्चर्य आहे? सर्व विश्वच ज्यांच्या ताब्यांत आलें ते लोक दानशूर होतीलच. २. अहंममता म्हणजे अहंकार, स्वाभिमान याचें आस्पद (ठिकाण, जागा) मीपणाचा अभिमान राहण्याची जागा जें माझें शरीर तें भगवंता! तुला विकिलें, आणि मोबदला काय घेतला? तर चराचरमुद्रित (स्थावरजंगमाची मुद्रा ज्याच्यावर झाली आहे, सर्व वस्तूंचा ज्यांत अंतर्भाव होतो आहे, असें) आत्मसुवर्ण (आत्मस्वरूपाची पूर्ण ओळख हेंच सुवर्ण) हें दिगंतभरी (सर्व विश्वाचा समावेश करणारें) वित्त (धन, सौख्य) घेतलें. म्हणजे माझेपणाचा अभिमान उत्पन्न करणारे शरीराचा त्याग करून त्याच्या मोबदला 'सर्व विश्वच मी आहें' असा परिचय करून देणारें जें आत्मस्वरूपाचें ज्ञान तें मीं मिळविलें. सारांश, माझ्या शरीरावरचा अ-

त्यांत जिणें, मरणें, सुख, दुःखहि; चिंतन कां मज या उपरी।
आपण अश्व जसें विकिलें मग एक बसो अथ दोघें[1] वरी. ॥ ४
जेथवरी[2] मन धांवडिसी तरि त्याहुनि तूंच पुढें असती,
ऐसें असूनिहि एक शरीर तुं आपुलें मानुनियां बसती!।
दीसत सर्व अविद्यहिपूर्वक, शुक्तिवरी रजता भुलसी,
नास्तिक हें सुख दुःखहि मानुनि बा! कवणावरि रे! रुससी. ॥ ५
एकघटीं[3] नभ तें सकळां घटिं, तेंचि मठीं नभ हेंचि खरें,
जाणसि आत्मशरीर जसें, जग जाणुनि सर्वहि पाहिं बरें।

---

भिमान नाहींसा होऊन मी ब्रह्मस्वरूपी झालों. अशी स्थिति झाल्यावर त्यांत (त्या शरीरांत) जिणें (जिवंत राहणें) मरणें, सुख किंवा दुःख उपभोगणें यांची चिंता मीं कां करावी? आपण घोडें विकून टाकल्यावर मग त्यावर एकजण बसेल, कां दोघे बसतील याची चिंता करणें जसें मूर्खत्वाचें दर्शक होय, तशीच या भगवंताला विकलेल्या शरीराला जन्ममरण, सुखदुःख वगैरे येतात कीं काय ही भ्रममूलक चिंता अज्ञानमूलक होय. येथें शेवटच्या पंक्तींत उपमा अलंकार झाला आहे. सिद्धांत हा कीं स्वस्वरूपाची खरी ओळख झाल्यावर शरीरास्त्वरचा अभिमान व्यर्थ होतो.

१. दोघे. २. सिद्धांती जीवास सांगतोः—जेथपर्यंत तूं आपलें मन धांवडशी, त्याच्याही पुढें तूं आहेस. म्हणजे तुझ्या मनाची गति जेथपर्यंत पोहोंचूं शकते, त्याच्याही पुढें जीवा! तूं आहेस. सारांश सर्व विश्वामध्यें तूंच भरलेला आहेस. असें असतांही एक साडेतीन हाताच्या देहाला मात्र 'हें माझें' असें म्हणतोस याला काय म्हणावें? हें सर्व दीसत (दृश्य) अविद्यापूर्वक (मायापूर्वक, माया ज्यांत प्रथम आहे असें) आहे. हें सर्व दृश्य विश्व मायेच्या योगानें भासमान होत आहे आणि तुला भुलवीत आहे. कसें? तर शुक्तीवर (शिंपल्यावर) रजताचा (रुप्याचा) आभास होऊन जसे लोक भुलतात, त्याप्रमाणें हें सर्व दृश्य विश्व भासमान असूनही त्याला तूं खरें मानतोस आणि फसतोस! आणि नास्तिक (न असणारें, वास्तविकरीत्या नसणारें असें) जें सुखदुःख त्याला मानुनि (खरें समजुनि) रुसतोस! (रागावतोस!) बाबा-कोणावर तूं रागावणार? सर्व मायेचा पसारा आहे, सुखदुःखें खरीं नाहींत, असा सिद्धांत असतांना जर तूं रागावलास तर मूर्ख कोण बरें? शिवाय जर सर्व विश्वभर तूंच पसरला आहेस व केवळ भासमान होणारीं सुखदुःखें असत्य आहेत, तर तुझें रागावणें मूर्खत्वदर्शकच होय. या श्लोकांत 'तूं जगद्व्यापी आहेस व सुखदुःखें भासमान आहेत' हे दोन सिद्धांत आहेत. ३. याच सिद्धांताचा अनुवाद करितातः—'एका घरामध्यें जें आकाश आहे, तेंच सर्व घरांत आहे व तेंच आकाश मठांत म्हणजे सर्व ठिकाणी आहे, हा खरा सिद्धांत होय.' त्याचप्रमाणें तुझ्या देहांत जो आत्मा आहे तोच आत्मा सर्व विश्वांत भरलेला आहे. म्हणून सिद्धांती म्हणतो, 'हे जीवा! जसें तूं आत्मशरीर जाणतोस म्हणजे स्वदेहाची जशी तुला पूर्ण

भेदहि मीतुंपणें अभिमानचि, जाणसि तें कि नसे दुसरें?
तेंचि तुं जाण तैसें म्हणे वामन होसिल ब्रह्मचि एकसरें. ॥ ६

भास असत्यचि सत्य तुं मानुनि दीसत सत्य असोनि पैहाना?
टाकुनि सर्पभयास मनांतुनि निर्भय दोर धरूनि रहाना? ।

---

ओळख झाली आहे व तें आत्म्यानें व्यास आहे असें तुला कळतें, तशीच सर्व जगाची ओळख करून घे व त्यांत तुझाच आत्मा भरलेला असें पहावयास लाग. जीवा! मी, तूं हा जो भेद भिन्नभाव, उत्पन्न होतो, याला कारण अभिमान होय. या भेदभावाला दुसरें कारण नाहीं तर हें तूं जाणतोस काय? जाणत नसशील तर भिन्नभावाला अभिमानाशिवाय दुसरें कांहीं कारण नाहीं हें जाण, समजून घे. हें तुला समजल्याबरोबर व तुझा अभिमान विगलित झाल्याबरोबर तूं एकसरें ब्रह्मचि होशील म्हणजे भेदाभेद नष्ट होऊन तूं ब्रह्मपदाप्रत पावशील. जसें नभ विभु (सर्वव्यापी) आहे, तसाच आत्माही सर्वव्यापी आहे. असें असतांना एक शरीरावरच अभिमान उत्पन्न होऊन भेदाभेदबुद्धि उत्पन्न होते, याचें कारण 'आत्मा सर्वव्यापी आहे' हें तत्त्व कळत नाहीं म्हणून होय. तात्पर्य, सर्व दिगंतर आत्मा पसरला आहे हें तत्त्व येथें सांगण्याचा पंडितांचा उद्देश आहे. आत्माच जर सर्वव्यापी, तर अभिमान तरी कसला व भेदबुद्धि तरी कोठून येणार?

१. त्याबरोबर. २. पुनः मनुष्याचे अज्ञानाचा उल्लेख करून सिद्धांती म्हणतो, 'जीवा! भास असत्यचि तूं सत्य मानुनि दीसत सत्य असोनी (तूं) पहाना (कां पाहत नाहींस)? म्हणजे हें भासणारें जगत् वास्तविक असत्य आहे, तात्पर्य याला अस्तित्वच नाहीं, असें असूनही त्या जगताला तूं सत्य मानितोस, आहे असें कां समजतोस? सारांश खोट्या वस्तूला तूं सत्य मानतोस; आणि दिसणारें (ज्ञानदृष्टीला गोचर होणारें) ब्रह्म असोनि (खरें असून) तूं त्याला कां पाहत नाहींस? तात्पर्य आहे तें पाहत नाहींस! दृष्टांतानें पुनः सांगतात, 'मनांतून आभासरूपी सर्पभयास टाकून देऊन निर्भय (भीतिरहित) जो दोर (जी रज्जु) तिचा आश्रय करून तूं कां राहत नाहींस?' दोरीवर सर्पाचा आभास होऊन मनुष्य भितो, पण सर्पच जर नाहीं, तर भीति तरी काय म्हणून असावी? 'बाबा! जाणल्यावांचून, ज्ञानदृष्टीनें पाहिल्यावांचून त्या आभासरूपी सर्पाचें वास्तविक स्वरूप कळणार नाहीं. तेव्हां भुजंग म्हणजे हालचाल करणाऱ्या सर्पाप्रमाणें दिसणारी वस्तुही जड रज्जु (स्थिर, अचल अशी दोरी) आहे असें कां समजत नाहींस? पण,' पंडित म्हणतात, 'श्रीगुरुचरणीं मन ठेवल्याशिवाय ह्या गोष्टी उमजावयाच्या नाहींत. तेव्हां जीवा! सद्गुरूच्या पायापाशीं मन लीन करून ठेऊन हे सत्य सिद्धांत कां समजून घेत नाहींस व समजल्यावर उमजून त्याप्रमाणें आपलें आचरण कां नियमित करित नाहींस?' येथें हा सिद्धांत आहे कीं, जीवास जो मोह पडतो व खोट्या गोष्टी खऱ्या व खऱ्या खोट्या वाटतात याचें कारण सद्गुरुकृपेचा अभाव होय. सद्गुरुकृपा झाली म्हणजे सत्य तें सत्य व असत्य तें असत्य असें कळून त्याप्रमाणें आचरणही घडेल. ३. पाहीनास?

जाणलियाविण तो न कळे, जडरज्जु भुजंग असा समजाना?
श्रीगुरुचे चरणीं म्हणे वामन ठेवुनियां मन कां उमजाना? ॥ ७
आंगाणिं सूर्य जळीं प्रतिबिंबत तेज घरांतिल भिंतिवरी,
तेणें दिसे उदकांतिल भास्कर मुख्य कळे रवि त्याउपरी।
जीवत्व इंद्रिय देह सचेतन, जाणिव मीपण ते दुसरी,
श्रीगुरुवाक्य कळे म्हणे वामन ते परमार्थकळा तिसरी. ॥ ८
विश्व समस्तहि हें सचराचर ब्रह्मचि ऊघड दीसतसे,
दृष्टिस गोचर दोर असोनिहि त्यावरि पैंनग भासतसे,।
आपण रज्जु, चराचर त्यावरि सर्प असत्य विराजतसे,
यींचि निजानुभवें म्हणे वामन श्रीचरणीं जग मोहितसे. ॥ ९

---

१. आंगणांतील. २. इंद्रियांचें कार्यसामर्थ्य, जीव हीं दोन्हीं परमात्मस्वरूपापासूनच उत्पन्न झालीं आहेत हा सिद्धांत मुमुक्षूला करावा म्हणून दृष्टांत घेऊन पंडित म्हणतात, 'आंगाणिं सूर्य, (तोच) जळीं प्रतिबिंबत, (आणि त्या प्रतिबिंबाचें) तेज घरांतील भिंतीवर (असतें). अर्थ स्पष्टच आहे. आकाशांतील सूर्याचें प्रतिबिंब हौदांतील पाण्यांत पडून त्या प्रतिबिंबाचे किरण घरच्या भिंतीवर परावर्तन होऊन जातात. तो भिंतीवरील हालणारा कवडासा हौदांतील प्रतिबिंबामुळें उत्पन्न झाला आहे हें प्रथम समजतें. आणि मग तें जलस्थ प्रतिबिंब आकाशांतील सूर्याचें आहे असें मागाहून कळतें. सूर्यतेज एकच पण त्याचे तीन प्रकार झाले. तसेंच जीवत्व (ज्यासाठीं) इंद्रियें (व) देह सचेतन (चळनवळनास योग्य) झालीं ती कळा पहिली, मीपण जाणीव (ज्ञान, मी असें ज्ञान, जीवाचें ज्ञान) ही कळा दुसरी, आणि श्रीगुरुवाक्यानें समजलेली (जीव आणि ब्रह्म एकच, जीवाचें स्वरूप व ब्रह्मस्वरूप एकच आहे असें ज्ञान झाल्यामुळें ओळखावयास येत असलेली) तिसरी परमार्थ कळा होय. भिंतीवरील कवडासा, जलस्थ प्रतिबिंब आणि सूर्य ही त्रयी, तसें इकडे इंद्रियांचें सचेतनत्वज्ञान, जीवज्ञान आणि ब्रह्मज्ञान ही त्रयी. ब्रह्मापासून जीव (जीव हें ब्रह्मच, परंतु उपाधीनें यास जीवत्व आलें इतकेंच.) आणि जीवापासून देहेंद्रियांचे चलनवलनादि व्यापार आहेत; बाकी परमार्थदृष्टीनें (वास्तविकरीतीनें) ब्रह्म एकच आहे, हें सांगण्याचा उद्देश आहे. जीव हें ब्रह्माचें उपाधिग्रस्त प्रतिबिंब, आणि देहेंद्रियांचे चलनादि व्यापार हें त्या प्रतिबिंबाचें प्रतिप्रतिबिंब हीं तत्त्वें सूर्य, प्रतिबिंब आणि कवडासा ह्या दृष्टांतानें उत्कृष्ट समजतात. देहेंद्रियांचें सचेतनत्व हा कवडासा, जीव हा सूर्याची उदकांतील प्रच्छाया आणि आत्मा हा आकाशांतील सूर्य होय. ३. स्पष्ट. ४. सर्प. ५. ह्या सवाईचा अर्थ स्पष्टच आहे. आपण निश्चळ अशी आत्मरूपी रज्जु आहों आणि त्या रज्जूवर हालल्यासारखा दिसणारा प्रपंचरूपी साप आहे हा निजानुभव आला, ह्याची प्रतीति झाली म्हणजे परमेश्वराच्या चरणांत सर्व जग लीन होऊन जातें, गुंगून पडतें, म्हणजे सर्व दृश्य नष्ट होतें, किंवा, सामान्य जनाचे चित्ताला परमेश्वरापासून दूर जाण्याला जो मोह उत्पन्न होतो तो प्रपंच असत्य असून तो सत्य आहे असा अनुभव असतो म्हणून होय, असाही सिद्धांत निघेल. दुसरा अर्थ बरा आहे.

[१]स्वप्नजनासि रचोनि मनें करि त्यास सचेतन, तोचि करी
एक तनू अभिमान तयासचि मानुनि भेद अनेकपरीं; ।
येरिति जागृत विश्व हें जाणुनि कोठहि भाव दुजा न धरी,
जागृत तोचि जगीं म्हणे वामन त्यासिच सांपडलाहि हरी. ॥ १०

[३]विश्व समस्त दिसे तुज अंतरिं आरसियांत जशी नगरी,
कांहिंच जें न दिसे तुजवांचुनि भासवितोसि तुं तूजवरी; ।
बिंबचि तें, प्रतिबिंब चराचर मूर्ति, परोपरिच्या कुसरी,
चित्सुखपूर्ण सदोदित दर्पण तूजहि काय अशक्य हरी. ॥ ११

---

१. 'स्वप्नजनासि रचोनि मनें त्यास सचेतन करि; तो (स्वप्नस्थ पुरुष) एक तनु अभिमान करी; त्या अभिमानास (सत्य) मानुनि अनेकपरी भेद तो (पुरुष) करी. ही सर्व सृष्टि स्वप्नांतील आहे, प्राण्यास सचेतन केलें तें स्वप्नांत काम करणाऱ्या मनानें; स्वशरीरावर अभिमान व त्या खोट्या अभिमानाला सत्यस्वरूप देऊन 'हा मी, हा तूं, हें माझें, हें तुझें' असे नानाप्रकारचे खोटे भेदही आपणच केले. या रीति (अशा प्रकारें) हें विश्व जाणून (ही सर्व स्वप्नसृष्टि आहे असें जागेपणीं समजून) जागृत जो आहे (आत्मस्वरूपाच्या ठिकाणावर जो आहे) तो कोठेंही दुजा (भिन्न) भाव धरित नाहीं.' पंडित म्हणतात, 'हाच खरा जागृत आहे आणि यालाच श्रीहरि (परब्रह्मस्वरूपी सच्चिदानंद) सांपडला. २. नाना प्रकारचे. ३. परमेश्वराला अनुलक्षून पंडित म्हणतात, 'हे हरे! आरशांत जशी नगरी (शहर) तसें तुज अंतरीं (तुझ्यामध्यें) हें समस्त चराचर (स्थावर जंगम) विश्व दिसे, (दिसत आहे). परमेश्वरा! तूं आरसा आणि त्यांत जग हें प्रतिबिंबाच्या रूपानें दृश्य होत आहे. यावरून हें कशाचें तरी प्रतिबिंब आहे, कोणती तरी वस्तु खरी असून त्याचें हें प्रतिबिंब आहे, अशी शंका घेण्याचें कारण नाहीं. कारण तुजवांचूनि (या आरशावांचून) जें कांहींच न दिसे, म्हणजे आरसा नसला तर जें दिसत नाहीं, तें तूं तुजवर भासवितो आहेस, म्हणजे वस्तुतः तें नाहींच, पण तूं आपल्या लीलामात्रें करून 'हें जग आहे' असा भास उत्पन्न करित आहेस. तें (भासमान असणारें, ज्याचें विश्व हें प्रतिबिंब आहे) बिंबचि आहे (छाया आहे, मायोत्पादित आहे) आणि प्रतिबिंब कोणतें तर चराचर विश्व, ज्यांत परोपरीच्या विविधप्रकारच्या कुसरी (कौशल्य दाखविणाऱ्या गोष्टी) दृष्टीस पडतात.' वस्तुतः नसणाऱ्या गोष्टीला बिंब आणि प्रतिबिंब कोठून? या प्रश्नाचें समाधान पंडित करितात, 'परमेश्वरा! तूं सदोदित चित्सुखपूर्ण (ज्ञानानंदामध्यें पूर्णत्वानें असणारें) दर्पण म्हणजे आरसा आहेस. तुला अशक्य कोणती गोष्ट असावयाची आहे? पूर्ण ज्ञानी जो आहे त्याला कोणतेंही कर्म अशक्यच नाहीं; मग नसलेल्या भासविणें ही गोष्ट तर तुला सहजच आहे.' येथें परमेश्वरावेगळें कांहीं नाहीं आणि माया व तिचें प्रतिबिंब जें विश्व हीं वस्तुतः नाहीत, हे सिद्धांत प्रणीत केले आहेत.

शिष्य बहू गुरु मेळविती परि दुर्लभ तो जगिं शिष्य कारी,
ब्रह्मचि होउनि शेष उरे तरि ते खुण शिष्यपणाचि खरीः ।
मंत्रहि देतिल जे शिकवीतिल नाटक, काव्य, कळा, कुसरी,
तेहि गुरू परि सद्गुरुवांचुनि शिष्यपणाचि असे न उरी. ॥ १२
दुःख असत्य अनात्मक शोधुनि सत्य सुखात्मपणें ठरवी,
दुःख असत्य अनात्म मृगांबुहि तो करि सत्य सुखात्म रवी, ।

---

१. गुरु कसा असावा तें सांगतात, 'शिष्य बहू गुरु मेळविती परी जगीं तो (गुरु) दुर्लभ (कीं जो) उत्तम शिष्य तयार करितो.' उत्तम शिष्याची खुण काय? पंडित म्हणतात, 'ब्रह्मचि होऊन शेष उरे, ते शिष्यपणाची खरी खुण (होय.) आपण स्वतःच ब्रह्म आहों अशी स्थिति होऊन जो पुनः ब्रह्मानंदाचा अनुभव घेण्यास शिल्लक उरतो तो खरा शिष्य होय. असला शिष्य तयार करणारा गुरु दुर्लभ आहे. मंत्र, नाटकें वगैरे शिकविणाऱ्यांसही गुरु म्हणा पाहिजे तर, पण सद्गुरुशिवाय शिष्यपणाची उरी न असे म्हणजे शिष्यपणा या शब्दाचें सार्थक होत नाहीं. शिष्याच्या मनाचें खरें समाधान व शिष्यपणाचा उत्तम भासला सद्गुरूवांचून मिळत नाहीं. सारांश, असल्या सद्गुरूला शरण जा कीं जो तुम्हांला ब्रह्मपदाप्रत नेऊन तेथील आनंदास्वाद घ्यावयास शिकवील हें या श्लोकांत सांगितलें आहे. २. आणखी गुरु कसा असावा तें सांगतात, 'दुःख (हें) असत्य (अस्तित्व ज्याला नाहीं असें) व अनात्मक (ज्यांत आत्मा नाहीं असें जड. पण जड हा केवळ आभास आहे, कारण त्यांत सत्ता नाहीं.) आहे,—दुःख असत्य आहे, व अनात्मक आहे, तें शोधुनि (शुद्ध करून) केवळ सत्य सुखात्मपणें (सुख देणारा जो आत्मा, जें स्वस्वरूप त्यानें युक्त असें) म्हणजे आनंद देणारें आत्मस्वरूपाचें ज्ञान हेंच सत्य गुरु ठरवितो (शिल्लक ठेवितो). सत्यच शिष्याच्या सुखासाठीं ठेऊन असत्य फेंकून देतो व जो असत्य व अनात्म दुःख मृगांबु (मृगजलवत्) आहे, त्यालाच सुखात्म अशा सत्यरूपी सूर्याचें स्वरूप देतो. सारांश, दुःखरूपी प्रपंच नाश करून सुखदायी आत्मस्वरूपाची ओळख करून देतो, तो सुख देणारा गुरु केवळ कल्पतरूच होय. तो देही खरा पण त्याचें सर्व आचरण विदेहीपणाचें (पूर्ण वैराग्याचें) असतें. हा खरा गुरु. बाकी कान फुंकणारे, छोंछूं करणारे, गुरु म्हणजे व्यापारी भाडेकरी होत. पैशासाठीं गुरुमंत्र देणारे ते होत. त्यांना गुरु ही पदवी देणें हें बरें नव्हे. त्यांना गुरु म्हणणें म्हणजे 'गुरु'शब्दाचा दुरुपयोग करणें होय. स्वतः विदेही आणि मायामोह दूर करून आत्मस्वरूपाची ओळख करून देणारा गुरु खरा होय. हाच सद्गुरु 'दुःख असत्य आहे, प्रपंच मिथ्या आहे' इतकेंच उमजून देऊन राहत नाहीं, तर हा असत्यमय व मोहकारी प्रपंचच सत्य व सुखपूर्ण आहे असेंही उमजवितो. सर्व विश्वांत परमेश्वररूपी एकच सत्य आहे अशी मनांत पक्की गांठ बसली म्हणजे मोह आणि अज्ञान यांचा विध्वंस होऊन दुःखाचा आभास दाखविणारा प्रपंच ब्रह्मांतच आपल्याला सत्स्वरूपी ब्रह्माचा गुरूच्या प्रसादानें साक्षात् परिचय होतो. अशा सद्गुरूला कल्पतरु म्हणणें किती सयुक्तिक आहे बरें? ३. मृगजल.

तो सुखकल्पतरूहि जगद्गुरु देह विदेहपणें मिरवी,
फुंकिति कान, दुकान तें, ये स्थळिं हे पदवी न दिसे बरवी.॥ १३
नाठवितांहि परोक्ष नसे, परि आठवितां अपरोक्ष दिसे,
आठव नाठव दोन्हिहि मोडुनि आत्मसमाधिसुखांत वसे, ।
देहविलक्षण, आपुलें लक्षण हें स्मरतां हृदयीं गवसे,
व्यर्थ कळा सकळा म्हणे वामन तें गुरुच्या भजनींच वसे.॥ १४

---

१. शेवटीं सांगतात, 'तें सत्स्वरूपी परब्रह्म नाठवितांही (आठवण नसली तरी, भान नसलें तरी) परोक्ष नसे (आपल्याजवळ नाहीं असें नाहीं म्हणजे आपल्या संनिधच असतें. परि आठवितां अपरोक्ष दिसे. (म्हणजे स्मरण झाल्यावर मात्र जवळ दिसूं लागतें.)' म्हणजे सांगण्याचें हें आहे कीं, ब्रह्म हें नेहमीं आपल्याजवळच आहे,–नव्हे आपणच तें आहों,–असें असूनही प्राकृतजनास स्मरण नसलें म्हणजे परब्रह्म जवळ असून दिसत नाहीं व स्मरण झालें म्हणजे मात्र दिसूं लागतें. तेव्हां प्राकृत लोकांस मोह उत्पन्न व्हावयाचें कारण स्मरण व विस्मरण होत. परब्रह्मासारखी गोष्ट नित्य जवळ असूनही तिचें अस्तित्व जर केवळ स्मरणानें मात्र सिद्ध होणार, तर असलें घातकारी स्मरण व त्याचा अभाव हीं दोन्ही नाहींशीं करून आत्मसमाधिसुखामध्यें (प्रत्यक्ष जो आत्मा त्याचें चिंतन एकाग्रतेनें केल्यामुळें उत्पन्न होणारें जें परमावधीचें सुख त्यामध्यें) वसे. (ऐस, असावेंस) आपलें (आत्मस्वरूपाचें) देह विलक्षण (देहाच्या गुणांच्या अत्यंत उलट, विपरीत असें) लक्षण (असे गुण आहेत.) हें स्मरतांच (हें ध्यानांत येतांच, हें समजतांच) तो आत्मा हृदयीं (आपल्या हृदयांतच) गवसे (सांपडतो).' वामनपंडित म्हणतात, 'सकळा कळा (विद्या) व्यर्थ (आहेत). सर्व प्रकारच्या १४ विद्या आणि ६४ कळा ह्या व्यर्थ आहेत. कारण, त्यांच्या साह्यानें आत्मस्वरूपाची ओळख आपल्यास होत नाहीं. आणि मनुष्य जन्मास आल्यानंतर आत्मस्वरूपाचें ज्ञान करून घेणें हेंच काय तें मानवी कर्तव्य आहे. तेव्हां हें कर्तव्य ज्यांच्या हातून साध्य होत नाहीं, त्या सर्व विद्या व्यर्थ (निष्फळ होत). मग करावयाचें काय? तर आत्मस्वरूपाचा लाभ करून घेण्यासाठीं मनुष्यास पंडित सांगतात, 'तें गुरूच्या भजनींच वसे.' हा परमलाभ करून घ्यावयाचा असेल तर तुला सांगतों कीं, तें (आत्मस्वरूपाचें ज्ञान) गुरूच्या भजनामध्यें मात्र वसे (वसत असतें). अनन्यभावानें सद्गुरूची सेवा कर, म्हणजे मात्र तुला देहाहून अत्यंत भिन्न असें जें आत्मस्वरूप त्याचें स्मरण होऊन तुझ्याच हृत्कमलामध्यें तें आहे असें तुला ज्ञान होईल.' आत्मसमाधिसुखाच्या लाभासाठीं मनुष्यानें गुरुसेवा केली पाहिजे. ही सेवा केली असतां स्वस्वरूपाचें यथार्थ ज्ञान होऊन आत्मसमाधीच्या पूर्णसुखामध्यें रममाण होण्यास संपिडेल हें शेवटीं पंडितांस सांगावयाचें आहे.

## १२. भक्तिमाहात्म्य.[१]

चरणदास्य सदा करि [२]इंदिरा, न गणि थोर [३]हृदंबुजमंदिरा ।
तुजहुनी तव दास्यचि सुंदरा! बहु सुखप्रद, [४]कौस्तुभकंधरा! ॥ १
[५]उदासीं स्वदासीं न मोक्षादिकांही, बहू मानिलें भक्तिवांचूनि कांहीं, ।
असें दास्य [६]ज्याचें तया तूज देवा, स्वदास्यास मी मागतों वासुदेवा. ॥ २
मुक्तिही वरि न [७]वास्तव लोकीं, भक्ति गोड बहु मानवलोकीं, ।

---

१. या प्रकरणास 'भक्तिमाहात्म्य' हें नांव चांगलें शोभतें. मुक्तीपेक्षां भक्ति श्रेष्ठ आहे असें पंडित ह्या काव्यखंडांत सिद्ध करितात. पहिल्या दोन श्लोकांत लक्ष्मी व सनकसनंदनादि व नारद यांस परमेश्वराचें दास्यच आवडतें असें सांगून भक्तीची व मुक्तीची तुलना ३–८ श्लोकांत केली आहे. मुक्ति मिळाली असतां परमेश्वराशीं ऐक्यरूप होऊन भक्तिरसाचा आस्वाद नाहींसा होतो. साखरेशीं ऐक्य झाल्यास साखरेची गोडी कळत नाहीं त्याचप्रमाणें परमेश्वराशीं एकरूप झाल्यास परमेश्वराची अघटित लीला व तिच्यापासून उत्पन्न होणारें भक्तिसुख हीं दोन्ही अंतरतात. तेव्हां 'मला मुक्ति नको' असें खरा भक्त म्हणतो. ९–१४ श्लोकांमध्यें मुक्त झाल्यावर परमेश्वराची कृपा नाहींशी होते हें 'पिलूं आणि मादी' यांचा दृष्टांत घेऊन सांगितलें आहे. परमेश्वरापाशीं नित्य सहवास असून त्याच्या दर्शनाची व गुणस्तवनाची उत्कट उत्कंठा असावी असेंही याच श्लोकषट्कांत सांगितलें आहे. १५ व्या श्लोकापासून शेवटपर्यंत प्रल्हाद, गजेंद्र, सनकादि, मानसपुत्र मनु, शुकाचार्य इत्यादि महान् महान् भगवद्भक्तांचीं उदाहरणें घेऊन भक्तीचें श्रेष्ठत्व स्थापन केलें आहे. लोखंडाला परिसाच्या स्पर्शानें सुवर्णत्व प्राप्त झालें म्हणून जसा परिस श्रेष्ठ–सोनें नव्हे–या न्यायानें भक्तीनें मुक्ति मिळते म्हणून भक्तिच श्रेष्ठ होय. या पंचदशींत जन्ममरणाला भिऊं नये असेंही सुचविलें आहे. सारांश हें सकल चराचर विश्व परमेश्वरच नटला आहे हें ज्ञान अनुभवानें सिद्ध करून घेऊन परमेश्वराचें दास्य करावें व यांतच सुखसर्वस्व आहे असा पंडितांचा अभिप्राय या सालंकारिक काव्यांत प्रगट झाला आहे. भक्तीचें उदात्त स्वरूप, परमेश्वराची कृपा व 'अनन्याश्चिंतयंतो मां ये जनाः पर्युपासते । तेषां नित्याभियुक्तानां योगक्षेमं वहाम्यहम् ॥' याचें सार्थकत्व, हीं सर्व रसिक व भाविक वाचकांनीं ध्यानांत ठेवण्यासारखीं आहेत. २. लक्ष्मी. ३. तिचें मंदिर जें विष्णूचें हृत्कमळ तें चरणाहून थोर आहे असें मानीत नाहीं. ४. कौस्तुभ रत्न आहे कंठांत ज्याच्या. ५. उदास (विरक्त, निष्काम) अशा तुझ्या भक्तांनीं. ६. ज्यानें असें दास्य कीं ज्यांनीं भक्तिवांचूनि मोक्षादिका ही बहु न मानिलें, तया (त्या उदास स्वदासांना) स्वदास्यास (सेवा करण्यासाठीं) मी मागतों. हा अन्वय ठरविला म्हणजे अर्थ स्पष्ट होतो. माझ्या हातून अशा विरक्त भगवद्भक्तांची सेवा होऊं दे कीं जे मोक्षादि सर्वांस तुच्छ मानून भक्तिमार्गाचें अवलंबन करितात. ७. वास्तव म्हणजे खालच्या ओळींत दिलेल्या कारणासाठीं. पहिली व दुसरी हा तिसरी व चवथी अशा ओळी घेतल्या तर अर्थ विशेष स्पष्ट होईल.

जो स्वयें रस तया रस नाहीं, भक्तिमाजि रस ही रसना ही. ॥ ३
सुधा जरी गोडचि फार साची, जिभेविणें आपुलिया रसाची, ।
गोडी न जाणे, रस ना तिला हो, असे असाची तरि भक्तिलाहो.॥ ४
अमृत आणि तया रसना असे, स्वरस नित्य नवे सुजना असे, ।
रसाचि मुक्ति, परंतु न जीभली, म्हणुनि तीहुनि भक्ति अजी! भली. ॥ ५
सिंधु होउनि सदैवच राहो, त्यास तों स्मृति न देववरा! हो! ।
काय जान्हविहि त्यांत रिघेना, लाभ हा लवण येउनि घेना. ॥ ६
मेघबिंदु सुखसिंधुचि जाला, पावला जन मुमुक्षु अजाला, ।
ऐक्य तों सुरनदीसम भक्तां, ऐक्यही, भजनही अविभक्तां ॥ ७
सहज ऐक्य कळोनिहि, मागुती घडि घडी तुज भक्तिच मागती, ।
जसि पितां अमृता न पुरे धणी[11], निकट दास्य, असें तरि[12] तूं धणी. ॥ ८
फुटोनी जयीं पांख ये शक्ति पक्षीं[13], न मातेस मानील तो गोड पक्षी, ।
झणीं[14] वीसरें पक्ष[15] मी भक्तियोगा, जळो पक्तता ते मला तों न यो[16] गा.॥ ९
जयीं शक्ति पक्षीं पित्यांच्या निघाली, न माता मुखीं अन्न आणोनि घाली, ।
झणी झांकिसी पक्ष होतां कृपा हे, जळो पक्तता ते तिला कोण पाहे? ॥ १०

---

१. अमृत मधुर आहे पण त्यास स्वतःची गोडी नाहीं. रसरूप झालें असतां म्ह० मुक्ति मिळाली असतां भक्त एकरूप होऊन त्यांस रसाची गोडी कळत नाहीं; पण भक्ति सगुण असल्यामुळें तींत रस आहे आणि रस ग्रहण करण्याचें साधनही (जिव्हाही) आहे. २. जीभ. ३. सुधेला. ४. भक्तीचा लाभ असा आहे की त्यांत भक्ताला भक्तिरसाची गोडी समजते. शिवाय भक्तींत रस आहे. कारण भक्तिमाधुरीचा आस्वाद घेण्याचें साधन भक्ताजवळ आहे. मुक्त स्थितींत तें साधन नाहीं. म्हणून मुक्तीपेक्षां भक्ति श्रेष्ठ होय. ५. भक्तिलाहोला. ६. मुक्ति हा रसचि म्हणजे अमृत आहे. अमृतासारखी गोड मुक्ति आहे, पण त्या स्थितींत रसास्वादाचें सामर्थ्य नाहीं. ७. श्रेष्ठ. ८. सदैव समुद्रच (मुक्त) होऊन राहिल्यास त्याला परमेश्वराचें स्मरण अंतरतें. म्हणून जान्हवी सुद्धां समुद्राशी ऐक्यरूपानें राहत नाहीं; व समुद्रांत येऊन लवण (मीठ) घेत नाहीं. ही **वक्रोक्ति** आहे. ९. मेघांचे बिंदु समुद्रांत मिळाले म्हणजे सिंधुरूप होतात तीच गोष्ट मुक्त जनांची आहे. पण सुरनदी म्ह० भागीरथीचा ओघ आंत मिळत नाहीं; तो सिंधूची गोडी जाणतो; तीच गोष्ट जीवन्मुक्ताची आहे. १०. ऐक्यपदीं पोंचलेले पण ईश्वराचें स्मरण आहे ज्यांस असे भक्तांस. ११. तृप्ति. १२. 'तुझ्या सन्निध भक्ति करावयास सांपडावी व तूं धनी असावास' असें भक्त मागतात. १३. पंखाचे ठिकाणीं शक्ति येईल तेव्हां. १४. कदाचित्. १५. पूर्ण मानी. १६. येवो.

पिलूं[1] माउलीलाचि सर्वत्र पाहे, मुखीं अन्न तें माय घाली कृपा हे, ।
पुढें[2] हा न ही शून्यही भाव राहे, जळो पक्तता इंदिरेच्या वरा! हे. ॥ ११

नैं[3] चित्त उत्कंठित नित्य योगीं,[4] तसें मुकुंदा सुखही वियोगीं, ।
न भेद ना अद्वय तृप्त सोशी, सर्वज्ञ तूं पूरविं हे अैंसोशी.[5] ॥ १२

प्रियोत्कंठता स्त्रीस जैसी वियोगीं, मला प्रीति ते दे हरी निलैंयोगीं.[6] ।
जसी भेटि अत्यंत काळें पतीची, सदा भक्ति ऐसी असो श्रीपतीची. ॥ १३

असी भक्ति मागेंच दामोदरातें, न मुक्तींत देखों तुझ्या आदरातें,[7] ।
जसें भक्त सांभाळिता होसि पाहें, न मुक्तींत तों दाखवीसी कृपा हे. ॥ १४

प्रल्हाद[8] गर्भीतहि आठवीला, त्याकारणें नारद पाठवीला, ।
मुक्तींत हे प्रीति न देव दावी, ते मुक्तिची गोष्टिहि कां वदावी? ॥ १५

तयानिमित्तेंच नृसिंह[9] जाला, ज्याकारणें जन्म अहो! अजाला, ।
जाला स्वकर्में द्रविडेंद्र[10] हस्ती, तदर्थ धांवे, धरि चक्र हस्तीं. ॥ १६

'भक्तिनें हरिहि मुक्तिच दावी, मुक्ति थोर तरि कां न वदावी?' ।
जे असें म्हणति अल्पमती ते, वृद्ध होउनि शिशू गैंमती[11] ते. ॥ १७

सोनियाचि करितां परिसाची, श्रेष्ठता वदति, हें पैंरिसाची,[12] ।
त्या महत्त्व, न तैंथापिहि[13] हेमीं, भक्ति थोर म्हणतों तसि हे मी. ॥ १८

---

१. पूर्ण स्वरूपास पोहोंचल्यानंतर माता व पिलूं (स्वामी व भक्त) हा संबंध नष्ट होऊन सर्व शून्याकार होतें. हा (पिलू); ही (माटी). २. हे लक्ष्मीपते! ३. नित्य सांनिध्य असलें म्हणजे उत्कंठा नष्ट होते व वियोग झाला म्हणजे सुख नष्ट होतें हा साधारण अनुभव आहे. पंडित म्हणतात, 'परमेश्वरा! तुझा वियोग मला नसावा म्हणजे मला तज्जन्य दुःख होणार नाहीं. तसेंच तुझ्या जवळ मी राहिलों तर अतिपरिचयानें तुझ्या दर्शनाची उत्कंठा नाहींशी होईल, तीही होऊं देऊं नको. सारांश, प्रियजन दूर गेला असतां त्याचे दर्शनाची उत्कंठा जशी तीव्र असते, तशी तीव्र उत्कंठा तुझे सांनिध्यांत राहून मला असावी. तृप्त जो झाला म्हणजे भक्तिरसाची गोडी ज्यास पूर्ण समजली त्याला वियोग सोसवत नाहीं आणि ऐक्य होणें हेंही सोसवत नाहीं.' पुढील दृष्टांतावरून हा अर्थ स्पष्ट होतो. ४. सांनिध्यांत. ५. इच्छा. ६. नित्यसांनिध्यांत. ७. कृपेस. ८. हिरण्यकशिपु तपश्चर्या करण्याकरितां वनांत गेला असतां मागें इंद्रानें त्याच्या गर्भवती राणीस चोरून नेलें. तिचा गर्भ म्हणजे कोणी प्रबळ दैत्यच उत्पन्न होऊन आपल्यास शत्रु होईल म्हणून इंद्र तिच्या गर्भाचा नाश करणार होता. तेव्हां नारद तेथें येऊन 'या गर्भांत महान् भगवद्भक्त आहे, तेव्हां इला तूं सोडून दे' असें सांगून त्यानें तिला सोडविलें व तिला उपदेश केला. तो प्रल्हादानें गर्भांतच ग्रहण केला. ९. नारसिंह अवतार. १०. गजेंद्र. यथार्थदीपिका–अध्याय १४ व नृहरिदर्पण पहा. ११. वाटतात. १२. ऐका. १३. हेम असुसटी.

लोभ जो धरुनियां कनकाचा, टाकितो परिस तो जन काचा, ।
घे सुवर्ण, परिसास उपेक्षी, भक्तितें त्यजुनि मुक्ति अपेक्षी ! ॥ १९

भक्तिच्या निजसुखासुभवासी नेणतां, जन भिताति भवासी, ।
कां बुडे मृगजळांत रवी हो ? नेणती खुण असी बरवी हो ! ॥ २०

असो हें, अहो ! ज्यास पीयूष पाळी, जरा मृत्यु कैंचा तयाच्या कपाळीं ? ।
स्वयें विश्वसाक्षीच रक्षी जयाला, अजी ! काय भी त्या महाराजयाला ? ॥ २१

कितियेक येवोनि पुन्हा भवासी, जन्मोनिही होति न गर्भवासी, ।
माताच नाहीं सनकादिकां हो, भवासही धाकति भक्त कां हो ? ॥ २२

जन्मांतरीं उद्धव नारदासी, पोटीं जिच्या ते अति नीच दासी, ।
सत्संगतीनें भजतां अजाला, गर्भाविणें उद्भव त्यासि जाला. ॥ २३

पूर्वी जयाला हरिभक्तिलाहो, गर्भा न येतां पृथु जन्मला हो ! ।
उत्पत्ति ऐसी मनु आदिकां हो, भिती भवातें हरिभक्त कां हो ? ॥ २४

कितियेक झाले जरि गर्भवासी, गर्भींच मिथ्या करिती भवासी, ।
तारूं जया श्रीगुरु सूर्य होतो, कैसा मृगांबूंत बुडे अहो ! तो ? ॥ २५

प्रल्हाद आला जरि गर्भवासा, तें सांकडें त्याच जगन्निवासा, ।
समूळ संसार मृषाच वाटे, गर्भीं असा लावियला सुवाटे. ॥ २६

प्रल्हाद गर्भीं निजबोधसिद्धी पावे, असी भागवतीं प्रसिद्धी, ।
त्याकारणें धाडुनि नारदातें, करी मृषा गर्भ विशारदातें. ॥ २७

जो स्वैंमिच्या अजगरें गिळिलाच सारा, जो पावला विभ्रमया उदरा असारा, ।
जागे तयास करितां स्मरतां न पाहे, प्रल्हाद गर्भगत देखतसे कृपा हे. ॥ २८

---

१. कच्चा, अपूर्ण ज्ञानाचा. २. मुक्तीची इच्छा करितो, तो जनही कच्चाच होय. ३. संसारास. ४. ज्यास भक्तिरूप अमृत संरक्षण करितें त्यास. ५. भीति. ६. जन्मास, संसारास. ७. कारण सनकादिक ब्रह्मदेवाचे मानसिक पुत्र आहेत. ८. भीति पावतात. ९. नारद हा पूर्वजन्मीं दासीपुत्र असतां सत्संगतीमुळें पुण्यवान् होऊन पुढें ब्रह्मदेवाचा मानसिक पुत्र झाला. [भागवत–प्रथम स्कंध अ० ६ पहा.] १०. पूर्वजन्मीं. ११. पृथु हा वेनराजाचा मुलगा होय. वेन राजा फार दुष्ट व यज्ञक्रियांचा विध्वंस करणारा होता म्हणून त्यास ऋषींनीं मारून टाकिलें. पण राजा नाहींसा झाल्यामुळें पृथ्वीवर अंदाधुंदी होऊं लागली, म्हणून ऋषींनी वेनराजाचा उजवा बाहु मंथन केला तेव्हां त्यापासून पृथु राजा झाला. त्यानें गोरूप धारण करणाऱ्या पृथ्वीचें दोहन करून संपूर्ण वस्तु तिच्याकडून घेतल्या. १२. नौका. श्रीगुरुरूपी सूर्य ज्याला नौका तो भवमृगजळांत बुडणार नाहीं. १३. सन्मार्गाला. १४. आत्मस्वरूपाच्या ज्ञानाचा लाभ. १५. सप्तम स्कंधांत. १६. ज्ञानी नारदास. १७. मायेच्या. १८. गर्भामध्यें प्राप्त झालेली कृपा.

असोनियां ज्ञानहि, भक्तियोगा न सोडितां, 'मुक्ति' म्हणे 'न यो गा!'।
शुकास त्या गर्भ खरा न वाटे, वृक्षांत[1] ओ दे स्वपित्यास वाटे. ॥ २९

---

## १३. भगवद्दास्य.[2]

मी[3]तें न सेवी जन तो सुटेना,[4] संसारबेडी सहसा तुटेना, ।
सेवा करावी तरि पूर्णकाम[5] मी, काय माझें करणार काम[6]? ॥ १
खरारा खगेंद्रासि[7] माझ्या कराया, न कोणी मला पाहिजे लोकराया[8]! ।
न लागे तया घांस, दाणा, न पाणी, उभा जो पुढें नित्य जोडोनि पाणी[9]. ॥ २
लगामाविणें[10] माझिया जो लगामी,[11] विनाजीन[12] वाहे मला व्योमगामी,[13] ।
अशा वाहनालागिं तों मागणसाची[14] अपेक्षा[15] नसे, गोष्टि हे मान सांची[16]. ॥ ३
धरुनि मोहरितुल्य असे जगा, शेषशतानन[17] तो मज सेजे[20] गा! ।
नग[19] तया जरि अंस्तरणा[18] रची, इतर कार्यहि तो करणारची[21]. ॥ ४
कीं दीप लाविल अरे! गुणहीन[22] धामीं? जेथें पितों त्रिभुवनात्मक ते सुधा मी, ।
जेथें न सूर्य न शशी[23] न शिखी[24] न तारा, तेथें निघेल दिनरात्रिस काय थारा[25]! ५
ज्ञानांबरें[26] स्वसुखकंचुकि जीस तीची, वस्त्रें कसीं धुविल कोण रमासतीचीं? ।

---

१. शुकाचार्य बालक असतांनाच संसार सोडून पळूं लागले; तेव्हां त्याचा पिता व्यास यास भय पडून त्यानें त्यास हाक मारिली. तेव्हां आपला आत्मा सर्व प्राणिमात्रगत आहे हें दाखविण्याकरितां व व्यासाचा मोह घालविण्याकरितां शुकांनीं वृक्षाकडून उत्तर देवविलें. (भागवत–प्रथम स्कंध अध्याय २ श्लोक २ पहा.) २. या प्रकरणांत 'ईश्वरास सेवेची गरज नाहीं मनुष्यानें स्वोद्धारासाठीं कर्मसमर्पणरूपी सेवा निष्कामबुद्धीनें करावी' हा विषय आहे. ३. मला. ४. संसारदुःखापासून न सुटे–असा अर्थ. ५. मी परमेश्वर सफलमनोरथ आहें. ६. कार्य. ७. गरुडाला. ८. अर्जुना. ९. हात. १०. हा शब्द फारशी आहे. पंडितांच्या काव्यांत हा शब्द अनेकदां आलेला आहे. ११. स्वाधीन. १२. जीनाशिवाय. १३. आकाशमार्गी गमन करणारा. १४. चाकराची. १५. इच्छा. १६. खरी. १७. सहस्रमुख(शेष) ज्याला सर्व जग मोहरीसारखें हलकें वाटतें. १८. आंथरुण, शय्या. १९. कल्पवृक्ष. २०. सेजेची सेवा करील–असा भावार्थ. २१. करणारच. २२. निर्गुण. २३. चंद्र. २४. अग्नि. २५. विश्रांति, आश्रय. जेथें सूर्य चंद्रच नाहींत तेथें दिवसरात्र तरी कसली?–हा अर्थ. २६. ज्ञानांबर म्हणजे परब्रह्मस्वरूपाचें ज्ञान तेंच आहे नेसण्याचें वस्त्र व स्वसुखकंचुकी म्हणजे आत्मज्ञानसुख हीच आहे कंचुकी (चोळी) अशी जी रमासती तिचीं वस्त्रें तरी कशीं धुवील? खरेंच आहे; वस्त्रेंच नाहींत, तर धुणार काय? शिवाय परमात्मज्ञान आणि आत्मसुख यांना धुण्याचा संस्कार तरी हवा आहे कशाला?

कीं खेळवील उचलोनि मुला विधीतें[1]? माझ्या करील जन हा केवण्या[2] विधीतें? ६
मी नित्य तृप्त, मज रांधिल अन्न काय? मर्दील अंग तरि केवळ मी अकाय[3]? ।
जो मी अनंत, मज रक्षिल तो कसा? रे! व्यापूनि[4] जो उरतसे जड लोक सारे. ७

सेविल्याविण[5] नसे सुटका ही, सेवणें तरि घडे नच कांहीं; ।
सेवुनी सहजही तुज पाय[6], पांडवा! परिस तोचि उपाय. ॥ ८

सुकृत[8], लौकिक वैदिक, पांडवा! मज समर्पुनि तूं करिं तांडवा. ।
करिसि[9] होमिसि[10] भक्षिसि देशि, रे! मजमधेंच समर्पित[11] तें शिरे. ॥ ९

---

## १४. भगवत्स्तुति[12].

उष्टीं धुतां काय न अन्न सांचे? गर्ताजळीं त्या मग वायसांचे[13] ।
समूह येती; न कदापि जाती, त्या कोंकतीर्थाप्रति[14] हंसजाती. ॥ १
जें जाणणें जाणतसे जगातें, नव्हे तमोज्योतिहि[15] तेज गा! तें, ।
चिदंबुधी[16] साच, जडा न गारा, हें ब्रह्म जाणा पिटितों नगारा. ॥ २

---

१. मूल ब्रह्मदेवाला खेळविण्यासाठीं उपयोगीं पडेल काय? जग उत्पन्न करणें हाच ज्याचा खेळ त्या विधीला (सर्वांची भवितव्यता ठरविणाऱ्याला कोण खेळविणार? २. कोणत्या कामातें. ३. कायारहित. ४. 'स भूमिं विश्वतो वृत्वात्यतिष्ठद्दशांगुलम्' असा जो सर्व जगास व्यापून उरणारा अनंत त्याला शरीररक्षक कशाला हवा? ५. 'पार्था!' श्रीकृष्ण म्हणतात; 'माझी सेवा केल्याखेरीज तर गत्यंतर नाहीं. संसार बेडी तोडावयाची असेल तर माझी सेवा केलीच पाहिजे. आतां माझ्या येथील व्यवस्था अघटित असल्यामुळें मला भोतदार नको, अंथरुण घालणारा गडी नको, दिवाबत्ती करणारा मशालजी नको, बायकोचीं चिरगुटें धुण्यास मोलकरीण नको, मुलाला खेळवायला पोरगा नको, स्वयंपाकाला आचारी नको, अंग रगडण्याला नापित नको व माझ्या पुढें चालायला शिपाई नको. सारांश माझी सेवा करून मला नाहीं तें कोणी मिळवून देईल असें कांहींच नाहीं. मी तृप्त व पूर्ण आहें. म्हणून ज्या योगानें माझी सेवा केली असें होईल, तो उपाय तुला सांगतों. ६. पावे. ७. भगवद्गीता–अध्याय ९ श्लोक २७ पहा. ८. नृत्य. ९. भगवद्गीता–अध्याय ९ श्लोक २७ पहा. १०. होम करतोस. ११. अर्पण केलेलें. १२. या स्फुट काव्यांत 'स्तुति करावी परमेश्वराची,' दुसऱ्याची करूं नये, हा विषय आहे. १३. कावळा. १४. उकिरडा, घाण टाकण्याची खळगी. १५. काजवा. 'काजवा तेज नव्हे, तसेंच जगास जाणणारें जाणणें (ज्ञान) ज्ञान नव्हे. चित्सार खरें ब्रह्म होय. जडा गारा (गर्ताजळ) ब्रह्म नव्हे,' 'हें जाणा' असा नगारा पिटितों. गारा जड (दृश्य वस्तूंनी भरलेल्या) म्हणून खोट्या होत. आत्मस्वरूप हें ब्रह्म होय. १६. चित्सार.

जरि हरिगुणरत्नीं गुंफिली होय [1]वाणी,
तरि परम सुखाला काय हो त्यास [2]वाणी ? ।
स्तवि इतर नरांतें जीभ ते दैन्यवाणी,
मुठिहि भरि न देती पिष्ट संतुष्ट [3]वाणी ! ॥ ३
रघुपतिभजना जो सर्वही काळ [4]सारी,
न कधि [5]भवतमीं तो जन्म पावे [6]असारीं, ।
म्हणुनि जन तुम्ही गा ! गात जा राघवातें,
[7]ऋषिवर गुण गाती नीरसा या भवातें. ॥ ४
ज्या मांडिया [8]खगभुजावरि वर्तमाना,
ज्या सांवळ्या [9]अतसिकाकुसुमासमाना ।
पीतांबरावरि कटीं अतिरम्य [10]कांची,
पंक्ती जिला मणिमयासह [11]मुद्रिकांची. ॥ ५
वर्णरीति यमकीं समजा ते, तेचि कीं विषय कीं समजा ते, ।
काननें हरिगुणीं [12]रसनेला अर्पुनी अनुभवें रस नेला. ॥ ६

---

## १९. स्फुटश्लोक.

अरे ! ग्रासोग्रासीं रघुपतिसि कैसा विसरसी,
जयाचीं हीं नामें वदनिं वदतां [13]भ्रांति तरसी ? ।
मुकुंदा गोविंदा म्हणत मनिं जिव्हेसि [14]सुचवी,
वरी ध्यावीं, ऐसीं जनिं, [15]सकेळिका राम सुचवी. ॥ १
माय ते सदय लेंकुरवाळी, बालकाप्रति जशी कुरवाळी, ।
राम तद्रुप नरां कुरवाळी, तारिला [16]शतमखांकुर वाळी. ॥ २
दास्य दे हरि ! तुझ्या चरणाचें, कीर्तन, श्रवण, [17]आचरणाचें ।
दे अनन्य हृदयीं स्मरणातें, हें न देशि तरि दे मरणातें. ॥ ३

---

१. वाचा. २. कमताई. ३. दुकानदार. ४. खर्चे करितो. ५. संसारमोहांत. ६. असत्य. ७. ऋषिश्रेष्ठ महर्षि. ८. गरुड. ९. पुष्पविशेष, त्याप्रमाणें. १०. कमरपट्टा. ११. पुतळ्यांची. १२. जिव्हा. १३. मोहसागरांतून उत्तीर्ण होशील. १४. सुरस. १५. प्रसिद्धपणें. १६. इंद्रपुत्र. इंद्रानें १०० यज्ञ केले म्हणून त्यास इंद्रपद मिळालें. १७. वर्तनाचें.

जाणेल जो गुरुकृपेस्तव आपणातें,[1]
तो कां स्मरेल नसत्या पहिलेपणातें[2]? ।
तो तूंच कीं म्हणुनि पूसति लोक सारे,
हा देह सात विति होइल तो[3] कसा रे! ॥ ४

---

जो न गाय हरिचे महिमेला, तो असोनि जित या महि मेला,[5] ।
ऐसियासि श्रम केवि न जाची? मूर्ति इष्ट न जयासि अजाची.[6] ॥ १
कीर्तनीं अजि! पुढें बसवा हो! नायके तरि दुजा बसवा हो! ।
तो बरा पशुचि यान भवाचा, हा नराधम जसा विभवाच्या. ॥
ईश्वरें तुज दिली नरकाया, साधनें करिशि तूं नरका या, ।
भोगिशी[11] निशिदिनीं विषयातें, मानसीं न गणि तूं विष यातें. ॥ ३
कृतयुगाहुनि उत्तम हा कली,[12] म्हणुनि भागवतीं[13] मुनि हाकली ।
नरतनू अति[14] त्यांतहि जी भली, अजितनाम[15] वदे तरि जी भली. ॥ ४
गाऊनियां मधुर हें हरिनाम नाचा, पाहों मग भ्रम कसा हरिना मनाचा? ।
तत्रापि कीर्तनचि मुख्य कली[16] करीतो, होतो तया प्रकट तारक लोकरी तो.[17] ॥ ५
न गर्जती जे हरि गोंढ वाचे, ते पापरूपी नर गाढवाचे, ।
न औतळावे अजि! त्यांस वातें, ज्यांच्या मनीं वास न केशवातें. ॥ ६
दोंटूनि एक हरिनामरसास पाजी, पाजीच जो नवविधा न, करी तपा जी! ।
हा मानवी सुकृतदेह गमावि तोकीं? खेळोनि कांचमणिसी, विषया वि तो कीं. ॥

---

१. आत्मस्वरूपाला. २. देहधारीपणाला. ३. आत्मा. ४. मोठेपणाला. ५. विरोधाभास अलंकार. ६. परमेश्वराची. ७. बैल, नंदी. ८. वाहन. ९. शंकराचें. १०. हा मनुष्य संपत्तीचें वाहन आणि नंदी शंकराचें वाहन. तेव्हां अर्थातच नंदी श्रेष्ठ होय. ११. विषय भोगून नरकसाधनें करतोस. १२. कलियुग. १३. महाभगवद्भक्त ऋषींनीं हाक दिली, ओरड केली. १४. अतिउत्तम. १५. ईश्वरनाम. १६. कलियुगांत. १७. परमेश्वर. १८. एकाग्रमनानें. १९. स्पर्शावे. २०. वाऱ्यानें. २१. जो एक पाजी (निर्लज्ज मनुष्य) दाटूनि (मुद्दाम) नवविधा (नऊप्रकारच्या, नऊप्रकारांनीं उत्पन्न होणाऱ्या) हरिनामरसास (ईश्वरनामामृतास) न पाजीच (पाजीत नाहीं) व जी (अहो!) तपा करी (तपश्चर्या करित बसतो) तो हा मानवी सुकृत देह (महत्पुण्यानें प्राप्त झालेला देह) गमावी (नाहीसा करितो); तोकीं (मुलांमध्यें) कांचमणिसीं (गारगोटीशीं) खेळून तो विषया (नाना

सकळ चिन्मय काढिन मी रैवा, जरि खरा उतरे तरि शीरवा; ।
नग समस्त अशेषचि हेम हो, जग तसें दिसतें, निज नेम हा. ॥ ८
हरीनाम माझें हरीनाम तुझें, हरीरूप माझें हरीरूप तुझें, ।
हरिध्यान माझें हरिध्यान तुझें, हरिज्ञान माझें हरिज्ञान तुझें. ॥ ९

---

पूर्वी नसे शेवटींही नसेना, तें मध्यकाळीं दुसरें दिसेना, ।
दिसे असे तें जग ज्यावरूनी, ते तेंचि हें जाण मनीं धरोनी. ॥ १

---

प्रकारच्या भासरूपी सुखाला, परंतु वस्तुतः दुःखाला) वि (वितो, उत्पन्न करितो)-हा सान्वय अर्थ. हरिनाम न घेतां तपाचरण करून स्वर्गसुखें मिळवूं इच्छिणारा मनुष्य आपली बहुमोल काळ व्यर्थ दवडितो; कसा तर लहान मुलें गारगोट्यांशीं खेळून विस्तव उत्पन्न करितात व आपले हात भाजून घेतात, त्याप्रमाणें काम्य कर्में करणारा मनुष्य आपलें आयुष्य व्यर्थ गमावितो. येथें **निदर्शना** अलंकार आहे. गारगोट्यांशीं खेळणें आणि तपश्चर्या करून आयुष्य गमावणें यांत सादृश्य कल्पिलें आहे. सारांश, हरिनामरसाचा महिमा अगाध आहे, व तो रस जे पिणार नाहींत, किंवा दुसऱ्यास पाजणार नाहींत, ते सर्व पाजी होत; असा सरसकट शेरा पंडितांनीं ठोकला आहे.

१. रवा म्हणजे नाण्याचा एक तुकडा. पैसा किंवा रुपया तापलेल्या तेलांत टाकून तो बिन हात भाजतां जो बाहेर काढील, तो खरा असें पूर्वी समजत. कवि म्हणतो, 'मी चिन्मय रवा काढीन. जर खरा झालों तर माझी स्तुति करा. तेजोरूपी ब्रह्म हें मात्र खरें, बाकी सर्व माया आहे. ब्रह्म हें सोनें आणि जग व तेथील वस्तु हे सोन्याचे अलंकार होत. हे सोन्याचे करितात व आटविले म्हणजे पुनः मूळस्वरूप (सुवर्णस्वरूप) घेतात. सोनें त्रिकाळ असतें तसे अलंकार नाहींत, क्षणविध्वंसी आहेत; म्हणून ते असत्य होत. ब्रह्म मात्र सत्य आहे. २. परमेश्वर. ३. अलंकाराप्रमाणें. ४. हल्लीं पद्याचें स्वरूप आहे तसाच अर्थ केल्यास भक्ताचें व परमेश्वराचें सर्वस्वीं ऐक्य झालें आहे, नाम, रूप, ध्यान, ज्ञान हे दोघांचें एकच आहे, असें दिसतें. हाच अर्थ निराळ्या तऱ्हेनें निघूं शकतो. ती तऱ्हा अशीः-प्रत्येक पंक्तीच्या आरंभीं जो 'हरी'शब्द आहे तो क्रियावाचक आहे असें समजून 'तुझें हरीनाम माझें रूप हरी' असा आणि अशाच प्रकारें सर्वत्र, अन्वय केल्यास 'परमेश्वरा! तुझें नामस्मरण मला माझ्या नांवाचा, रूपाचा, अहंपणाचा व दृश्यज्ञानाचा विसर पाडितें इतकेंच नव्हे, तर तीं सर्व नष्टही करितें-असा अर्थ निघतो; व हाच अर्थ सामान्य वाचकांस विशेष सौकर्यानें समजण्यासारखा आहे. दोहोंमध्यें तात्पर्य एकच आहे कीं भगवच्चिंतनानें भक्ताची भावना परमेश्वररूपी होऊन तो तन्मय झाला आहे. असो. या काव्यखंडास 'नाममाहात्म्य' असें नांव द्यावें असें आम्हांस वाटतें. ५. आदिकाळीं व अंतकाळीं. ६. विपरीत, आहे असें. ७. नश्वर.

ऐकें प्रसिद्धें हरिचीं सुभद्रें, जीं जन्मकर्में हरिती अभद्रें ।
नागें, तयातेंच कथाप्रसंगें, ते गाय निर्लज्ज कि रे! असंगें. ॥ २
हे नेम ज्याला हरिगायनाचे, प्रेमें द्रवे, स्वप्रिय गाय, नाचे, ।
हांसे, रडे, गर्जतसे अहो! तो, दृष्टी जनाच्या जड मूढ होतो. ॥ ३
कैवल्यनाथा वरदेश्वरातें, नरा! वरी ना बुध! नैश्वरातें, ।
जें भोगिती कीं नरकांत कामी, मागेन तें कां नरकांतका मी? ॥ ४
तो मोक्षही मज नसो श्रुतिसार साचा, जेथें नसे रस तुझ्या पदसारसाचा, ।
तूझें सदुक्त चरितामृत देवराया! ऐकेन मी अयुतकर्ण, दिजे वरा या. ॥
वारा तुझ्या पदसरोजसुधालवाचा, जो वर्णितां निघतसे तव भक्तवाचा ।
आम्हांस जो श्रुतिस योगिजनांस योजी, त्यावेगळा वर मुखास तुझ्या न यो जी! ॥

---

कलियुग चवथें हें दोषसिंधूच सारा,
सकळहि नरकाच्या साधनाचा पसारा. ।
परि हरिगुणलीला सत्कथा, यांत सारा,
त्यजुनि सकल धंदा, कीर्तनीं काळ सारा. ॥ १
कुऱ्हाडीच्या घायाप्रति तरु जसा कां तुटतसे?
अहो! आयुष्याचें दिन रजनिघायें स्फुट तसे; ।

---

१. चांगली मंगलप्रद. २. अमंगल. ३. गात जा. ४. लाज न ठेवितां. ५. लोक त्याला वेडा म्हणतात. ६. मोक्षाला. ७. नाशवंता. ८. जें दुःख. ९. ईश्वराला (नरकनाशक स्वामी जो ईश्वर त्याला). १०. वेदांताचें सार (मोक्ष). ११. पादकमलाचा. १२. चांगल्यांनीं गाइलेलें. १३. दहा हजार कान आहेत असा. १४. जी! (हे परमेशा!) तुझ्या पादसरोजसुधालवाचा (चरणकमलामृतांशानें पवित्र झालेला) वारा आम्हां सजो (प्राप्त होवो); श्रुतिस (वेदवाणीला) व योगिजनांस (योगाभ्यास करणाऱ्यांना) यो (येऊं दे). त्यावेगळा वर तुझ्या मुखास न योजी (योजूं नकोस, जो वारा (तुझ्या पदकमलापासून निघणाऱ्या अमृताच्या अंशापासून निघालेला वारा, तुझें चरणाचें माहात्म्य) वर्णितां (वार्णिताना) तवभक्तवाचा (तुझ्या भक्तांचे वाग्विलास निघे (उत्पन्न होतात, स्फुरण पावतात) —सारांश त्वत्पदकमलानें यश गात असतां तुझ्या भक्तांस ज्या कृपालवानें अपठित प्रेरणा होते, तो कृपालव आम्हांस, वेदांस, व योग्यांस मिळूं दे म्हणजे तुझें चरणमाहात्म्य आम्ही गावें, अशी स्फूर्ति आम्हांस येऊं दे. परमेश्वरा! आणखी आम्हांस कांहीं नको—हा सान्वय अर्थ होय. १५. पापसागर. १६. 'सारा' (सगळा) हें काळाचें विशेषण. १७. वेंचा, घालवा. १८. व्यक्त, स्पष्ट.

न देहाची ऐशा वय समजतां उर उलतो,
तया साचें ऐसा कुनर विषयातेंच शुळतो. ॥ २

---

[2]त्रिभुवना जननीजनकास या विसरुनी, भ्रमले जन कासया? ।
हरिचिया धरिता नर कास रे!, न निरखी दैढ तो नरकास रे! ॥ १
करुनि निश्चळ मानस श्रीहरी, रघुपती भजतां दुरितें हरी ।
जनकजापति सौठिं घडींत रे!, पळभरी स्मरतां भव तो तरे. ॥ २
न देतां द्विजां, संचिती पापराशी, दिल्या, जोडत्ये स्वर्गलोकीं मिराशी, ।
असें जाणुनी अन्न देई भुकेल्या, तदा ते न सोडी रैमा कांहिं केल्या. ॥ ३
दिल्या जाते लक्ष्मी म्हणुनि म्हणताती नरकपी,
न देतां, अप्राप्तीस्तव सतत अंतीं नरक पी, ।
कृपा केल्या रामें त्वरित धन धर्मी व्यय किजे,
द्विजांतें पूजावें विनवणि मना! ते अइकिजे. ॥ ४
पूर्वी त्वां धर्म केला म्हणुनि कलियुगीं प्राप्त लक्ष्मी तुला जे
झाली, आतां न देतां पुनरपि [10]कमला राहुं यालागिं लाजे, ।
जाणोनी सर्वकाळीं द्विजहरिभजनीं, सज्जनीं, अन्नदानीं,
वेंचीं द्रव्यास भावें तरि तुज [11]सजणा मोक्ष लाभे निदानीं. ॥ ५
देणार एक मनकल्पित राम लोकीं, त्याकारणें वदनिं बोल, [12]दिठीं विलोकीं ।
आहे जरी [13]कवण शक्ति तुझ्या सुवाचे, वर्णी अखंड मनुजा! गुण राघवाचे. ॥ ६
मुखें ब्रह्मज्ञाना कथिति कर जोडोनि सकळां,
जगा दावीती ते कुशळ कविता गायनकळा, ।
स्वयें आंशाबद्धं सततचि धनालागिं [14]यजिजे,
नव्हे तें गोसांवी [15]त्रिविधजनभोंदू समजिजे. ॥ ७

---

१. मर्यादा. २. तीन्ही जगांचा आईबाप जो त्यास. ३. पाहत नाहीं. ४. खरोखर. ५. ६० घटकेंत एक पळभर. ६. लक्ष्मी. दीनास दिलें नाहीं तर धन दुःखदायक होतें व दिलें म्हणजे लक्ष्मी अखंड वास करिते. ७. शहाणे म्हणवून घेणारे मनुष्य. ८. पुण्यसंचय नाहीं म्हणून. ९. ही प्रार्थना. १०. लक्ष्मी तुझ्या घरीं रहावयाला लाजते. ११. सज्जना. १२. दृष्टीनें. १३. कांहीं. १४. पूजा करितात. १५. नानाप्रकारचे लोकांस फसविणारे असें समजावें.

पदें, ओव्या, नाना त्रिविधपर्थिचे श्लोक शिकुनी
कथा कीजे, तेणें धन मिळविती लोक ठकुनी, ।
नसे प्रेमा चित्तीं अभिनय महा दाविति जना,
असे हे गोसांवी रहित समजा रामभजना. ॥ ८

भले, साधु, ज्ञाते निरखुनि तयां द्वेष करिती,
सदा गर्वी, नीचां नमुनि स्तविजे लौकिकरिती ।
न लावीती दृष्टी क्षणभरि चिदानंदस्वरुपीं,
असे हे गोसांवी उदरभरणाचे बहुरुपी. ॥ ९

अहाहा चौऱ्याशी भ्रमुनि मनुजा सुंदरकशी
तनू हे श्रीरामें दिधलि भजनालागुनि अशी, ।
तितें कैसें मूर्खा! क्षणिकविषयाधीन करिसी?
अनर्घ्या रत्नातें त्यजुनि करिं गारेशि धरिशी! ॥ १०

अहो येतां जातां, बसत उठतां, कार्य करितां,
सदां देतां घेतां, वदनिं वदतां, ग्रास गिळितां, ।
घरीं दारीं, शय्येवरि रतिसुखाचे अवसरीं,
समस्तांची लज्जा त्यजुनि भगवच्चिंतन करीं. ॥ ११

---

वदे शुकाचार्य परिक्षितीतें, कीं धन्य राया! करिती क्षितीतें ।
श्रीभूति जे ब्रह्मसुखानुभूती, तीभोंवती खेळति ज्या विभूती. ॥ १
कलियुगीं जरि कृष्णकथारती, तरि न हे भवकंटक थारती, ।
जितचि मुक्त तरी पैदिं थारसी, जरि नरा! रमसील कथारसीं. ॥ २

---

१. फसवून. २. नाटक. ३. विरहित. रामभजनशून्य. ४. ब्रह्मस्वरूपाकडे. ५. नट. ६. चांगल्या कसास उतरणारी. ७. क्षणभर राहणारे विषय त्यांच्या स्वाधीन. ८. कधुगोल, हा दृष्टांत अलंकार. ९. शुकाचार्य परिक्षितीतें वदे कीं, 'राया! ज्या विभूती (जे श्रेष्ठ पुरुष) ब्रह्मसुखानुभूती (ब्रह्मसुखाचा अनुभव पूर्णपणें घेणारी) जे श्रीभूति (षड्गुणैश्वर्यसंपन्न परमेश्वर) तीभोंवती (तिच्या जवळ, परमेश्वराच्या संनिध राहून) खेळतो (क्रीडा करितात) ते क्षिति (पृथ्वी) धन्य करिती. शुकाचार्य, वेदव्यासाचे परब्रह्मनिष्ठ चिरंजीव, यांनी अर्जुनाचा नातु परिक्षित याला ७ दिवसांत भागवत सांगितलें ही गोष्ट सुप्रसिद्धच आहे. १०. ईश्वराच्या सत्ता. ११. गोष्टी. १२. राहती. १३. जीवन्मुक्त. १४. ब्रह्मपदीं.

रति धरा हरिची, बहु ती व्रजीं[1], हरि असे तुमच्या मतिं[2] तीव्र[3] जी, ।
हरि रुचे स्मरतां, बरवा मना, करि दया कनकांबर[4]। वामना. ॥ ३

---

झाली कृपा सद्गुरु वामनाची, प्रसन्नवृत्ती बरवी मनाची ।
कथामृतीं तृप्त हरी विलासे, नीचात्मवृत्तीं[5] चिदचिद् विलासे. ॥ १
जायासुतादि जग हें भ्रम तो, असारे[6] मायाविलास नटला हरि तोचि सारे ।
चित्रीं विचित्र दिसतो पटिं तंतु एक, विश्वीं अनेक रचना हरि तोचि एक. ॥ २
अनंतशक्ति[7] भ्रम तो हरीतो, तो मोहमाया स्मरणें हरी तो ।
स्मरेचि आत्मा जगिं स्वस्वरूपीं[8], संसार त्याला न वसे स्वरूपीं. ॥ ३
जया पाहतां दृश्य दृष्टींत सारे, असे व्यापुनी अर्थ शब्दीं[9] तसा रे ।
नसे भेद हा पाहतां स्वात्मदृष्टीं, अलंकार हेमीं तसें ब्रह्म सृष्टीं. ॥ ४

---

१. गोकुळांत. गोकुळांत हरीला भजणारे पुष्कळ होते हें प्रसिद्धच आहे. २. मनांत. ३. प्रखर. ४. पीतांबरधरा! ५. नीचात्मवृत्तीं (नीच, खालच्या प्रतीची जी आत्मवृत्ती म्हणजे अहंभाव त्यांत, (स्वाभिमानांत) चिदचित् (ज्ञान आणि अज्ञान यांचें मिश्रण होऊन झालेली माया) विलासे (क्रीडा करिते). ६. खोटें. जायासुतादि हें जग तों भ्रम (आहे). असारे सारे (सगळे) मायाविलास (मायेचे खेळ, हे नानाविध पदार्थ) तोचि हरी नटला (हीं सर्व हरीचीं रूपें असून वस्तुतः एकच आहेत. मायेच्या योगानें आपल्यास निरनिराळी भासतात.) एक तंतु चित्रीं (ज्यावर चित्रें काढली आहेत अशा) पटीं (वस्त्रांत) विचित्र (नाना प्रकारचा) दिसतो. या दृष्टांतानें चतुर्थ पंक्तीचा अर्थ विशेषच स्पष्ट होतो. चवथ्या चरणाचा अर्थ स्पष्टच आहे. ७. तो भ्रम (मायाविलासाचा, विचित्र चित्राचा व विश्वीं अनेक रचनेचा भ्रम) अनंतशक्ति (ज्याची शक्ति अपार आहे, ज्याला कांहींच अशक्य नाहीं असा परमेश्वर) हरीतो (हरण करितो, नाहींसा करितो). स्मरणें (परमेश्वराचें स्मरण केलें म्हणजे) मोहमाया (मोह उत्पन्न करणारी माया सुद्धां) तो (परमेश्वर) हरीतो (नाहींशी करितो). ८. स्वस्वरूपीं जगिं (आपल्याच नटण्यानें, 'बहु स्याम्,' विविध होईन, पुष्कळ होईन, विश्व नटेन, या इच्छेनें आपल्यापासून उत्पन्न करून अस्तित्वांत आणलेलें जें हें जग या जगामध्यें, या सृष्टीला पाहूनही) आत्मा (परमात्मस्वरूप याप्रतच) स्मरे (तो परमेश्वर स्मरतो. स्वस्वरूपापासून त्याची वृत्ति ढळत नाहीं.) त्याला स्वरूपीं (आत्मस्वरूपामध्यें) संसार (हीं नानाविध सृष्टि) न वसे (वसत नाहीं, नसते). या श्लोकांत परमेश्वराचें 'कर्तुमकर्तुमन्यथाकर्तुम्' असलें अनंत सामर्थ्य, व त्याचें सत्स्वरूपी ज्ञान याचें पंडितांनी दिग्दर्शन केलें आहे. ९. शब्दीं जसा अर्थ व्यापूनि असे (शब्दाला सर्वत्र व्यापून जसा अर्थ असतो, पुनः शिल्लक राहतो) तसा.

कळे ज्या शब्दातें स्थिरचर[1] जगीं व्यापुनि असे,

तरी त्याला भ्रांती चरट[2] न दिसे सर्पचि दिसे ।

ययालागीं संतां शरण निघतां द्वैत[3] निरसे,

कृपासाक्षात्कारें, अनुभवबळें ब्रह्मचि दिसे. ॥ ५

दिसे ब्रह्म ज्याला भवातें[4] गिळूनी, दिसे[5] तें न दीसे स्वरूपीं[6] वळूनी, ।

वळूनी घनानंदवृष्टी सुखाची, पिके भूमि ही ब्रह्मसायुज्यतेची. ॥ ६

सायुज्यादि मुक्ती[7] सुखें याचि देहीं असे भोगुनी, वर्तती तो विदेही[8] ।

निजानंदबोधीं[9] निजीं[10] नीज पाहे, चिदात्मा[11] जगीं[12] वामनाची कृपा हे. ॥ ७

---

१. स्थिरचर जगीं (या स्थावरजंगमात्मक विश्वाला) व्यापूनि असे (ब्रह्म हें सर्व जग व्यापून आहे, सर्व ब्रह्ममय आहे) असें ज्या (ज्या मुमुक्षूला) शब्दातें कळे (शब्दानें मात्र कळलें, शब्दज्ञान मात्र झालें), तरी त्याला (त्या पुरुषाला) भ्रांति (मोह, अज्ञान हें असतेंच). त्याला चरट (चन्हाट, दोरी, रज्जु) न दिसे, सर्पचि दिसे (साप दिसतो). तात्पर्य, ज्या मुमुक्षूला 'हें सर्व विश्व ब्रह्ममय आहे, दुसरी वस्तु नाहीं' असें शब्दज्ञान मात्र झालें, परंतु अनुभव आला नाहीं, त्याला भ्रांति म्हणजे मोह सोडित नाहीं. खरी दोरी असतांना आपण तिला 'साप, साप' म्हणून घोकीत बसतों, हें जें आपलें अज्ञान तें केवळ शाब्दिक ज्ञान झालें म्हणजे नाहींसें होत नाहीं. मायेनें उत्पन्न झालेलें अज्ञान घालविण्यास मुख्य उपाय म्हणजे संतां शरण रिघतां (गेलें म्हणजे) द्वैत (भेदाभेदबुद्धि) निरसे (नाहींशी होते). शब्द ब्रह्मज्ञानानें भ्रमाचा निरास होत नाहीं या लागीं, (यासाठीं) साधूंस शरण गेलें पाहिजे. शरण गेल्यावर कृपासाक्षात्कारें (कृपेचा साक्षात्कार झाल्यावर, संतांनीं कृपा करून ब्रह्मस्वरूपाचा प्रत्यक्ष अनुभव आणून दिल्यावर) त्या अनुभवबळें (त्या अनुभवाच्या सामर्थ्यानें) ब्रह्म दिसे (ब्रह्मस्वरूपाची पूर्ण ओळख होते). सारांश, सांगावयाचें हें कीं गुरूच्या साक्षात्काराशिवाय ब्रह्माची खरी व अनुभवसिद्ध ओळख होत नाहीं, आणि म्हणून द्वैतबुद्धि नष्ट होत नाहीं. त्याला गुरुकृपाच पाहिजे. २. चन्हाट, दोरी. ३. जीवात्म्याचा भेद. ४. संसाराला, भेदबुद्धीला. ५. दृश्यमान. ६. स्वस्वरूपाचा परिचय झाल्यावर. ७. मुक्ति चार प्रकारची आहे:—१ सलोकता (परमेश्वर आहे तेथें राहणें) २ समीपता (परमेश्वराच्या संनिध राहणें), ३ सरूपता (परमेश्वराच्या स्वरूपाप्रमाणें आपलें स्वरूप होणें) आणि सायुज्यता (परमेश्वराशीं तादात्म्य होणें, 'अहं ब्रह्म' असें होणें) ह्या चार मुक्ति होत. ८. देहाविषयीं उदासीन. ९. ब्रह्मानंदाच्या ज्ञानामध्यें. १०. स्वतःच्या. ११. स्वात्मा. १२. यात्र मृत्युलोकीं.

## १६. स्फुट सवाया.

नीपट[1] हें मन लंपट होउनि सोकविलें रतिच्या[2] सदना,
 दावुनियां प्रमदा[3] नटवैभव[4] नाचवि कामभरें मदना, ।
शेवटिं काळ लपेटिल हें वय, सोडवितां[5] न दिसे कदना,
 स्वप्न असोनि नसे सुटका, घटका पळ राम न ये वदना. ॥ १
अंबुज[6] एक करीं अवलंबुनि भक्तिपुरःसर बोल तसे
 हृत्कमळीं कमळापति[7] चिंतुनि मंदगिरा मग बोलतसे, ।
'हृद्रत तूं निजमूर्तिसुखा! तुजवीण दुजा मज कोण असे?
 पाव अपाय निवारुनि, मी मज दावुनि वारिं समूळ पिसें[8].' ॥ २
भक्तिसुखें प्रल्हाद तरे, मुनि नारद भक्तिसुखें विचरे[9],
 भक्तिसुखें सनकादिक पावन, भक्तिसुखें उपमन्यु[10] तरे, ।

---

१. अत्यंत. २. कामगृहाला. ३. स्त्रिया. ४. शृंगारोत्पादक अभिनयकौशल्य, चेष्टा. ५. सोडविता म्हणजे सोडविणारा. काळाशीं युद्ध करित असतां आपल्या वयाला तो लपेटील, गुंडाळून टाकील, आपल्यास नाहींसें करील; आणि या कदनाला, लढाईंत आपल्यास सोडविणारा, मदत करणारा, कोणीं दिसत नाहीं. ही लढाई जरी स्वप्न आहे म्हणजे खरी खरी नाहीं, तरी आपल्यास मोहानें ती खरी भासत असल्यामुळें आपली सुटका, लढाईंतून मोकळीक, होण्याची आशा नाहीं. एक मात्र आहे कीं, मुखानें एक घटकाभर, निदान पळभर तरी रामनामाचा उच्चार झाला तर सुटकेला मार्ग आहे; नाहीं तर नाहीं. ६. गजेंद्राला नक्रानें धरिलें असतां निरुपाय जाणून त्यानें आपल्या शुंडादंडानें एक कमलपुष्प कमलापतीला, विष्णूला भक्तिपुरःसर अर्पण केलें व त्याचा धांवा केला, त्यास अनुलक्षून हें पद्य आहे. अंबुज म्ह० कमल. करीं म्ह० सोंडेंत. मंदगिरा म्ह० मंदवाणीनें. निजमूर्तीला सुख देणारा म्ह० आत्म्यास सुख देणारा, किंवा निजमूर्ती म्हणजे स्वरस्वरूप जो चिदात्मा त्यामध्यें सुखानें रममाण होणारा परमेश्वर. अपाय म्ह० संकट, नक्रानें बद्ध केल्यामुळें प्राप्त झालेलें संकट. मी मज दावुन म्ह० माझ्या स्वरूपाची मला ओळख करून देऊन. गजेंद्रास नक्रानें धरिलें असतां जसा त्यानें धांवा केला, तसाच काळपाशानें बद्ध झालेल्या मनुष्यानें परमेश्वराचा अनन्यभावानें धांवा करावा, हें या पद्यांत सुचविलें आहे. ७. लक्ष्मीपति. ८. वेड, अज्ञान. ९. भुवनत्रयांत हिंडतो. १०. उपमन्यु हा व्याघ्रपाद ऋषीचा मुलगा. दुधासाठीं हट्ट घेतला तेव्हां त्याच्या दरिद्री मातेनें त्यास पाण्यांत पीठ कालवून दिलें! पण उपमन्यूचें समाधान होईना. 'पूर्वजन्मीं ईश्वराराधन केलें नाहींस, म्हणून या जन्मीं तुला सुखाचे पदार्थ मिळण्याचे नाहींत' असें मातेनें सांगितल्यावरून या बाळानें तपश्चर्या करून ईश्वरास प्रसन्न करून घेतलें आणि त्याकडून क्षीरसागराचें आधिपत्य मिळविलें!

भक्तिसुखें ध्रुव बाळ सुखावे, व्यास सुखें जगताप हरे,
वाल्मिकि, अंबऋषी, बळि, भीष्म, शुकादिक तन्मय भक्तिभरें.॥ ३
उद्धव, अर्जुन, धर्म, बिभीषण, रामपदीं रत चित्त जयांचें,
अक्रुर वैष्णवभक्त, कपी हनुमंत, सभाग्य जिणें विदुराचें, ।
[4]भानुकुळीं रुकमांगद भक्त, सुधाकरवंशिं परीक्षिति साचे,
[6]ऐक्य निरंतर, चित्स्वरुपीं निज भक्त, वदे श्रुति नाम तयांचें. ॥ ४
उद्धरिला [7]अजमेळ अहंकृति, तारियली [9]गणिका अघरासी,
हिंसक [11]व्याध अगाध जिवांप्रति [12]विंधुनियां शर भक्षित त्यांसी, ।
[13]चोज कसें? मज सांग तयाहुनि पातक काय असे मजपाशीं?
'दीनदयाकर' हे [14]बिरुदावळि वानिति वेद निरंतर कैशी? ॥ ५

---

१. जगाचा ताप हरण करी. २. अंबऋषी हा महाभगवद्भक्त. दुर्वासानें याचा छळ केला. साधनद्वादशीची गोष्ट सर्वांस विदित आहेच. ३. सुखमय. ४. सूर्यवंशीं. ५. चंद्रवंशी. ६. ऐक्य निरंतर म्हणजे परमेश्वराशी ज्यांचें निरंतर (कायमचें, किंवा ज्यांत कांही अंतर नाहीं असें, पूर्ण मिळणीं मिळालेलें) ऐक्य (एकरूपता) ज्ञान उत्पन्न होऊन निज चित्स्वरूपीं म्हणजे स्वतःच्या (भक्ताच्या) चिन्मयस्वरूपामध्यें भक्तिभावानें लीन झाले असे भक्त, त्यांचीं नांवें वेद घेतात. ७. अजमेळ हा कान्यकुब्ज देशांत राहणारा एक विषयासक्त ब्राह्मण होता. पुत्राला हाक मारतांना नारायण नामाचा यानें उच्चार केला, तेवढ्या पुण्यानें त्यास अनुताप होऊन त्यानें परमेश्वराची आराधना केली व मुक्त झाला! ८. अभिमानवश. ९. गणिका म्हणजे वेश्या. पिंगला नामक वेश्येला अनुलक्षून लिहिलें आहे. वेश्याधर्माप्रमाणें वागत असतां एक दिवस तिला गिऱ्हाइक आलें नाहीं, म्हणून पश्चात्ताप झाला आणि हृदयस्थ जो परमात्मा त्यालाच सनातन पति असें समजून ती आत्मस्वरूपीं रममाण झाली आणि मुक्त झाली. १०. पापराशी. ११. हिंसक व्याध अनेक जीवांप्रति शर विंधुनिया त्यांस भक्षित (असे)–हा अन्वय. या व्याधाची व एका ऋषीची गांठ पडून तो मुक्त झाला ही गोष्ट नुकतीच आली आहे. १२. शरानें नेम धरून. १३. चोज कसें? हें तुझें लीलाकौतुक किती तरी अवर्णनीय आहे? महत्पापराशी अजामेळ, पिंगळा, व्याध यांचा उद्धार केलास तेव्हां तुझी लीला किती वर्णन करावी? मग माझा उद्धार कां होत नाहीं? माझें पातक यांच्याहून जास्त आहे काय? पण असलें तरी काय झालें? तूं दीनदयाकर म्हणजे दीनवत्सल आहेस म्हणून तूं माझा उद्धार करशीलच. न केलास तर वेदश्रुति 'तूं दीनदयाकर आहेस' अशी तुझी कीर्ति कशी वर्णन करतील? माझा उद्धार केला नाहींस तर वेदांना तुझी दीनदयालुत्वाची कीर्ति वर्णन करितां येणार नाहीं. सारांश, 'स्वकीर्ति रक्षण करणें असेल तर मला तार' अशी भक्ताची प्रार्थना आहे. १४. ब्रीदांची ओळ, नाममाला.

वैभव[1] त्यांत समस्त कि मस्तकिं त्या हरिचें पदरेणु जरी,<br>
अश्वखुरींत[2] खुरीं उठतां रज ते पडतात तयाचे शिरीं ।<br>
क्लेश न लेश उरे स्मरतां मुख, जें सुख नित्य अशेष[3] करी,<br>
त्या वदनेंदुवरि[4] श्रमबिंदुहि दीसति पार्थरथीं समरीं. ॥ ६<br>
तूं अज, अव्यय, नित्य, निरामय[5], तूं सदचिन्मयसौख्यनिधाना[6],<br>
हें[7] जगडंबर भासत तद्वत, वोघ तरंग जळावरि नाना ।

---

१. त्या (ज्या?) हरिचें पदरेणु जरी मस्तकिं, कि (तर) त्यांत समस्त वैभव तयाचे शिरीं, अश्वखुरींत खुरीं रज उठतां ते (रज पडतात!)–हा अन्वय. परमेश्वराचें भक्तवात्सल्य केवढें आहे, तें सांगतातः–ज्या परमेश्वराचे पायाचा एक रेणु (एक धूलीकण) मस्तकावर पडला असतां सर्व वैभव प्राप्त होतें (चारही पुरुषार्थ साधतात), त्याच ईश्वराच्या शिरावर घोडशाळेमध्यें अश्वांच्या पायांपासून उत्पन्न झालेली धूळ उडत असे! म्हणजे आपल्या पदरेणूनें अहल्यादिकांस पावन करणारा भक्तकैवारी पुरुषोत्तम अर्जुनाच्या घोड्यांची चाकरी करित असतां त्या सर्वोत्तमाचें आंग धुळीनें मळून जात असे! तसेंच '(जें) मुख स्मरतां क्लेश न उरे (व) जें सुख नित्य (व) अशेष करी, त्या वदनेंदूवर, समरीं (युद्धांत) पार्थरथीं (अर्जुनाच्या रथावर) श्रमबिंदु दिसतात.' अर्थ स्पष्टच आहे. क्लेश निवारण करून निरंतरचें व पूर्ण सुख देणारें ईश्वराचें मुखकमल, त्यावरच श्रमजनित घर्मबिंदु दिसावे हें आश्चर्य नव्हे काय? अथवा भक्तांचे योगक्षेम चालविणाऱ्या परमेश्वराच्या ठायीं हें आश्चर्य तरी कसलें? भक्तांचे इष्टमनोरथ पूर्ण करण्यासाठीं परमेश्वर वाटेल तें काम करण्यास तयार असतो. युद्धांत पार्थाच्या रथावर बसून आपल्यास श्रमवून घेतो. २. अश्वशाळेंत. ३. पूर्ण. ४. मुखचंद्रावर. ५. निरामय म्हणजे निर्विकार. 'सच्चिन्मय' असें पाहिजे, 'सदचिन्मय' हें वृत्त सुखासाठीं घातलें आहे. परमेश्वराचें हें स्वरूप लक्ष्यांत ठेवावें. भगवद्गीता–अध्याय २ श्लोक २० व २१ वाचल्यास, अज, अव्यय वगैरे विशेषणांची फोड चांगल्या रीतीनें समजेल. ६. सत्, चित् आणि आनंदाचा ठेवा. ७. 'जळावरि नाना (अनेक) वोघ (ओघ) तरंग (लाटा) तद्वत् हें जगडंबर (जगाचा पसारा) भासत (आहे). अर्थ स्पष्ट आहे. जळ सत्य, ओघतरंग असत्य त्याचप्रमाणें तूं (परमेश्वरा!) सत्य आणि हें बहुरूपी जग आभास होय. तसेंच कुंडल, किंकिणी (क्षुद्र घंटा) वगैरे हें कांचन (सोनें, मूळस्वरूपांत एकच सोनें) बहुधा (नाना प्रकारचीं) अभिधाना (नांवें) त्या सुवर्णास आहेत. सारांश, आपल्यास जें अनेक असें दिसतें, त्याचें नामरूप काढून घेतलें म्हणजे एकच ब्रह्म कायम राहतें. वेद वदे (सांगतात), 'जग तद्वत (नामरूपें घेऊन अनेक झाल्यासारखें, सुवर्णाच्या निरनिराळ्या अलंकारासारखें) भासत आहे, मूळस्वरूपांत हें जग नाहीं. तर काय आहे? तूं एक, निरंतर (ज्यास अंतर नाहीं असा, सर्वत्र घनदाट अशा स्वस्वरूपानें भरलेला असा) आहेस. तूं नाना भव (जन्म, स्वरूपें) नातळसी (स्पर्श करित नाहींस. घेत नाहींस). सारांश 'एक स्वरूपानें सदैव व सर्वत्र असणारा असा तूं एकच आहेस, हें जग आभास म्हणून असत्य आहे' असें वेद सांगतात. ८. लाटा.

कुंडल, किंकिणि, नूपुर, कंकण, कांचन हें बहुधा अभिधाना,
वेद वदे, 'जग तद्वत, एक, निरंतर नातळसी मन नाना.' ॥ ७

विश्वरुपा! अरुपा! अविकार! अनाम! असंग! अनंत! अपारा!
शास्त्र पुराण विवाद सदा करिती परि नेणति निश्चित पारा।
विश्व तुझ्या स्वरुपीं परिकल्पिति विद्यत वानिति विश्वअधारा!
'नेति' वदोनि सरे श्रुतिवाद, न वाच्य अवाच्य, वृथा श्रम सारा.॥ ८

साच नसे मृगतोय, सुनिश्चित आश्रय भानु तयाप्रति पाहे,
लोह चळे परि चुंबक अक्रिय निष्क्रिय तेंवि विलासत आहे।

---

१. सोनें. २. ह्याच सिद्धांताचें स्पष्टीकरण करण्यासाठीं पुन: म्हणतात:—'विश्वरूपा, अरूपा' इ० इ० 'अपारा' (ज्यास पार नाहीं, पैलतीर नाहीं अशा) तुझ्या स्वरूपाविषयीं, शास्त्रें पुराणें सदा विवाद (ऊहापोह, भवति न भवति) करितो, पण निश्चित पारा नेणती (जाणत नाहीत. तुझें स्वरूप निश्चयानें त्यांस कळत नाहीं.) तुझ्या स्वरूपीं विद्यत (विद्यमान असणारें) विश्व परिकल्पिति (विश्वाची स्थापना करितात) आणि हे विश्वअधारा (विश्वास आधारभूत असणाऱ्या तुला) वानिति (स्तुति करितात.) श्रुतिवाद 'नेति' वदोनि (न, न असें म्हणून, हें नव्हे हें नव्हे असें म्हणून) सरे (संपतो). तूं कसा आहेस? 'वाच्य न (बोलतां न येण्यासारखा, अवर्णनीय) व अवाच्य न (अवर्णनीय नाहीस असा) आहेस.' म्हणजे तुझ्याविषयीं कांहीं बोलतां येत नाहीं, व बोलतां येत नाहीं असेंही नाहीं! सारांश तू गूढ आहेस. म्हणून तुझ्या स्वरूपाचें वर्णन करणें 'हा सारा वृथा श्रम' आहे. तात्पर्य; तुझें स्वरूप वादविवाद करून कळावयाचें नाहीं. निजस्वरूपाची ओळख गुरुमुखानें करून घेतली तर मात्र ब्रह्मस्वरूप आकलन करितां येण्याजोगें आहे. ३. संत काय पाहतात याविषयीं सांगतात:—'मृगतोय साच नसे, तया प्रति (मृगतोयाप्रति) सुनिश्चित (सिद्धांतानें ठरविलेला) आश्रय (आधार, मूळकारण) भानु (हें) पाहे. लोह चळे (हालचाल करितें) परि (पण) चुंबक (लोहचुंबक) अक्रिय (स्थिर, निर्विकार) त्याप्रमाणेंच निष्क्रिय (कार्य न करणारें; अविकारी, तटस्थपणानें अगर उदासीनपणानें राहणारें परब्रह्म) विलासत आहे.' लोहचुंबकाच्या आकर्षणानें लोखंड हालचाल करितें पण चुंबक जसा स्थिर असतो, त्याप्रमाणें ब्रह्माची स्थिति आहे. त्याच्या सत्तामात्रेंकरून विश्वांत नानाप्रकारच्या घडामोडी होतात, पण तें स्वतः निश्चल आहे; हें सांगावयाचें आहे. पुन: सांगतात:—'घट साच (खरा) नसे; तो चिद्रूप (चित् याचें एकरूप म्हणजे स्वरूप, विकार आहे.) तंतु तद्रूप (ब्रह्मस्वरूप; सत्स्वरूप आहे पण) पटादिरूपें (पटवगैरेंच्या रूपांनीं) दिसताहे. (भासमान होत आहे.) हें अलौकिक निजगुह्य (अपूर्व असें रहस्य) संत (आत्मविचार करणारे) जाणति.' हें स्वरूप कसें आहे? 'अनंतरूपें (नानारूपांनीं) रमताहे (रममाण होणारें दृश्यमान असणारें) हें अलौकिक निजगुह्य संत मात्र जाणिति.' याप्रमाणें विश्वांत नानाप्रकारचें भासणारें परंतु अंतर्यामीं एकस्वरूपानें परब्रह्मस्वरूप स्वतः गुणरहित असें संत मात्र जाणतात. ४. मृगजळ. ५. सूर्य.

साच नसे घट चिद्रुप तद्रुप तंतुपटादिरुपें दिसताहे,
हें निज गुह्य अलौकिक जाणति संत अनंतरुपें रमताहे. ॥ ९

निर्गुण जें रुप यापरिचें विणभेद सगूणहि त्या वदती,
तें सुखदायक मानुनि एक विरॉग धरूनि मनीं भजती ।
भक्तिसुखें तुज अर्चिति उत्तम ते परमीतरहीत किती,
त्या करुणाकर श्रीचरणाप्रति मी शरणागत आर्तमति. ॥ १०

काळखि लाविति जे गगनासहि काळखि लागे करीचवरी,
भूचर भानुवरी जरि थुंकिति थुंकि पडे वदनाचि वरी; ।
कर्म करूनि अकर्म, तथापिहि धर्मविरुद्ध कदा न करी,
त्यासिच वंदिति वंद्य, जगत्रय हें म्हणे, वामन त्याचिपरी. ॥ ११

---

१. अपूर्व. २. असे जर आहे, जर परब्रह्म निर्गुण, निर्विकार, व अचलस्वरूप आहे, तर मग त्या संबंधानें मनुष्याचें कर्तव्य कांहीं नाहीं, अशी शंका येईल म्हणून सांगतात:– या परीचें विणभेद (भेदरहित, विण म्हणजे शिवाय) जें रूप (परब्रह्मस्वरूप) त्या (त्याला, त्या स्वरूपाला, निर्गुणाला) संत सगुण (गुणसहित) असें वदति' (बोलतात. तेंच निर्गुण सगुण आहे असें संत सांगतात. मनाला स्थैर्य येण्यासाठीं त्या गुणशून्याला सगुणस्वरूपी करितात), आणि 'तेंच एक (सगुण, षड्गुणैश्वर्यसंपन्न परब्रह्म) सुखदायक मानुनि (व) मनीं विराग (वैराग्य, निष्कामबुद्धि) धरुनि भजती (भजन करितात). म्हणजे परमेश्वराला, निर्गुण अशा परब्रह्माला सगुणस्वरूप देऊन भक्तिसंप्रदाय वाढविला. परमेश्वराची ते भक्ति करितात ती आपली कांहीं मनीषा तृप्त व्हावी, आपल्यास कांहीं ऐहिक सुख मिळावें, एतदर्थ नाहीं तर सर्वत्र एक असणारा जो षड्गुणैश्वर्यसंपन्न, अनंतकोटिब्रह्मांडनायक श्रीभगवान् त्याच्या स्वरूपाची ओळख होऊन भक्तिसुखामध्यें निरंतर रममाण व्हावयास सांपडावें, भेदबुद्धि नष्ट होऊन जगाचा उद्धार करण्याची शक्ति यावी अशा परमार्थबुद्धीनें ते भक्ति करितात. 'ते किती परमितिरहित (अपार) अशा उत्तम भक्तिसुखें तुज अर्चिति, त्या करुणाकर (दयाळु वात्सल्यपूर्ण) श्रीचरणाप्रति मी आर्तमति (काय करावें हें समजत नाहीं, जगाच्या त्रिविध तापांनीं व मनाच्या तळमळीनें जिगजिगलेला व म्हणूनच आतुर झालेला) शरणागत (आहे). ३. इतर सुखांविषयीं वैराग्य. ४. हातालाच. ५. आकाशाला काळोखी लावण्याचा प्रयत्न करून स्वतःचे हात काळे करून घेणारे, व सूर्यावर थुंकण्याचा प्रयत्न करून आपल्याच तोंडावर थुंकी उडवून घेणारे पुरुष ज्याप्रमाणें स्वतः कर्म करून त्याचें फळ भोगितात, त्याप्रमाणें तुम्ही करूं नका असा उपदेश या सवाईतील प्रथम दोन चरणांत पंडितांनीं केला आहे; व हा उपदेश करितांना सहज **अप्रस्तुतप्रशंसा** नामक अलंकार प्रत्येक चरणांत झाला आहे. कित्येक अलंकारवेत्ते यांस **दृष्टांत** म्हणतात. असो; पुढच्या दोन चरणांत पंडित

एक असोनि अनेक दिसे, करितांचि विवेक समाधि वसे,
एकचि तंतुहि सर्वपटीं, घटिं माति, तसी श्रुति बोलतसे. ।
शाब्दिक बोलणें तें उदकावरि रेघ जसी लिहितांचि नसे,
श्रीगुरुच्या चरणीं म्हणे वामन लोळलिया सुख तें गवसे. ॥ १
वैभव हें क्षणभंगुर केवळ, दों प्रहरीं जसि चंचल छाया,
आप्तजनें असतीं परि शेवटिं कोणिहि सिद्ध नव्हे सैम जाया, ।

---

सांगतातः—कर्म करून अकर्म राहा. म्हणजे शरीरयात्रा चालण्यापुरतें कर्म करणें अवश्य आहे तेवढें केलेंस तरी अकर्म ऐस (केलेलें कर्म परमेश्वरास अर्पण कर व त्या कर्मापासून आपल्याला कांहीं लाभ होण्याची आशा बाळगूं नको. गीताभाष्यांत आचार्यांनीं म्हटल्याप्रमाणें 'फलाभिकांक्षारहित' कर्म कर). तुझी फलाशा नाहींशी झाली, किंवा ईश्वरास आपलें कर्म अर्पण केलेंस म्हणून तुला वाटेल तें कर्म करण्याचा अधिकार आला असें नाहीं. धर्मविरुद्ध कोणतेंही कर्म करूं नको. असें जे करितात त्या सत्पुरुषाला वंद्य म्हणजे वंदण्यास योग्य असे श्रेष्ठ पुरुष वंदितात (नमस्कार करितात.) जगत्त्रय (स्वर्ग, मृत्यु आणि पाताळ येथील लोक) हेंच म्हणतात (तो सत्पुरुष वंद्य असें म्हणतात). वामनही त्याचपरि म्हणतो. फलाभिकांक्षारहित कर्म करणें याला इंग्लिशभाषेंत 'Disinterested actions' असें म्हणतात. आपलें कर्तव्य म्हणून आपण कर्म करावें, त्यापासून कांहीं लाभ होईल, या आशेनें कर्म करूं नये; लाभ हानि प्राप्त होणें हें यदृच्छेवर अवलंबून आहे, लाभ होतो, सुख मिळतें म्हणून कर्तव्य करावयाचें (उदाहरणार्थ खरें बोलावयाचें) असें नाहीं, तर आपलें तें कर्तव्य आहे म्हणून करावयाचें हें सांगण्याविषयीं भगवद्गीतेचा व अंतर्ज्ञानी (Intuitionists) तत्त्वज्ञांचा कटाक्ष आहे. अर्थात् हें भाग्य अवर्णनीय—नव्हे अचिंतनीयच होय. भक्तांचें भाग्य केवढें असतें व भगवंत दासानुदास कसा होतो हें पंडितांनीं **उदात्त** अलंकाराच्या साहाय्यानें उत्कृष्ट रीतीनें प्रकट केलें आहे.

१. (हें विश्व) एक असोनि अनेक (नानाप्रकारचें, भिन्न भिन्न असें) दिसे (भासतें); (परंतु) विवेक (खरें खोटें याचा निर्णय, सदसद्विचार) करितांचि समाधि (भेदरहित, अद्वैत असें) वसे (आहे असें कळतें). सर्वपटीं (सर्ववस्त्रांमध्यें) एकचि तंतु (एकच द्रव्य, एकच समवायिकारण) घटीं (एकचि) माती आहे. श्रुति (वेदवाणी) तसी (याचप्रमाणें) बोलतसे. सारांश, सर्व विश्व एकच आहे, मायेनें बहुविध भासतें, असें वेद सुद्धां सांगतात. पंडित म्हणतात कीं, 'हे सिद्धांत तोंडानें बरळणें हें पाण्यावर रेघ काढण्याच्या प्रयत्नाप्रमाणें व्यर्थ होय. नुसते सिद्धांत बडबडणें हें निष्फल होय. बडबडण्यानें मनाची शांति होणार नाहीं. जर कोणाला अनुभवसहित शांतिसुखाचा लाभ पाहिजे असेल तर त्यानें श्रीगुरुचरणांवर लोटांगणेंच घातलीं पाहिजेत (अनन्यभावानें त्यास शरण गेलें पाहिजे). तृतीयचरणांत **निदर्शना** अलंकार आहे. २. बरोबर.

दुर्घट हा भवसागर दुस्तर कोण करील तयासि उपाया ?
  'होइं तरी शरणागत स्वागत लक्षुनियां धरि श्रीगुरुपायां. ॥ २

नाभिसरोरुहिं गंध असोनि न जाणुनि हिंडतसे मृग रानीं,
  कंठमणी निजकंठिं असोनि परा पुसते उचलूनि स्वपाणी ।
कामदुघा निजआंगणिं नेणुनि मागतसे 'मज तक्र शिराणी,'
  तेंवि सदैव न जाणति हें गुज अंतरिं राघव चिन्मयखाणी. ॥ ३

दुर्लभ मानवदेह, तयांतहि दुर्लभ तें किति काळ जिणें,
  त्यांतहि दुर्लभ संतसमागम काय जिणें हरिभक्तिविणें ? ।

---

१. दुपारच्या सांवलीप्रमाणें इहलोकचें वैभव चंचल आहे, आपले आप्त इष्ट पुत्र दारा वगैरे सुद्धां शेवटीं (अंतकाल प्राप्त झाला असतां) बरोबर जाण्यास तयार नसतात. सारांश, हा भवसागर (प्रपंच, संसार) दुर्घट (कठिण) आणि दुस्तर (तरून जाण्यास अशक्य) असा आहे. याला उपाय (हा भवसागर तरून जाण्याला), उपाय (साधन) कोण करील (कोण शोधून काढील, कोण मिळवून देईल)? ज्याच्याकरितां इतकी धडपड करितोस तें वित्त चंचल आहे म्हणून तें तुला तारणार नाहीं; ज्यांच्या सुखदुःखांविषयीं तूं अपार काळजी वाहतोस तेही तुला संकटकाळीं मदत करणार नाहींत. आणि संसार म्हणजे धन आणि बायकापोरें होत. हीं तुझ्या उपयोगीं पडावयाचीं नाहींत. तेव्हां काय करशील? तर श्रीगुरुपायीं शरणागत हो आणि स्वागत लक्षुनियां (उत्तम आदरातिथ्य भक्तिप्रेमानें करून) श्रीगुरुपायां धर. (सारांश, अनन्यभावानें सद्गुरूला शरण जा म्हणजे ते तुला तरणोपाय सांगतील. प्रथम पंक्तींत **दृष्टांत** आहे. २. नाभिकमळीं. ३. स्वकर, आपले हात. ४. कामधेनु. ५. आवडीनें. ६. पहिल्या तीन चरणांत घेतलेले तीनही दाखले सहज समजण्यासारखे आहेत. व या सर्वांचें तात्पर्य 'मूर्ख व अज्ञान लोक अंतरीं (आपल्याच जवळ) चिन्मयखाणी (चित्स्वरूपाचें मूलस्थान) राघव (आत्माराम) आहे, अंतःकरणांत चिन्मय आत्माराम आहे हें गुज (रहस्य) सदैव न जाणति, हें चवथ्या चरणांत सांगितलें आहे. आपल्याच जवळ निर्मळ, निरामय सुखाचा सांठा भरपूर भरला असतां आपण क्षणजीवि सुखासाठीं .रानोमाळ हिंडतों व तें अर्थातच कोठें सांपडत नाहीं हें या सवाईंत सांगितलें आहे. वरील तीन्ही दृष्टांत वेदांतदृष्टीनें फारच समर्पक आहेत असें कोण म्हणणार नाहीं? त्यांतही घरीं कामधेनु असून बाहेर ताकाची भिक्षा मागणाऱ्याचा दृष्टांत तर फारच योग्य होय. ७. किति काळ जिणें. (जितके दिवस आपल्यास जगावयाचें आहे, तो आपला आयुर्दाय). आधीच मनुष्यदेह प्राप्त होणें कठिण, त्यांत कांहीं दिवस जगणें कठिण आहे हें प्रथम चरणाचें तात्पर्य होय. पुढें संतसाधूंचा सहवास व भगवद्भक्ति (हरिभक्तिशिवाय जगणें म्हणजे मरणेंच होय असें पंडितांस सांगावयाचें आहे). या उभयतांची कष्टसाध्यता सांगून तिसऱ्या व चवथ्या ओळींत पंडित म्हणतात:--ज्यांसि हरि प्रिय (ज्यांचें प्रेम परमेश्वरा-

ज्यांसि हरि प्रिय जे हरिचे प्रिय भेटति ते जगदात्मपणें,
दुर्लभ दुर्लभ ते म्हणे वामन जे मन शोधिति विष्णुगुणें. ॥ ४
जान्हवि[1] सागरिं ऐक्यहि[2] होउनि भेटि अखंड तयासि तिळा,
त्यांचेंचि मेघमुखें जळ घेउनि त्यांतचि मेळवि त्या सलिला,[3] ।

---

वर मात्र आहे) व जे हरीचे प्रिय (लाडके आहेत, ते जगदात्मपणें (जगत् हेंच आपलें आत्मस्वरूप या भावानें, सर्व जगभर आपण आहों अशी भावना धरून, सारांश भेदाभेद सर्व नष्ट झाले आहेत अशा स्वरूपानें) भेटति, ते दुर्लभ दुर्लभ (मिळण्यास अतिशय कठिण, अतिशय कठिण) आहेत. असल्या साधूंचें सामर्थ्य केवढें आहे ? ते विष्णुगुणें (सत्वगुणाच्या योगानें. सत्वगुणाचें अधिष्ठातृदैवत विष्णु आहे म्हणून विष्णु म्हणजे लक्षणेनें सत्ववृत्ति होय. किंवा विष्णु याचा यौगिक अर्थ सर्व विश्वभर प्रवेश केलेला, विश्वंभर, त्याचा गुण म्हणजे विश्व आपणच आहोंत हें समजण्याचें सामर्थ्य त्यानें. सारांश सत्वगुणानें अगर अद्वैत ज्ञानानें) ते साधु मनःशुद्धि करितात. असले सामर्थ्यशील साधु भेटणें हें तर अत्यंत दुर्लभ, हें दोन वेळ 'दुर्लभ'शब्दाची पुनरावृत्ति करून सांगतात. एकाहून एक जास्त कठिण अशा अनेक कोटींचे एकत्र निबंधन केलें आहे, म्हणून येथें सार अलंकार झाला आहे. ८. आयुष्य.

१. गंगा. २. भक्तीचें भाग्य व तिचें माहात्म्य मुक्तीपेक्षां जास्त आहे हीं पंडितांनीं या सवाईंत जान्हवी (जन्हुतनया भागीरथी) आणि सागर यांचें ऐक्य होणें आणि पुनः प्रतिक्षणीं भेट होणें या उत्तम दृष्टांतानें वर्णिलें आहे. जान्हवी रत्नाकराशीं एकरूप होऊन पुनः प्रतिक्षणीं तिला समुद्राची भेट होते म्हणजे आलेलें जल समुद्ररूपी झालें, तरी पुनः वरून जल येऊन प्रत्येक क्षणाला गंगानदी सागरास भेटत असते, हें सर्वांस समजण्यासारखें आहे. भक्तालाही परमेश्वराशीं ऐक्य पाहिजे, तें अशाच तऱ्हेचें पाहिजे आहे. परमेश्वराशीं ऐक्य होऊन मुक्ति मिळाली तर पुनः भेटीचा योग नाहीं व त्यामुळें प्रियदर्शन झालें असतां जें सुख होतें, तेंही नाहीं; म्हणून खऱ्या रसिक भक्ताची मागणी त्या दयानिधि परमेश्वराजवळ अशी असते कीं, 'ईश्वरा! आम्हांस तूं आपल्याजवळ ठेऊन आपलें व आमचें एकस्वरूप कर. पण त्याचबरोबर आमची आठवण आम्हांस राहून आम्हांस तुझ्या दर्शनसुखाचा आस्वाद नित्य घेतां येईल अशी व्यवस्था असली पाहिजे. भागीरथीचा व सागराचा संगम असल्याच प्रकारचा असतो.' शिवाय सागराचें पाणी बाष्परूपानें आकाशांत जाऊन त्याचेच मेघ होतात, व मेघांचा वर्षाव झाला म्हणजे तें जल जान्हवीस मिळतें. एतावता जान्हवी उत्पन्न झाली. सागरजळ पुष्ट मेघवर्षावानें, आणि तीच जान्हवी जाऊन मिळते सागराला! त्याचप्रमाणें सर्व जग उत्पन्न झालें तें ईश्वरा! तुझ्यापासून म्हणजे सर्व जगाचा तुझ्यामध्यें अंतर्भाव होतो व सर्व जगांत तूंच दिसतोस. सारांश देवा! तूं सर्वत्र आहेस. आणि तुझ्यांत सर्व आहे. असा एकत्वानें राहणारा जो तूं या तुझी भक्ति आम्हांला दे, त्वत्स्वरूपीं ऐक्य होऊन जान्हवी-रत्नाकरांच्या संगमाप्रमाणें प्रतिक्षणीं तुझें दर्शन आम्हांस दे म्हणजे झालें. सुखाचा नाश करणारी ती तुझी नीरस मुक्ति आम्हांस नको. ३. उदकास.

सर्वहि तूजमधें, सकळांत तुं, ये रितिनें दिसतोसि मला,
भक्ति अशीच असो म्हणे वामन मुक्ति कदापि न मागुं तुला. ॥ ९
[1]सिंह जसे प्रतिपर्वति नाहिंत, कस्तुरिएंण वनोवनिं कैंचे?
हस्तिचे मस्तकि मुक्त असे परि ते गजराजहि प्रस्तुत कैंचे? ।
कल्पतरू अणि कामदुघा बहुसाल परीसहि पट्टणिं कैंचे?
तेंवि ते सद्गुरु सज्जन संत महाअनुभाव घरोघरिं कैंचे? ॥ ६
विश्वतनू हरि होउनियां जंइं कौरव मारुनि दाखविले,
मागुति अर्जुनसारथि होउनि त्यांचि करें ते मारविले ।

१. या सवाईंत सिंह, कस्तुरिकामृग, गंडस्थळांत मोती असणारे हत्ती व कल्पवृक्ष, कामधेनु व परीस हे जसे पुष्कळ सांपडत नाहींत त्याचप्रमाणें महानुभव (तेजस्वी) सज्जन संत हे घरोघरीं मिळणार नाहीत. पृथ्वीच्या पाठीवर कचित् एखादाच असा भाग्यशाली संत सांपडला तर सांपडेल, हे चार **दृष्टांत** देऊन सांगितलें आहे. सिंहाचें एकच जोडपें असतें ही कल्पना पंडितांस संमत नव्हती, तरी सिंह थोडेच असतात ही त्यांची दृढ कल्पना होती व ती अनुभवदृष्टीनें सत्यापासून फारशी लांबही नाहीं. कामधेनु, कल्पवृक्ष व परिस 'हे पट्टणीं (नगरांत) कैंचे? यावरून नगरांत किंवा शहरांत या तपःसाध्य वस्तु नसावयाच्या, सारांश सत्वगुणाचा अंश' शहरांत फारसा नसावयाचा हें पंडितांच्या वेळींही अनुभवास येऊं लागलें होतें म्हणावयाचें! २. मृग. ३. मोती. ४. कामधेनु. ५. विश्वस्वरूपी. (भगवद्गीता–अध्याय ११ पहा.) 'हे आपले आप्तबंद, इष्टमित्र, गुरु' असा कौरवांविषयीं मोह भारतीयुद्धाच्या आरंभींच अर्जुनास उत्पन्न झाला त्या वेळीं श्रीभगवंतानें गीतारहस्य आपल्या भक्तास सांगून त्याचा मोह समूळ निरस्त करावा या हेतूनें विश्वरूप प्रगट करून त्या वेळीं कौरवसैन्य मेलेलें आहे असें अर्जुनास दाखविलें आणि सांगितलें कीं, 'अर्जुना! तूं निमित्तमात्र आहेस, मला काय करावयाचें आहे तें मी अगोदरच केलें आहे.' सारांश कर्ता करविता परमेश्वर आहे, मनुष्य निमित्ताला मात्र कारण आहे हें तत्वरहस्य अर्जुनाच्या निमित्तानें सर्व मनुष्यमात्रास परमेश्वरानें सांगितलें आहे. ह्याचाच अनुवाद करून पंडित म्हणतात, '(जे क्षणीं) तुझें दास्य मज दीधलें (ज्या वेळीं तुझा भक्त मी झालों) त्याच क्षणीं त्वां (परमेश्वरानें) अशेषही (सर्वही) बंध (पाश, पापपुण्यादिकांचें कर्तृत्व, भोक्तृत्व इत्यादि भोग) हरिले (नाहींसे केले.) या उपरांतिक (आतां तुझा शिष्य मी झाल्यावर) वामन साधन (निमित्ताला मात्र कारण आहे, नांवाचा मात्र कर्ता, भोक्ता आहे, वस्तुतः त्याच्याकडे कांहीं नाहीं.) अशी' पंडित म्हणतात, 'माझी वृत्ति झाली आहे म्हणून, परमेश्वरा! तुझे हेतु तरी पुरविले (म्हणजे तुझ्या म्हणण्याप्रमाणें कर्तृत्व भोक्तृत्वांचा अभिमान सोडून देऊन सर्व कर्में तुझ्या चरणीं अर्पण करूं लागलों व येणेंकरून तुझ्या हेतूप्रमाणें मी वागूं लागलों.' ६. देव्हां. ७. अर्जुनाच्या.

दास्य तुझें मज दीधलें ते क्षणिं बंध अशेषहि त्वां हरिले,
वामन साधन या उपरांतिक, हेतु तरी तुझे पूरविले. ॥ ७
देखुनियां परिपूर्ण सुधाकर सर्व सुखी, परि चोर रडे !
वर्तति चांदणियांत समस्तहि, तस्कर झोंपडिमाजि दडे ।
साधुसभे जन उद्धरती परि पापि न जाउं सके तिकडे,
वामन ! संतकृपामृतवृष्टि हि पालथिया घटिं केंवि पडे ! ॥ ८
वीकार असत्य समूळ कळे मग 'त्याग, स्विकार' कसा वरळे ?
शुक्तिकिच्या रजतास मुद्धनिहि धांवति तें सुख काय फळे ? ।
जो सहजें निरुपद्रव आपण द्वैतविवर्जित ज्यास कळे,
तोचि म्हणे गुरु, छात्रहि वामन पूर्ण स्थितीस कदा न चळे. ॥ ९

---

१. चंद्र. २. संतांच्या सभेंत. ३. चंद्रिकेमध्यें (चांदण्यांमध्यें) सर्वांस सुख होतें, पण चोर रडूं लागतो व झोंपडींत लपून राहतो ! कां तर त्यास चोरी करण्यास मिळत नाहीं. त्याचप्रमाणें साधूंच्या मठाकडे पापीजनाचें पाऊल चुकून सुद्धां वळत नाहीं. कारण उघडच आहे कीं, 'आपण संतसभेंत जाऊन आपला उद्धार झाला तर आपल्यास पाप करण्याला संधि मिळणार नाहीं' अशी त्याला भीति असते ! पण पंडित म्हणतातः– 'हे वामन ! तुझ्यावर संतकृपेच्या अमृताची वृष्टि झाली आहे, व असला वर्षाव कधींही पालथ्या घागरीवर पडावयाचा नाही (निष्फळ व्हावयाचा नाहीं, म्हणजे तुझा उद्धार होईल, तूं भिऊं नकोस).' 'पालथ्या घागरीवर पाणी' ही म्हण पंडितांच्या वेळी चांगलीच प्रचलित होती, असें दिसतें. वामनास संतसमागम आवडला, यावरून पंडित पापभीरु असून संतसमागमाची आस्थापूर्वक वाट पहात होते हें स्पष्ट आहे. संतसमागम चंद्रकिरणांसारखा सुखदायक असतो हें रामणीयक तत्व पहिल्या दोन ओळींत अंतर्भूत झालेल्या **प्रतिवस्तूपमे**नें आपोआपच बुद्धिगोचर होतें. ४. सर्व विकार असत्य (आभासरूपी, खोटे) आहेत अशी खातरी झाल्यानंतर 'त्याग, स्वीकार' (दुःखाचा त्याग करा, सुखाचा स्वीकार करा) असे कसें वरळतो (बडबडतो) ? सारांश त्या मनुष्यांला सत्स्वरूपाची पूर्ण ओळख झाली नसून ते शिंपल्यावर भासमात्र होणाऱ्या रुप्याच्या मागें धांवणारे (वृथा श्रम करणारे) होत. त्यास ही धांवाधांव काय सुख फळणार ? (कोणतें सुख प्राप्त करून देणार ?) अर्थात कोणतेंच सुख त्यांस मिळत नाहीं. परंतु ज्याला असें कळलें आहे कीं, 'आपण सहजें (स्वतःसिद्धच, मूळस्वरूपानें) निरुपद्रव (कोणत्याही प्रकारचा विकार उत्पन्न होऊं देण्यापलीकडचे, निर्विकार, निरामय) व द्वैतविवर्जित (द्वैतापासून भिन्न असणारे, द्वैतानें सोडून दिलेले, अद्वैतस्वरूपी, आत्मारामस्वरूपी) आहों–असें ज्यास कळलें, तोच खरा गुरु होय. वामनही छात्र (शिष्या) आहे आणि हे उभयतां पूर्ण स्थितीपासून कधींही चळणारीं (इकडे तिकडे जाणारीं) माणसें नाहींत. सारांश पूर्ण स्थितीस पोहोंचल्यानंतर सुख दुःख हे शब्द व्यर्थ होतात

जाणणियाविण जाणसि काय तुं? जाण तुझेंचि तुला न कळे,
जागृति स्वप्न सुषुप्तित हेंच अशा स्वसुखीं मन कां न वळे? ।
जाणणें रूप तुझेंचि असें, परि देहिं मि आपण बुद्धि चळे,
श्यामसमागमें चित्त मिळे तरि हें निजरूप तयीं निवळे. ॥ १०
पांडवभाग्य सहस्रमुखासहि वाच्य नव्हे, न धरे अनुमाना,
जें अति थोर पितामहवैभव त्याहुनिही अति उत्तम माना. ।
लोक चतुर्दश निर्मुनिही विधि पात्र न ज्या पुरुषोत्तममाना,
तो हरि 'भाय रे! भाय' म्हणोनि हि थापटि पार्थतुरंगममाना. ॥११

---

१. 'तूं जाणणियाविण काय जाणशि?' जाणणें (आत्मस्वरूप ज्ञान) याच्यावांचून तूं काय जाणशी, (तूं काय जाणणार)? बा मनुष्या! आश्चर्य हें आहे कीं तुझें जाण (ज्ञान, तुझ्या खऱ्या स्वरूपाचें ज्ञान) तुला कळत नाहीं! सर्व जगाची उठाठेव करावयाला लागणारा जो तूं त्या तुला तुझ्याच स्वरूपाचें ज्ञान नाहीं! जागृत अवस्थेंत, स्वप्नांत, झोंपेंत हेंच (एकच सत्स्वरूप) आहे, अशा स्वसुखी (परमावधीच्या सुखाकडे तुझ्या मनाची प्रवृत्ति कां होत नाहीं? जाणणें (आत्मज्ञान) हें तुझेंच रूप आहे. परंतु 'मी आपण देही' (देह तोच मी, या देहाला जें सुख दुःख होतें, तें मलाच होतें) अशी तुझी बुद्धि चळते (वांकड्या मार्गानें जाऊं लागते). सारांश, आत्मज्ञानाशिवाय दुसरें जाणावयाचें कांहीं नाहीं आणि तें ज्ञान झालें असतां निर्विकार अशा परमावधीच्या सुखाची प्राप्ति होईल व तीनही अवस्थांमध्यें सत्स्वरूप एकच आहे अशी खातरी होईल. पण जेव्हां मी देहाव्यतिरिक्त आहे, सुखदुःख हे देहाचे विकार आहेत असें कळून त्याप्रमाणें आचरण होऊं लागेल तेव्हां वरची स्थिति प्राप्त होईल. पण देहाव्यतिरिक्त आत्मा आहे, हें तरी केव्हां कळणार? श्यामसमागमें चित्त मिळे तेव्हां! श्याम(विष्णु)समागम गुरुकृपेनें होईल व चित्ताची (मनाची) एकता होऊन निजरूप (स्वस्वरूप) निवळे (शुद्ध होईल, अहंभावरूपी मळ नाहींसा होऊन स्फटिकाप्रमाणें निर्मळ मन होईल). सारांश, गुरुकृपेनें ईश्वरस्वरूपीं एकाग्र मन झाल्याविना वरच्या महद्गोष्टींचा लाभ होणार नाहीं. २. पंडित म्हणतातः—'पांडवांच्या भाग्याचें वर्णन सहस्र जिव्हा असणाऱ्या शेषासही करितां येणार नाहीं, इतकेंच नव्हे, तर त्या भाग्याची त्याला कल्पना सुद्धां करवणार नाहीं. ब्रह्मदेव, चतुर्दश लोकांचा जनिता, (हे चवदा लोक मागें सांगितलेच आहेत). प्रत्यक्ष ईश्वराचा मुलगा त्याच्या भाग्यापेक्षांही पांडवांचें भाग्य थोर आहे. कां तर ज्या मानाला ब्रह्मदेवही अयोग्य झाला, तो मान पांडवांस मिळाला. अर्जुनाच्या रथावर बसवून घोड्यांस 'भाई रे! भाई' म्हणून त्यांच्या माना थोपटून अर्जुनाच्या घोड्यांची चाकरी परमेश्वरानें करावी हें केवढें भाग्य? ३. शेषास. ४. अनुमानाला धरवत नाहीं, तर्कातीत आहे. ५. ब्रह्मदेवाचें ऐश्वर्य. ६. पृथेचा मुलगा अर्जुन.

## १७. पदसंग्रह.

### पद १ लें.

रामा! रामा! सुखधामा रामा! । जानकीजीवन भक्तपरमा! ॥ ध्रुवपद. ॥
विश्वपटीं रामतंतू, जेणें जिती सर्व जंतू ।
प्रकट हा राम परंतु, न दिसे कामी कीं तूं ।
जो रचि सेतु, जो सुखहेतु, तो रामचि तूं, तेथ न मी तूं. ॥ रामा० ॥ १ ॥
नाना अलंकार हेमीं, तैसे चराचर, हें मी ।
देखतसें जरी रामीं, मुनिमानसविश्रामीं ।
माझ्या स्वामी, मेघश्यामीं, आवडी रामीं, षड्गुणग्रामीं. ॥ रामा० ॥ २ ॥
मारुनि रणि दशकंठा, निववि सीतेची उत्कंठा ।
निववी नामें नीलकंठा, नगरी नेली वैकुंठा ।
कीर्तिच्या घांटा, दिधल्या वाटा, नामें भवसागरीं, केल्या पायवाटा. ॥रामा०॥ ३ ॥
कां हो! वनाप्रति जाऊं? आम्हीं घरींच कां राम न पाहूं? ।
न दिसे तया राम दावूं, आम्हीं घरींच राम कां न होऊं? ।
रामचि देऊं, रामचि घेऊं, न लागे तयाचें मन रामींच लावूं. ॥ रामा० ॥ ४ ॥
पावन यश विस्तारी, राम पौलस्तिसुत संहारी ।
अवतारीं पाषाण तारी, नारी नर तो कैंवि न तारी? ।
गौतमनारी, पाषाण तारी, तीसही उद्धरी, कोदंडधारी. ॥ रामा० ॥ ५ ॥
कळयुगीं हेचि सर्व जोडी, रामनामें भवबंध तोडी ।
कोळकूट विष खोडी, तोही नामें दाह मोडी ।
ज्याचे भक्तीमनीं वामनीं आवडी ॥ रामा० ॥ ६ ॥

### पद २ रें.

रघुनाथजी! मज तूं गती । सत्वर ये सीतापती! ॥ ध्रुवपद. ॥
त्रिभुवनजीवन जो मज जीवन तो तूं जासि अजी वना ।
तळमळीं निर्जळीं मांसोळी तसि होय असें माझ्या मना ॥ रघु० ॥ १ ॥

---

१. सजीव होतात. २. मी तूं असा द्वैतभाव नाहीं. ३. मुनींच्या मनाचें विश्रांतिस्थान. ४. षड्गुणसंपन्न. ५. शंकरास. ६. अयोध्या. ७. रावण. ८. धनुष्यधारी रामचंद्र. ९. विष, जें शंकरानें प्राशन केलें होतें तें. १०. लहान मासा.

निमिष निमिष मज युंगशत होइल एवं वरुषें चतुर्दश ।
क्रमसि कसीं? असि मति अतिविव्हळ, वाटति शून्य दिशा दश ॥ रघु०॥ २ ॥
कठिण करुनि मन कंठिं धरुनि प्राण कंठिन मी हा काळ जी! ।
इतकि अवधि जधिं होइल मी तधि टाकिन तनु तत्काळ जी! ॥ रघु० ॥ ३ ॥
भरत म्हणे, 'भरतांचि चतुर्दश क्षणभरि न धरिन प्राण जी!' ।
ज्वलित हुताशनीं अपोशन हें हें करणें तुझि आण जी!' ॥ रघु० ॥ ४ ॥
'अभयकरांकितमस्तका करी म्हणे वामन प्रभु वत्सा! अगा! ।
भरतां चतुर्दश, तेंचि दिशीं तुज दर्शन देइन बा! उगा.' ॥ रघु० ॥ ५ ॥

## पद ३ रें.

देवा! इतकें मजला द्यावें । मागतसें एक्या भावें ॥ ध्रुवपद. ॥
दास्य तुझ्या चरणाचें । प्रेम तुझ्या आचरणाचें ॥ देवा० ॥ १ ॥
मज न दावीं ती मुक्ती । जेथ न घडे तुझी भक्ती ॥ देवा० ॥ २ ॥
तुझें नाम मुखीं सदा । त्याचा संग दे गोविंदा! ॥ देवा० ॥ ३ ॥
तुझे पायीं जे विमुख । दृष्टी न पडो त्यांचें मुख ॥ देवा० ॥ ४ ॥
तुझी सर्वात्मना प्रीती । त्याच पायीं माझी गती ॥ देवा० ॥ ५ ॥
सर्वभूतीं तूतें पाहे । आणि स्थिरतामुखें राहे ॥ देवा० ॥ ६ ॥
जो जाणे सर्वमन । त्यासी स्मरों म्हणे वामन ॥ देवा० ॥ ७ ॥

## पद ४ थें.

राम म्हणा तुम्ही वाचे रे! । तुटतिल बंध भवाचे रे! ॥ ध्रुवपद. ॥
राममुखीं हातीं टाळी रे! । संकट यम त्याचें टाळी रे! ॥ राम० ॥ १ ॥
नगीं हेम घटीं माती रे! । जगीं राम संत पाहाती रे! ॥ राम० ॥ २ ॥
मुखीं म्हणा पूर्णकाम रे! । वामन झाला आत्माराम रे! ॥ राम० ॥ ३ ॥

## पद ५ वें.

कथा शोधी अंतरंगा रे! । पावना रामा! ।
तुझी कथा आणि गंगा । जगीं दोनी पापभंगा ॥ ध्रुवपद. ॥

---

१. एक निमिष शंभर युगांप्रमाणें वाटेल. २. पेटलेला अग्नि त्यांत. ३. अभय देणाऱ्या हातानें चिन्हित शीर्षांला म्हणजे भद्राच्या मस्तकावर हात ठेवून अभय दिलेल्या मस्तकाला. ४. पूर्णत्वानें. ५. अचल सुखानें. ६. साधु लोक अलंकारांत सोनें पाहतात, परांत मृत्तिका पाहतात, तसेंच जगांत राम पाहतात म्हणजे मूलस्वरूप पाहतात. ७. शुद्ध करितें.

जगीं गंगामहिमान कथेनें वाढविला मान। हे कैसी त्यासमान रे! ॥कथा०॥१॥
जैसी सुधा तैसें क्षीर तृप्ती देतां न ऊशीर। न करी अजरामर रे! ॥कथा० ॥२॥
गंगा पापें नासी परी न ते सत्त्वशुद्धी करी। कथा रजतमहरी रे! ॥कथा०॥३॥
तुझी कथा रुचे ज्यासी उपेक्षिती विषयांसी। हेचि संशुद्धि सत्त्वासी रे! ॥कथा०
कथेवीण आत्मज्ञान न शोभे, न वाणे ध्यान। शुकादिकां कथा गान रे! ॥कथा०॥
गंगा पापबेडी तोडी कथा पाप इच्छा मोडी। वामनासी हेचि जोडी रे! ॥कथा०॥

## पद ६ वें.

जग सर्वही हरिनाम रे!। जाणत आत्माराम रे! ॥ ध्रुवपद. ॥
अगखगमृगनग तें चर हें जग किमपि न चित्कनकाविण।
मुकुटकटक कटिसूत्रचि नामचि हाटक सर्वही निर्गुण ॥ जग० ॥ १ ॥
सकळ अविद्या, हरिगुण विद्या, विद्याभवभयदातशा।
शरण शरण गुणनामावांचुनि नामचि म्हणति जगास या ॥जग० ॥ २ ॥
नामचि बेडी नामचि तोडी बेडी शस्त्र लोहाची रे!।
म्हणउनि वामन म्हणे नामचि जगीं निर्मोह रे! ॥ जग० ॥ ३ ॥

## पद ७ वें.

निर्गुणीं न माय रे!। ब्रह्मांडीं न माय रे!।
दशरथ बाप त्यांचा कौसल्या ती माय रे! ॥ ध्रुवपद. ॥
विश्व सर्व तारणें। हेंचि[११] मुख्य कारणें।
याचिलागीं सूर्यवंशीं रूपीं अवतारणें ॥ निर्गुणीं० ॥ १ ॥
इच्छामात्रें काय रे!। केलें नव जाय रे?।
स्वल्प कार्यालागीं धरिसी काय[१२] कीं अकाय[१३] रे! ॥ निर्गुणीं० ॥ २ ॥
जग नग, सुवर्ण रे!। स्वयंबोध पूर्ण रे!।
वसिष्ठाचे उपदेशा ओढवी तो कर्ण रे! ॥ निर्गुणीं० ॥ ३ ॥

---

१. कथेसारखी. २. अमृत. अमृत आणि दुध लवकर तृप्त करितात. पण दुध अजरामरत्व देत नाही. ३. रज आणि तम यांचा नाश करणारी आहे. ४. गंगा आणि हरिकथा यांच्यामधील भेद लक्ष्यांत ठेवावा. पापनाश होण्यांत अर्थ नाहीं. पापबुद्धि नष्ट झाली पाहिजे. ५. वृक्ष, पक्षी, प्राणी, पर्वत हे चैतन्यरूपी सुवर्णाचे अलंकार आहेत. सोन्यावांचून अलंकार होत नाहीत. तसेंच चैतन्यावांचून प्राणीसृष्टिही अस्तित्वांत येत नाहीं. ६. सोनें. ७. आश्रयाचें स्थान. ८. पदार्थांचें नांव. ९. हरिनाम. १०. मावत नाहीं. ११. हाचि. १२. शरीर. १३. शरीररहित.

बळियांचें बळ रे! । स्वयेंचि प्रबळ रे! ।
तया समागमें चाले वानरांचें दळ रे! ॥ निर्गुणीं० ॥ ४ ॥
सीतेसीं वियोग रे! । मागुतीं संयोग रे! ।
नित्य सर्वव्यापकासी कैंचा त्याग भोग रे! ॥ निर्गुणीं० ॥ ५ ॥
कथा अन्नसत्र रे! । केलें हें विचित्र रे! ।
जो नेणेल्वीं भुके मरे तोचि अपवित्र! रे ॥ निर्गुणीं० ॥ ६ ॥
जीवाचें जीवन रे! । पतितपावन रे! ।
राम, ऐसें सांगतां तोचि तरला वामन रे! ॥ निर्गुणीं० ॥ ७ ॥

## पद ८ वें.

ध्यातां सुत कामिनी । जातां दिनयामिनी ।
घडि एकि तरी मनीं । आठवा राम. ॥ ध्रुवपद. ॥
धंदा न सुटे जरी । सुखें असा व्यापारीं ।
वाचे आणि अंतरीं । आठवा राम. ॥ ध्यातां० ॥ १ ॥
करितां संसारकाम । वाचे असों द्यावा राम ।
शिवाचें विश्रामधाम । आठवा राम. ॥ ध्यातां० ॥ २ ॥
दिवस गेला व्यापारीं । निद्रेखालीं रात्री सारी ।
गेले दिवस दोनी चारी । आठवा राम. ॥ ध्यातां० ॥ ३ ॥
काळ जातो घडीघडी । मोडितो देहाची घडी ।
गोष्टी हे तों ऊवडी । आठवा राम. ॥ ध्यातां० ॥ ४ ॥
कायावाचामनेंकरून । प्रार्थीतसे वामन ।
अतिभावें हें वचन । आठवा राम. ॥ ध्यातां० ॥ ५ ॥

## पद ९ वें.

हरिभक्तिलागीं, सकळहि त्यागी । धन्य तोचि जगीं वितैरागी रे! ॥ ध्रुवपद. ॥
हरिनाममाला, प्रिय नोहे ज्याला । प्रल्हाद त्यजी स्वपित्याला रे! ॥ हरि० ॥ १ ॥
गुरु, राज्य, माये, त्यजी वना जाय । भरत सेवी रामपाय रे! ॥ हरि० ॥ २ ॥

---

१. परमेश्वराला कोणतीही गोष्ट अगाध नाहीं. परंतु मनुष्यांचा उद्धार करण्यासाठीं तो अवतार घेऊन लीला करितो; कशासाठीं तर ईशचरित्राच्या कथा ऐकून मनुष्यानें पवित्र व्हावें. २. अज्ञानानें. ३. वाणीनें, बोलण्यात. ४. शंकराचें. ५. विश्रांतीचें स्थान. ६. देह विगलित होतो. ७. विरक्त. ८. गुरु वसिष्ठ, राज्य व तिची आर्यास.

त्यजुनी स्वकांतां[1], द्विजवरकांता[2] । अन्नें अर्पिती भगवंता रे! ॥ हरि० ॥ ३ ॥
प्रिय, सुत, भावा, त्यजुनी स्वभावा[3] । गोपी भुलल्या कृष्णदेवा रे! ॥ हरि०॥४॥
हरिविण अन्य । त्यजिती ते धन्य । वामन शरण अनन्य रे! ॥ हरि० ॥ ५ ॥

पद १० वें.

जग हें जगदीश कैंचा भास रे! ? ।
कैंचा भास रे! ? । चराचर हरीचा विलास रे! ॥ ध्रुवपद. ॥
ब्रह्म बीज, अंकुर माया रे! । प्रपंच पिंपळ[4], भेद वार्या रे! ॥ जग० ॥ १ ॥
भेद नसे तरंगां[5] सागरा रे! । मृदु जळ कठिणतर[6] गारा[7] रे! ॥ जग० ॥ २ ॥
रज्जूवांचुनि सर्प न दिसे रे! । कारणावांचुनि कार्य न असे रे! ॥ जग०॥३॥
अगुणावांचुनि कैंचें सगुण रे! । वामनीं नसे भास अन्य रे! ॥ जग० ॥४॥

पद ११ वें.

गोविंद ध्या बाइ! गोपाळ ध्या, ।
दामोदर ध्या बाइ! माधव ध्या. ॥ ध्रुवपद. ॥
मस्तकीं पाटींत दधिदुग्ध नवनीत मथुरेमध्यें व्रजनारी ।
हरिवेधें[8] गौळणि गोरस विसरुनि ध्या ध्या म्हणती मुरारी ॥ गोविंद०॥१॥
आश्चर्य मानूनि मथुरेच्या ब्राह्मणी[9] पुसति त्यांला सद्भावें ।
विप्रवधूंप्रति गोपिका सांगति सौंदर्यें आणि त्याचीं नांवें ॥ गोविंद० ॥२॥
त्या प्रीतिनें अन्नें अर्पिती ब्राह्मणी, जेंवी सरसिजपाणी[10] ।
वामन भजे त्यासी सर्व समर्पुनि ऐकुनि त्यांचीच[11] वाणी ॥ गोविंद० ॥३॥

पद १२ वें.

आम्हीं जाणों हरिचे पाय ॥ ध्रुवपद. ॥
यम[12] न जाणों नियम न जाणों । न जाणों अन्य उपाय ॥ आम्हीं० ॥ १ ॥
प्रयत्नावांचुनि सर्वहि झालें । लाभ तयाहुनि काय? ॥ आम्हीं० ॥ २ ॥
कृष्णाचे पद टाकुनि कोण्ही । मुक्ति मागे हूस हाय! ॥ आम्हीं० ॥ ३ ॥
परिस देउनी सोनें घेणें । जळो त्याचा व्यवसाय ॥ आम्हीं० ॥ ४ ॥
ध्यातां तें पद वामन झाला । त्रिविक्रम तो विश्वकाय[13] ॥ आम्हीं० ॥ ५ ॥

---

१. स्वपतींस. २. ऋषिपत्न्या. ३. स्त्रीधर्म. ४. यास गीतेंत अश्वत्थ म्हटलें आहे. ५. लाटांस आणि समुद्रास. ६. फारच कठीण. ७. पाण्याच्या गारा, हिमकण. ८. हरिछंदानें. ९. ऋषीपत्न्या. १०. कमलहस्त श्रीकृष्ण. ११. गोपवधूंचीं. १२. यमनियमादि योगाचीं अंगें. १३. विश्वरूपी.

### पद १३ वें.

पार्था ! सांगों काय रे ! । सुगम उपाय रे ! ।
भजनीं भरलें आत्मसुख अनपाय[1] रे ! ॥ ध्रुवपद. ॥
देव मनोमय रे ! । मनहि चिन्मय रे ! ।
देव भक्त एक तेथें कैंचा ध्याता[2] ध्येय[3] ? रे ! ॥ पार्था० ॥ १ ॥
भक्त जें जें भावी[4] रे ! । देव तें तें दावी रे ! ।
देव भक्त द्वैतवार्ता कवणें वदावी ? रे ! ॥ पार्था० ॥ २ ॥
पत्र पुष्प फळ रे ! । किंवा कंद मूळ रे ! ।
आवडि अर्पिती भक्ती केवळही जळ रे ! ॥ पार्था० ॥ ३ ॥
'भक्त मज दावी रे ! । अमृतत्वें[5] भावी रे ! ।
अमृताची गोडी मज कैसी पां न व्हावी रे ! ? ॥ पार्था० ॥ ४ ॥
मुक्ताच्या आवडी रे ! । मनाच्या परवडी[6] रे ! ।
लक्ष्मीच्या वैभवाहुनी तेथें मज गोडी रे ! ॥ पार्था० ॥ ५ ॥
निष्काम भजती रे ! । निजात्मप्रतीती[7] रे ! ।
धांवे पूर्ण काम तो मी तयाचे संगतीं रे !' ॥ पार्था० ॥ ६ ॥
सद्गुरु वामन रे ! । होऊनी आपण रे ! ।
भक्ती निजसुख दावी आदिनारायण रे ! ॥ पार्था० ॥ ७ ॥

### पद १४ वें.

जग सर्वही जगदीश्वर[8] । नित्य, कनकनग[9] नश्वर. ॥ ध्रुवपद. ॥
प्रथम[10] कनकनग कनकचि केवळ, अंतीं कनकचि तें उरे ।
मध्यें झगमगी[11] बाह्यांतरीं तें ज्या कनकीं नग आस्फुरे. ॥ जग० ॥ १ ॥
निष्कळ[12] तंतु कळोनिहि पुष्कळ बष्कळ[13] पट न दिसे जरी ।
तंतुच पट, मातिच घट, घन ब्रह्म पाहति अशापरी. ॥ जग० ॥ २ ॥
निवडि जडाजड तें नव्हे अवघड सुघडहि उघड चराचरीं ।
तंतुपटभ्रम बुद्धिजडभ्रम शब्दब्रह्मचि तें तरी. ॥ जग० ॥ ३ ॥

---

१. ज्याला अपाय नाहीं असें. २. ध्यान करणारा. ३. ज्याचें ध्यान करावयाचें तो. ४. जी जी कल्पना करी. ५. अमृतरूपच. ६. निरनिराळे प्रकार. ७. स्वस्वरूपाची ज्यांस ओळख झाली ते. ८. परमेश्वर नित्य आहे. ९. अलंकाराप्रमाणें जग नाशवंत. १०. अलंकार करण्यापूर्वी. ११. चमकतें. १२. निर्गुण. १३. मिथ्या.

जगमृगजळ मृगअज्ञहि देखति देखुनी मुनिजन मोहती ।
हरिण न जाणति किरण तसे अज्ञ शुद्ध चिदार्कचि पाहती. ॥ जग० ॥४॥
भजन अनन्य घडे हरिचें जरि न भरे जडीं निपुणीं मन ।
होउनि निर्गुण, षड्गुण सगुणहि झालों आपण वामन. ॥ जग० ॥ ५ ॥

## पद १५ वें.

सर्व समर्पण मातें रे! । करितां भवभय जातें रे! ॥ ध्रुवपद. ॥
करिसिल जें जें कांहीं रे! । समर्पीं माझे पायीं रे! ॥ सर्व० ॥ १ ॥
खासी, जेविसि जें जें कांहीं रे! । समर्पीं मज तेंही रे! ॥ सर्व० ॥ २ ॥
यजिसी, होमिसी जें जें हव्य रे! । समर्पीं तेंही दिव्य रे! ॥ सर्व० ॥ ३ ॥
आप्तपरांसी जें जें देसी रे! । समर्पीं पायांपाशीं रे! ॥ सर्व० ॥ ४ ॥
तपही करिसी जेथ जें पार्थी रे! । समर्पीं त्याही अर्थी रे! ॥ सर्व० ॥ ५ ॥
[4]पापपुण्य लोहहेम बेडी रे! । दोहींची मदर्पणें तोडी रे! ॥ सर्व० ॥ ६ ॥
संन्यासधर्म तो हाचि रे! । अनन्य संन्यास हाचि रे! ॥ सर्व० ॥ ७ ॥
वामनासी जोडले पाय रे! । करितां सुगम उपाय रे! ॥ सर्व० ॥ ८ ॥

## पद १६ वें.

तो हरि कालियाच्या फणांवरि नाचत यमुनेभीतरी ॥ ध्रुवपद. ॥
प्रबळ [5]विषानळ सळसळतें जळ [6]कालिंदी कालियें दूषिली ।
[7]खलकुलदंडन [8]व्रजजनमंडन तरुवरुनी उडि टाकिली. ॥ तो हरि० ॥ १ ॥
खळबळतां [9]र्‍हद त्यांतुनि [10]दुर्हृद ओढुनि काढुनि माधव, ।
गिरिशिखरापरि पांडवप्रिय करि मस्तक तदुपरि तांडव ॥ तो हरि० ॥ २ ॥
व्रजजन विव्हळ अंतरिं तळमळ आबाल गोपाळ पाहती ।
[11]फणिफणि चंचळ वरि हरि पदतळ नाचतां विस्मित राहती ॥ तो हरि० ॥ ३ ॥
जळधरसुंदर पीतांबरधर कौस्तुभ[12]मणिवर [13]कंधरीं ।
भुजगफणाशत त्यावरि नाचत टाळि पीटित सुरसुंदरी ॥ तो हरि० ॥ ४ ॥

---

१. मृग मृगजळास सत्य मानितो त्याप्रमाणें अज्ञ लोक जगास सत्य मानितात. २. जगास मृगजळाप्रमाणें भासविण्यास कारण असा शुद्ध चैतन्यरूप सूर्य. ३. भगवद्गीता–अध्याय ९ श्लोक २७ पहा. ४. पाप म्ह० लोखंडाची बेडी आणि पुण्य म्ह० सोन्याची बेडी, मिळून दोन्ही बेड्यान. ५. विषरूप अग्नीनें. ६. यमुना. ७. दुष्टांस दंड करणारा. ८. गोपजनांचें भूषण. ९. डोह. १०. दुष्ट. ११. नागफड. १२. मणिश्रेष्ठ. १३. कंठीं.

चरण फणावरी पुच्छ तें करिं धरी चपळ दुजा कर नाचता ।
सकळकळागुरु सेवक [1]सुरतरु अमृतचरित ज्याचें सेवितो.[2] ॥ तो हरि० ॥५॥
उदरिं [3]चराचर त्यामरें विषधर मृतसम देखुनि काळया ।
शरण कृशोदरी नागिणि सुंदरी आल्या [5]कृपावरुणाळया. ॥ तो हरि० ॥६॥
स्तन पिति लेंकुरें तें युवती करें दाविति अरविंदाक्षा ।
पसरुनि चंचळ करतळ[6]कुंतल 'दे' म्हणती 'पतिभिक्षा.' ॥ तो हरि० ॥ ७ ॥
म्हणति, 'महाखळ वि[4]षमुख केवळ या दंडासि हा योग्य ।
परि व्रजवल्लभ! पदरज दुर्लभ लाधला हें थोर भाग्य!' ॥ तो हरि० ॥८॥
परिसुनियां स्तुति बोले रमापति हरुनि [8]अहीविषदर्पा, ।
'व्रजजन गो[9]धन हे पिति [10]जीवन ये स्थळिं कां तूं? रे सर्पा! ॥ तो हरि० ॥९॥
खळजनमर्दन तो मि जनार्दन श्रीवृंदावनवासी ।
एथें तूं नको राहूं, सांडोनि हा डोहो जा [11]रमणकद्वीपासी.' ॥ तो हरि० ॥ १० ॥
दवडुनियां [12]फणि देवमुकुटमणि करि अमृतोपम पाणी. ।
कलयुगिं वामन म्हणे माझें मन [13]शोधि असें चक्रपाणी! ॥ तो हरि० ॥ ११ ॥

## पद १७ वें.

हरि आमुचा तो मनोरथी । अर्जुनरथीं जो सारथी. ॥ ध्रुवपद. ॥
[14]जलधिसुतेसीं जलक्रीडारसीं निववितो [15]करजळजा तसे ।
करजळ जिहिं तिहीं अश्व धुतां मुखिं लाळहरण जळ जातसे! ॥ हरि० ॥ १ ॥
न खसमुदाय, मुख प्रभुचें सुख [16]नखशिखभर लक्ष्मीस दे ।
[17]उरगशयन [18]तुरगांगहि खाजवि! त्या [19]कररुहिं मुनि हें वदे. ॥ हरि० ॥२॥
[20]दशन [21]रमादशनांबरिं जे रति धरिति पितां अतिमाधुरी ।
समरिं चहुंकारिं चारि धुतां [22]हयदोर तया दांतें धरी! ॥ हरि० ॥ ३ ॥

---

१. कल्पवृक्ष. २. ज्याचें अमृतचरित सेविता सकल कलागुरु कल्पतरु सेवक (झाला)—हा अन्वय. ३. चराचर जग उदरांत म्हणून जड. ४. सर्प. ५. कृपासागर. ६. कुड्मल? ७. सर्प. ८. सर्पाच्या विषदर्पाला. ९. गाई. १०. पाणी. ११. जंबुद्वीपांतील एक उपद्वीप. १२. नाग. १३. शुद्ध कर. १४. लक्ष्मीसह. १५. करकमलाला. १६. नखशिखांत; सर्व शरीरभर. १७. शेषशायी. १८. घोड्यांचें अंग. १९. नखांनी. २०. दांत. २१. ओष्ठ. २२. ओढण्या.

म्हणति समस्त कीं [1]बहुतपि मस्तकीं याचे पदरज योजिती ।
अश्वखुरींत खुरीं उठती रज अलक मुखि त्या विराजती ! ॥ हरि० ॥ ४ ॥
धरि शिरिं [2]शासन [3]जैलजासन ज्याचें, तो [4]हैयशास्सन चाबुका ।
करि चतुंकरिं हरि अश्व धुतां रणिं माधां तुरा यदुनायका ! ॥ हरि० ॥५॥
करकमलें [5]कमलेस धरी करिं [6]ये(यो ?)जुनि रथ त्या पाणिनें ।
बसवियला रथिं हस्त धरुनि [7]हातिं सारथिपणि चक्रपाणिनें. ॥ हरि० ॥ ६ ॥
विधिसदनीं विधिनाभिसरोरुहिं [8]निगम वदे वदनीं तया ।
हरुनि असुख चुचकारुनि त्या मुखें युद्धिं म्हणे 'हो, हो' हया! ॥हरि०॥७॥
हरि[9]पैरता परतापनिवारणिं ते सुलभा असि देखिली ।
कथि मुनि भारतिं [10]भारति वामनें प्रेमरसें मनि रेखिली. ॥ हरि० ॥ ८ ॥

## पद १८ वें.

तारीं मला जगदंब । दुर्गे ! ॥ ध्रुवपद. ॥
त्वच्चरणांविण देवि ! नसे मज । अन्य जगीं अवलंब. ॥ दुर्गे० ॥ १ ॥
तनुमदमहिष मला छळि निशिदिनिं । सोडविं न करिं विलंब. ॥ दुर्गे०॥२॥
अंब ! तुझ्या चरणांबुजिं रुंजो । वामनमनरोलंब. ॥ दुर्गे० ॥ ३ ॥

## पद १९ वें.

'पदरेणुनें आजि धन्य मी' । [11]म्हणुनि अहिल्या ते नमी ॥ ध्रुवपद. ॥
[12]जलरुहभव [13]भव [14]पदजलजोद्भव धुळी धुंडिसि राघवा ! ।
रघुवर ! अभिनव तव करुणा कीं दिधलें त्या मज [15]वैभवा. ॥ पदरेणुनें० ॥ १ ॥
निजपदरज मज तारक वास्तव [16]अज भरताग्रज जन्मला ।
अकरचरण शरणागतवत्सल करुणाचरण मज लाविला. ॥ पदरेणुनें० ॥ २ ॥

---

१. महातपोधन. २. आज्ञा. ३. ब्रह्मा. ४. घोड्यास शिक्षा करितात ज्यानें तो. ५. लक्ष्मी. ६. जोडून. ७. हातानें. ८. वेद. ९. तत्परता. १०. वाणी. ११. असें म्हणून. १२. जलरुह+भव=कमलोद्भव. (ब्रह्मदेव.) १३. भव=शंकर. १४. पदजलज=पदकमल तेथें जन्म जीचा अशी गंगा. हे सर्व तुझ्या चरणधुळींत लोळणारे. १५. भाग्य. मजाही ब्रह्मदेव, शंकर, गंगा यांची पदवी मिळाली. १६. जन्मरहित.

पदजल तें तव जगअघभंगा नामें गंगा[1] गौतमी ।
जडशिळ मी, मज तूं करुणाशिळे! करिसि पदें त्या गौतमी. ॥ पदरेणुनें० ॥३॥
विधिसदनीं विधि[2]वधुसुतसंयुत गाते तव यश शारदा[3] ।
नयनयुगुलिं जल कज्जलमिश्रित वर्षे कुचाग्री विशारदा. ॥ पदरेणुनें० ॥ ४ ॥
चरणकमळ कुचकलशयुगावरि धरि कमला कमलेक्षणा!' ।
स्तवुनि, नमुनि मुनिकामिनि ते पद, जाय गृहा शुभलक्षणा. ॥ पदरेणुनें० ॥ ५ ॥
त्रिभुवन आक्रमी ज्या पदें विक्रमी[4] श्रीशक्रानुज[5] वामन ।
ऋषिवनिता वनिं तारिलि त्या पदें श्रीरामें म्हणे वामन. ॥ पदरेणुनें० ॥ ६ ॥

## पद २० वें.

जिंकिलें रे! कृष्णें जिंकिलें रे! । पावन यश जगीं अंकिलें[6] रे! ॥ ध्रुवपद. ॥
चांगला रे! कृष्ण चांगला रे! । मातंगमदें[7] रक्तें रंगला रे! ॥ जिंकिलें० ॥१॥
ताडिला रे! हस्ती ताडिला रे! । उपडोनी दोनी दंत पाडिला रे! ॥ जिंकि० ॥२॥
लोटिला रे! रंगीं[8] लोटिला रे! । मल्लांसीं[9] वज्रतुल्य वाटला रे! ॥ जिंकि० ॥३॥
देखिला रे! रंगीं देखिला रे! । नवरसें हरि मनीं रेखिला रे! ॥ जिंकि० ॥४॥
मारिले रे! मल्ल मारिले रे! । कंसरायें धिंगदोषें[10] वारिलें रे! ॥ जिंकिलें० ॥५॥
तापला रे! कृष्ण तापला रे! । मारितां सखा मामा आपला रे! ॥ जिंकि० ॥६॥
तोडिले रे! बंध तोडिले रे! । मायबाप[11] उग्रसेना सोडिलें रे! ॥ जिंकि० ॥७॥
दिधलें रे! राज्य दिधलें रे! । उग्रसेनमन कृष्णें वेधिलें रे! ॥ जिंकि० ॥८॥
पावला रे! जय पावला रे! । श्रीकृष्ण वामनें तो गाइला रे! ॥ जिंकि० ॥९॥

## पद २१ वें.

अर्जुना तूं जाण रे! । होसील सुजाण रे! ।
विश्व नाहीं, मीचि आहें, सख्या! तुझी आण रे! ॥ ध्रुवपद. ॥
मातीमाजीं घट रे! । तंतूमाजी पट रे! ।
माती तंतु विचारितां[12] कैंचा घट पट रे! ? ॥ अर्जुना० ॥ १ ॥

---

१. नदी. २. विधि ब्रह्मदेव, वधु सावित्री, सुत नारद यांच्यासह. ३. सरस्वती. ४. पराक्रमी. ५. इंद्राचा धाकटा भाऊ वामन. हे दोघेही अदितीचे पुत्र. ६. खुण करून ठेविलें. ७. कुवलयापीड हत्तीच्या मदानें व रक्तानें. ८. आखाड्यांत. ९. चाणूर, मुष्टिक इत्यादि पैलवानांस. १०. झिडक्या देऊन, ११. वसुदेवदेवकी. १२. शोधून पहात असतां.

रज्जू सर्पाकार रे! । सर्प ना तो दोर रे! ।
सर्प तोही दोरामाजी वांजोचें तें पोर रे! ॥ अर्जुना० ॥ २ ॥
हेमीं अलंकार रे! । पाण्याची ते गार रे! ।
हेम पाणी पाहूं जातां कैंचा तो आकार रे! ॥ अर्जुना० ॥ ३ ॥
तैसें जग हें पाहीं रे! । जों रामीं दृष्टि नाहीं. रे! ।
रामीं राम झाल्या मग जग कैंचें काय? रे! ॥ अर्जुना० ॥ ४ ॥
अंडें कोटि खर्वे रे! । मजमाजी सर्व रे! ।
नें मी त्यांत न तीं मजमध्यें हें अपूर्व रे! ॥ अर्जुना० ॥ ५ ॥
राजविद्या गूज रे! । सांगतसें तूज रे! ।
कलिमाजि वामनासी हेंचि देणें मज रे! ॥ अर्जुना० ॥ ६ ॥

## पद २२ वें.

अरे! वासुदेव कां नोळखा? । जो अंतरिंचा निजसखा ।
त्यासी पारखा मानूं नका । गोड गोष्टी तरी आइका. ॥ ध्रुवपद. ॥
ओळखावें आंथरुण । मळूं नये पांघरूण ।
निजल्याची धरावी खूण । तेंचि जाणा जागरण. ॥ अरे० ॥ १ ॥
जागरणीं डोळां नीज पडे । निजीं निजतां जागृति जोडे ।
निजंजागरण तेथुनि उडे । वासुदेव पाहतां चहूंकडे. ॥ अरे० ॥ २ ॥
तुम्हीं अवघे निजीं निजा । निजीं निजतत्त्व तें समजा ।
आंत बाहेरी न दिसे दुजा । तया अधोक्षजाला भजा ॥ अरे० ॥ ३ ॥
वासुदेव सद्गुरु वामन । तेणें झालें मन उन्मन ।
तोचि झाला जनीं जीवन । नाहिं उरलें मीतूंपण. ॥ अरे० ॥ ४ ॥

## पद २३ वें.

गोविंदा! गोपाळा! मज तारीं । भवनदी भयंकर भासे भारी ॥ ध्रुवपद. ॥
आशा हे मगरी, पदयुग ओढी । कसा जाऊं हरि! त्या तीरीं? ॥ गो०॥१॥
अहंकारमीन खोल जीवनीं रिघे । कैसें करुं त्या तीरीं! ॥ गोविंदा० ॥ २ ॥
गुरुपदिं नाविका दृढ धरि वामन । ने एकदां त्या तीरीं ॥ गोविंदा० ॥ ३ ॥

---

१. वंध्यापुत्राप्रमाणें असंभवनीय. २. हिमकण. ३. ब्रह्मांड. ४. सहस्र कोटी=खर्व. ५. भगवद्गीता–अध्याय ९ श्लोक ४ व ५ पहा. ६. राजविद्येचें गुह्य; श्रेष्ठविद्येचें मूळ, ब्रह्मशाखासूत. ७. परका. ८. प्राकृत लोक जागत असतां जें जग त्यांस दिसतें तें भासरूप असूनही त्यांस खरें वाटतें; एवंच ते झोंपच घेत असतात. ९. आत्मस्वरूपीं. १०. झोंप व जागृण.